जुलै २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

लोकराज्य

नवे पर्व

आश्वासक...
कार्यक्षम...
लोकाभिमुख...

शपथविधी सोहळा...

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची एकनाथ शिंदे यांनी, तर उपमुख्यमंत्रिपदाची देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली.
राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी राजभवनच्या दरबार हॉलमध्ये आयोजित शपथविधी सोहळ्यात त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

शपथविधीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे
अभिनंदन करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करताना
राज्यपाल भगतसिंह कोश्यारी.

११ विश्वासदर्शक ठराव जिंकला

राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन ३ आणि ४ जुलै २०२२ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षपदी ॲड. राहुल सुरेश नार्वेकर यांची निवड करण्यात आली. दोन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी नियम २३ अन्वये प्रस्ताव दाखल केला होता. विधानसभेत मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर मतविभागणी घेण्यात आली.

१५ कृषी क्षेत्रात अग्रेसर

देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा वाटा सदैव मोठाच राहिला आहे. बहुतांश क्षेत्रात राज्य सदैव आघाडीवर राहिले आहे. राज्याने कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून अनेक योजना व उपक्रम देशासाठी आदर्श ठरले आहेत. उन्नत शेतीच्या माध्यमातून शेतकरी समृद्ध होत आहे. शेतकरी बांधवांनी कोरोना संकटकाळात अर्थव्यवस्थेला ताकद दिली.

२७ परावलंबित्व ते आत्मनिर्भरता

आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. मग ते विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्र असो की संरक्षण दल. सर्वत्र नारीशक्ती आघाडीवर आहे. कृषी क्षेत्रातही महिला अग्रेसर असून शेतीमध्ये नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. यंदाचे वर्ष हे महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. यानिमित्त राज्यातील विविध भागातील महिला शेतकऱ्यांच्या प्रातिनिधिक यशोगाथा..

३९ राज्याची सुवर्ण कामगिरी

हरियाणा येथे नुकत्याच पार पडलेल्या तिसऱ्या 'खेलो इंडिया युथ गेम्स'मध्ये राज्यातील खेळाडूंनी सुवर्ण कामगिरी करून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. २०१८ मध्ये अगदी पहिल्या शालेय स्पर्धेपासून (खेलो इंडिया स्कूल गेम्स) महाराष्ट्राने खेलो इंडियात वर्चस्व गाजवले आहे. यंदाही ४५ सुवर्ण पदकांसह दुसरे स्थान पटकावून खेळाडूंनी राज्याचा लौकिक वाढवला आहे.

५३ घरोघरी तिरंगा

देशभरात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम ७५, नावीन्यपूर्ण कल्पना ७५, नवे संकल्प ७५, स्वातंत्र्योत्तर फलनिष्पत्ती ७५ आणि अंमलबजावणी ७५ अशा पाच आशय संकल्पना राबवल्या जात आहेत. त्याचबरोबर 'घरोघरी तिरंगा' या अभियानांतर्गत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान देशात २० कोटींहून अधिक घरांवर तिरंगा फडकताना दिसणार आहे.

५६ जाता पंढरीसी सुख वाटे जीवा

पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐश्वर्य आहे, वैभव आहे...वारी हा शब्दच मुळी मनावर गारूड करणारा. तो उच्चारला तरी डोळ्यांसमोर चित्र उभे राहते ते ध्येयवेड्या पावलांचा, एकाच दिशेने टाळ, मृदंग, वीणा, चिपळ्या आणि पताकांसोबत 'विठ्ठल..! विठ्ठल..!'चा ठेका धरलेल्या वारकऱ्यांचे. वारी काय आहे हे जाणून घ्यायचं असलं तर प्रत्यक्ष वारीत सहभागी होण्याशिवाय पर्यायच नाही! वारी अनेक अंगांनी आपल्याला समृद्ध करते.

एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री; तर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री	६
विश्वासदर्शक ठराव जिंकला	११
कृषी क्षेत्रात अग्रेसर	१५
विक्रमी फलोत्पादन	१९
मत्स्यव्यवसायात अग्रेसर	२१
शेळीपालन: प्रगतीची दिशा	२३
क्रांतिकारी वनहक्क कायदा	२५
परावलंबित्व ते आत्मनिर्भरता	२७–३२
काळजी वसुंधरेची, पर्यावरण रक्षणाची!	३३–३८
राज्याची सुवर्ण कामगिरी	३९
'धाडसी डाकू'चा कबुलीजबाब	४१
पाऊल पडते पुढे	४२–४७
मंत्रिमंडळात ठरले	४८–५२
घरोघरी तिरंगा	५३
जाता पंढरीसी सुख वाटे जीवा	५६

वर्ष ७३ वे | अंक ११ | जुलै २०२२

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — दीपक कपूर
- प्रबंध संपादक — गणेश रामदासी, दयानंद कांबळे
- संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — अतुल पांडे, गजानन पाटील, राजाराम देवकर
- वितरण — मीनल जोगळेकर
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. प्रिंट प्लस प्रा.लि., पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

ई – लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

देशाच्या १५व्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी २५ जुलै रोजी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली. या पदावर विराजमान होणाऱ्या श्रीमती मुर्मू या देशाच्या १५ व्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती होण्याचा बहुमानही त्यांना मिळाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांनी श्रीमती मुर्मू यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये झालेल्या या समारंभास माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, उपराष्ट्रपती तथा राज्यसभेचे सभापती एम. व्यंकय्या नायडू, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री व विविध राज्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या समारंभास उपस्थित होते.

राष्ट्रपती पद व गोपनीयतेची शपथ घेताना श्रीमती द्रौपदी मुर्मू, त्यांना शपथ देताना देशाचे सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा.

श्रीमती मुर्मू या राष्ट्रपती पदावर विराजमान झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. 'भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात राष्ट्रपती पदावर विराजमान झालेल्या श्रीमती मुर्मू या पदाची शान आणखी उंचावतील. त्यांच्यामुळे भारताचा गौरव जागतिक स्तरावर आणखी उंचावेल, असा सार्थ विश्वास आहे. त्यांच्या कारकिर्दीला आदरपूर्वक शुभेच्छा,' असेही मुख्यमंत्री म्हणाले.

पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपती होण्याचा बहुमान मिळालेल्या श्रीमती मुर्मू यापूर्वी झारखंडच्या राज्यपाल म्हणून काम पाहत होत्या. त्या मूळ ओडिशा राज्यातील असून २० जून १९५८ रोजी मयुरभंज जिल्ह्यात एका आदिवासी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. प्रथम शिक्षिका, नगरसेवक, आमदार, मंत्री आणि झारखंडच्या राज्यपाल असा प्रवास करत त्यांनी देशाचे सर्वोच्च पद भूषवत आहेत.

'लोकराज्य' वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत प्रकाशित होत असलेल्या 'लोकराज्य' या महाराष्ट्र शासनाच्या मुखपत्राला तब्बल सात दशकांची गौरवशाली परंपरा लाभली आहे. राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या या मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढवण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत. वाचकांच्या विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय इत्यादींचे lokrajya2011@gmail.com या ई-मेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवण्यात यावेत. निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

पत्ता : उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००३२.

आश्वासक... कार्यक्षम... लोकाभिमुख...

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी, तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ ३० जून २०२२ रोजी घेतली. त्यांच्या शपथविधीनंतर एका लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक कारभाराची आश्वासक सुरुवात झाली असून त्याचे सकारात्मक चित्र येत्या काळात आपल्याला पाहायला मिळणार आहे.

पदभार स्वीकारल्यानंतर लोकाभिमुख निर्णय घ्यायला सुरुवात झाली, हे विविध निर्णयांच्या माध्यमातून दिसून येते. रायगडच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. पंढरपूर येथे आषाढी वारीच्या अनुषंगाने संपूर्ण राज्यातून तसेच अन्य राज्यातूनही मोठ्या प्रमाणावर वारकरी येतात. प्रशासनाने वारकरी हा केंद्रबिंदू मानून त्यांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात व वारकऱ्यांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचा निर्णय घेतला व त्याची प्रभावी अंमलबजावणी झाल्याचे पाहायला मिळाले. शेतकऱ्यांना स्वावलंबी करत शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा निश्चय राज्य सरकारने केला आहे. राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी पेट्रोल-डिझेलवरील कर कमी करण्यात आला आहे.

शासन आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे काम केल्यास शासनाविषयी सकारात्मक लोकभावना निर्माण होते. लोकप्रतिनिधी आणि शासन ही दोन्ही चाके समान वेगाने चालल्यास वेगाने काम होते. येत्या काळात ही चाके गतीने फिरताना नक्कीच पाहायला मिळणार आहेत.

देशाबरोबरच राज्याच्या विकासात कृषी क्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाची तसेच राज्याची अर्थव्यवस्था मुख्यत: कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्यही कृषी क्षेत्रात एक अग्रगण्य राज्य समजले जाते. चालू वर्ष महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. यानिमित्त या अंकात महिला शेतकऱ्यांच्या यशकथांचा समावेश करण्यात आला आहे. यात चंद्रपूरपासून ते ठाणे जिल्ह्यापर्यंतच्या महिला शेतकऱ्यांचा समावेश आहे. महिला शेतकऱ्यांनी स्वावलंबी होण्यासाठी शासनाच्या अनेक योजनांचा लाभ घेतला असून आपली व आपल्या कुटुंबाची आर्थिक प्रगती साधली आहे. यासोबतच शेतकऱ्यांना फायदेशीर ठरतील, अशा विविध कृषी योजनांचाही अंकात समावेश करण्यात आला आहे.

राज्याला ७२० किलोमीटरचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून शेतीबरोबरच शेतीपूरक व्यवसाय म्हणून मत्स्यव्यवसाय महत्त्वपूर्ण ठरतोय. त्यामुळे मत्स्यव्यवसाय विभागाच्या विविध योजनांचा आढावा या अंकातून घेण्यात आला आहे. ग्रामीण भागात शेळीपालन हा व्यवसाय शेतकऱ्यांना पूरक व्यवसाय म्हणून फायदेशीर ठरत आहे. कमी खर्चात शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य या पूरक व्यवसायाच्या माध्यमातून होते. शेळीपालनाविषयीचा लेखही शेतकऱ्यांना नक्कीच उपयोगी ठरेल.

माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत अमृत शहरे या विभागांतर्गत पुरस्कारप्राप्त महानगरपालिका व नगरपरिषदेच्या यशकथांचा अंकात समावेश करण्यात आला आहे. पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी माझी वसुंधरा हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत।।
व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी मुखी नाम।।

पंढरपूर म्हणजे अवघ्या तीर्थांचे माहेर. पंढरपूरची वारी केली की इतर कुठलीही तीर्थयात्रा करण्याची आवश्यकता राहत नाही, असे संत तुकाराम महाराज या अभंगात म्हणतात. महाराष्ट्रातील सर्वात मोठी सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरा असलेली पंढरीची वारी आषाढ महिन्यामध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेते. संपूर्ण राज्याच्या दृष्टीने वारी हा एक आगळेवेगळे अधिष्ठान लाभलेला सोहळा असतो. राज्याच्या कानाकोपऱ्यातील सर्वच वयोगटातील वारकरी वारीत सहभागी होत असतात. या वारीतील लोभस रूपे दर्शवणारा लेख अंकात समाविष्ट करण्यात आला आहे. यासोबतच चालू घडामोडी, वाचू आनंदे ही नेहमीची सदरे अंकात समाविष्ट करण्यात आली आहेत.

लोकराज्य अंकाचे संदर्भमूल्य आणि दर्जा वाढवण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया या अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्यामुळे लोकराज्यमध्ये वाचकांच्या प्रतिक्रियांचे ई-मेल व पत्राच्या माध्यमातून स्वागतच आहे.

नव्या सरकारच्या नव्या पर्वाच्या माध्यमातून महाराष्ट्रात लोकाभिमुख चित्र येत्या काळात आपल्या सर्वांना नक्कीच पाहायला मिळेल, असा विश्वास आहे.

दीपक कपूर
(मुख्य संपादक)

एकनाथ शिंदे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री; तर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री

महाराष्ट्राचे ३० वे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी पद व गोपनीयतेची शपथ घेतली, तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

राजभवनच्या दरबार हॉलमध्ये आयोजित शपथविधी सोहळ्यात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी श्री. शिंदे आणि श्री. फडणवीस यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. राष्ट्रगीतानंतर श्री. शिंदे यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या आशीर्वादाचा उल्लेख करून मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

या सोहळ्यास केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, केंद्रीय वित्त राज्यमंत्री भागवत कराड यांच्यासह प्रवीण दरेकर, चंद्रकांत पाटील, आशिष शेलार, सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, मंगलप्रभात लोढा, चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, राधाकृष्ण विखे-पाटील आदी मान्यवर तसेच मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, नितीन गद्रे, प्रधान सचिव दीपक कपूर, मनीषा म्हैसकर, विकास खारगे, मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबालसिंह चहल, एमएमआरडीएचे आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन

पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

शपथविधी कार्यक्रमादरम्यान राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे.

राज्याच्या विकासाला गती देण्यासाठी कटिबद्ध

राज्यातील जनतेला न्याय देण्यासाठी, लोकांच्या मनातील सरकार साकार करण्यासाठी तसेच राज्याच्या विकासाला गती देण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे नवनियुक्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाच्या कक्षाला दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नारायण राणे या वेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्रिपदावरून जनतेची सेवा करण्याची संधी मला मिळाली असून त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता सर्वांना विश्वासात घेऊन राज्याची पुढची वाटचाल करणार असल्याचे सांगून श्री.शिंदे म्हणाले की, राज्यातील प्रगतिपथावर असलेल्या प्रकल्पांना अधिक गती देण्यात येईल. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश अशा राज्याच्या सर्वच भागांचा विकास करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी या वेळी सांगितले. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची हिंदुत्वाची भूमिका व राज्याचा विकास या अजेंड्यावर राज्याची पुढील वाटचाल असेल, असेही श्री.शिंदे पुढे म्हणाले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत पीक-पाणी, जलयुक्त शिवार, मेट्रो प्रकल्प आदी विषयांवर चर्चा झाल्याचे त्यांनी या वेळी सांगितले. समृद्धी महामार्ग राज्याचा गेमचेंजर प्रकल्प ठरणार असल्याचे सांगून

आपले मुख्यमंत्री

नाव	:	एकनाथ संभाजी शिंदे
जन्म	:	६ मार्च १९६४
जन्म ठिकाण	:	अहिर, तालुका–महाबळेश्वर, जिल्हा–सातारा.
शिक्षण	:	बी.ए.
ज्ञात भाषा	:	मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती	:	विवाहित, पत्नी श्रीमती लता
अपत्ये	:	एकूण १ (एक मुलगा)
व्यवसाय	:	उद्योग व सामाजिक कार्य
मतदारसंघ	:	१४७–कोपरी–पाचपाखाडी, जिल्हा–ठाणे.

इतर माहिती : ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष; सन १९८६ मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न आंदोलनात १०० कार्यकर्त्यांसह सक्रिय सहभाग; ४० दिवस बेल्लारी येथे तुरुंगवास सहन केला; संपूर्ण ठाणे शहर व जिल्ह्यात सामाजिक कार्याचे जाळे निर्माण केले; ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडियम, इंटरनिटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, शहीद हेमंत करकरे क्रीडा संकुल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरू केली; आदिवासी प्रभाग मोखाडा, तलासरी व जव्हार येथील आश्रमशाळेत व आरोग्य केंद्रात सकस आहार व आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करून गरीब रुग्णांना विनामूल्य औषध वाटप केले; पालघर, बोईसर व सफाळे परिसरात शिवसेनेतर्फे एस. एस.सी. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन; गरीब विद्यार्थ्यांना शालेपयोगी साहित्यांचे वाटप; पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप; वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन; बालनाट्य महोत्सवाचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन; 'जाणता राजा' नाटकाचे अत्यल्पदरात आयोजन; अध्यक्ष, ठाणे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटना; पूरग्रस्तांना मदत; ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; नागपूर - मुंबई समृद्धी महामार्ग, वांद्रे-वरळी सी लिंक, वाशी येथील तिसरा खाडीपुल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमता वाढवण्यासाठी खालापूर-लोणावळा टनेल मार्ग, शिळ-कल्याण रस्त्याचे सहापदरीकरण, विदर्भात रेल्वेच्या २७ उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न; राज्यातील द्रुतगती मार्गावरील उपधान कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या; ओझर्डे येथे ट्रामा केअर सेंटर सुरू केले; आरोग्यमंत्रिपदाच्या काळात आशा सेविकांची पगारवाढ केली; आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस.पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला; ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास केला; ठाणे मेट्रोच्या कामाला गती दिली; ठाणे-मुंलुंड दरम्यान नव्या स्थानकाला मंजुरी मिळवली. ठाणे जिल्ह्यासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या काळू धरणाच्या अडचणी सोडवण्यात यश; बारवी धरणाची उंची वाढवण्यासाठी मंजुरी मिळवली; एमएसआरडीला क्लस्टर योजना सुरू केली; ठाणे जिल्हा परिषद, तसेच कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, महानगरपालिकेत व अंबरनाथ, बदलापूर नगर परिषदेत शिवसेनेची सत्ता आणण्यात यश; १९८४ मध्ये शिवसेना शाखा प्रमुख, वागळे इस्टेट, किसननगर; शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख; पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग, १९९७ व २००२ दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, महानगरपालिका ठाणे; २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१४-२०१९ विधिमंडळ शिवसेना पक्षाचे गटनेते; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर ते नोव्हेंबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री; तसेच जानेवारी २०१९ सार्वजनिक आरोग्य खात्याचा कार्यभार व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; नोव्हेंबर २०१९ ते जून, २०२२ नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री; ३० जून, २०२२ पासून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री.

(संदर्भ- १४वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदी असताना त्यांनी सुरू केलेली जनहिताची कामे पुढे नेण्यात येतील, असेही ते म्हणाले. पत्रकारांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात दुप्पट वेगाने कामे मार्गी लावू, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला. या वेळी मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष मंदार पारकर, उपाध्यक्ष महेश पावसकर, सचिव प्रमोद डोईफोडे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सचिव, अधिकाऱ्यांशी साधला संवाद

लोकांनी आपल्यावर विश्वास दाखवला आहे. आपल्या कामातून शासन प्रशासन गतिमान आहे, हा संदेश देऊ या, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर सचिव तसेच वरिष्ठ अधिकारी यांच्याशी संवाद साधताना ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीस उपस्थित होते.

मंत्रिमंडळ बैठकीत २ व ३ जुलै रोजी विधिमंडळाचे विशेष अधिवेशन घेण्याचा निर्णय घेण्यात आला. अधिवेशनात पहिल्याच दिवशी विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे.

मंत्रालयातील समिती सभागृहात झालेल्या बैठकीत बोलताना मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, 'आपण नवीन सुरुवात करत आहोत. आपल्यासोबत अनुभवी असे उपमुख्यमंत्री आहेत. त्यामुळे कारभार करण्यास अडचण येणार नाही. राज्यातील विकास कामे, विविध प्रकल्प यांना गती द्यावी लागेल. विविध समाज घटकांना न्याय देण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांनी हातात हात घालून काम करावे लागते. शासन आणि प्रशासन ही एका रथाची दोन चाके आहेत. लोकांनी आपल्यावर विश्वास दाखवला आहे. तो आपल्याला सार्थ ठरवायचा आहे. मेट्रोचे प्रकल्प, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग तसेच जलसंपदा विभागांचे महत्त्वाचे प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावयाचे आहेत. त्यासाठी प्रशासनाचे सहकार्य मिळेलच, हा विश्वास आहे.'

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, 'आपल्या सोबत पुन्हा काम करण्याची संधी मिळाली आहे. गतिशीलतेने आणि निर्णयक्षमतेने महाराष्ट्र पुढे नेऊ या.'

या वेळी राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव तसेच सर्व विभागांचे सचिव उपस्थित होते. मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील खरीप हंगाम, पीक पाणी, पीक विमा तसेच राज्यातील कोरोना प्रादुर्भावाबाबतची परिस्थिती यांचे सादरीकरण करण्यात आले.

मंत्रालयात आगमन करताच मुख्यमंत्री श्री. शिंदे तसेच उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी छत्रपती शिवाजी महाराज तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

आपत्तीच्या काळात संपर्क, संवाद ठेवून हानी टाळा..

राज्यातील सर्व यंत्रणांनी आपापसात योग्य समन्वय ठेऊन कोणत्याही परिस्थितीत आपत्तींमध्ये जीवितहानी होणार नाही हे बघावे. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष फिल्डवर उतरून काम करावे म्हणजे यंत्रणेतील सर्व लोकदेखील सतर्क राहतील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातील समिती सभागृहात राज्यातील आपत्ती व्यवस्थापनाची आढावा बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री श्री.शिंदे बोलत होते.

आपत्तीमध्ये समन्वय अतिशय महत्त्वाचा आहे. एनडीआरएफने त्याचप्रमाणे लष्करानेदेखील गेल्या वर्षी पूरपरिस्थितीत चांगले काम केले आहे. कोणत्याही परिस्थितीत संपर्क आणि संवादाचा अभाव राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. जिल्हाधिकारी व पालिका कार्यालयांमधील वॉररूम यंत्रणा सज्ज राहून लोकांच्या तक्रारींचा तातडीने निपटारा करावा. गेल्या वर्षी दरडी कोसळण्याच्या घटना घडल्या होत्या. विशेषत: नेहमी दरड कोसळणाऱ्या जागांव्यतिरिक्त नव्या ठिकाणी या दरडी कोसळल्या. त्यामुळे यंदादेखील अधिक दक्ष राहण्याची गरज आहे. धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना मोठ्या पावसाच्या वेळेस तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये हलवून त्या ठिकाणी त्यांच्या जेवण्याखाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी पालिकांनी घ्यावी. मी आणि उपमुख्यमंत्री २४ तास आपणा सर्वांसाठी उपलब्ध असून आपल्याला गतिमानतेने शेवटच्या घटकांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचवल्या पाहिजेत, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

२७५ मि.मी. पाऊस एका दिवसात पडूनही महानगरपालिकेने तसेच रेल्वेने सफाई तसेच पाणी तुंबणार नाही, यासाठी केलेल्या व्यवस्थेमुळे कोठेही मुंबईकरांना त्रास झाला नाही व वाहतूकही व्यवस्थित सुरळीत राहिली, याविषयी मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.

या वेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश शेठ, अपर मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम मनोज सौनिक, मदत व पुनर्वसनचे प्रभारी अपर मुख्य सचिव नितीन करीर, मुंबई महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक दीपक कपूर, गृह विभागचे प्रधान सचिव संजय सक्सेना, मुंबई महापालिका अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, अन्न नागरी पुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे, महाराष्ट्र राज्य राखीव पोलीस दलाचे महासंचालक अभिषेक त्रिमुखे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे आयुक्त डॉ. एन. रामास्वामी आदी या बैठकीला दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

आपले उपमुख्यमंत्री

नाव	:	देवेंद्र गंगाधरराव फडणवीस
जन्म	:	२२ जुलै १९७०
जन्म ठिकाण	:	नागपूर
शिक्षण	:	एलएलबी (नागपूर विद्यापीठ), एम.बी.ए., डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डी.एस.ई.बर्लिन, जर्मनी येथून उत्तीर्ण.
ज्ञात भाषा	:	मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती	:	विवाहित, पत्नी श्रीमती अमृता
अपत्ये	:	एकूण १ (एक मुलगी)
व्यवसाय	:	सामाजिक कार्य
मतदारसंघ	:	५२–नागपूर (दक्षिण–पश्चिम), जिल्हा: नागपूर.

इतर माहिती : कार्यकारी सदस्य, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (युनायटेड नेशन्सद्वारा मान्यता प्राप्त संस्था); उपाध्यक्ष, दि सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल); उपाध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था; अध्यक्ष, स्व.आबाजी थत्ते अनुसंधान संस्थानचे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट, नागपूर; अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केट बॉल संघटना; अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य; विविध उपक्रमात सहभाग; १९८९ वॉर्ड अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, धरमपेठ वॉर्ड, नागपूर; १९९० प्रसिद्धी प्रमुख, भाजप, नागपूर (पश्चिम); १९९२-९५ अध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, नागपूर शहर; १९९५-२००४ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, भारतीय जनता युवा मोर्चा; २००४-२००९, २००९-२०१४, राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २००९ भाजप विदर्भ निवडणूक प्रमुख, २०१० महामंत्री, २०१२-२०१४ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; ग्लोबल पार्लमेंट या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व केले; प्रथम भारतीय लोकप्रतिनिधी; उपाध्यक्ष, ग्लोबल पार्लमेंट फोरम, हाबीतात; १९९२ व १९९७ सदस्य व १९९७ मध्ये महापौर, महानगरपालिका, नागपूर; १९९८ मेअर इन कौन्सिल पद्धती अंतर्गत महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड; १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, विधानमंडळ नियम समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विनंती अर्ज समिती, गृहनिर्माण व नगरविकास स्थायी समिती; सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण समिती; सदस्य, कार्यकारी परिषद डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ; ओ.बी.सी.नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची उत्पन्न मर्यादा वाढवण्यासाठी यशस्वी प्रयत्न; राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्या वतीने सन २००३ या वर्षाचा महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार प्राप्त; 'उत्कृष्ट वक्ता' म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त; रोटरी क्लबचा मोस्ट चॅलेंजिंग युथ ॲवॉर्ड प्राप्त; हिंदू लॉ विषयात नागपूर विद्यापीठाचा बी.के.बोस ॲवॉर्ड प्राप्त; प्रमोदजी महाजन यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा मुक्त चंद पुणे या संस्थेतर्फे उत्कृष्ट संसदपटू पुरस्कार, प्रकाश जोशी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या राजयोगी नेता पुरस्काराने सन्मानित; राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी सन्मानित; यशदा पुणे येथे अर्बन फायनान्सिंग विषयावर व्याख्याने दिली; ३१ ऑक्टोबर, २०१४ ते २१ नोव्हेंबर २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री; २२ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०१९ दुसऱ्यांदा मुख्यमंत्री; ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; डिसेंबर २०१९ ते जून २०२२ महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते; ३० जून २०२२ पासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री.

(संदर्भ -१४ वी महाराष्ट्र विधानसभा सदस्यांचा संक्षिप्त जीवन परिचय)

पदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातील छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना तत्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे..

मुंबई मध्ये पावसाळा सुरू झाला की, धोकादायक असलेल्या इमारती कोसळतात. प्रत्येक वॉर्ड मध्ये अशा धोकादायक इमारतींमधील रहिवाशांना समजतील अशा भाषेत नोटीस पाठवून या इमारती खाली केल्या पाहिजेत. जे संबंधित वॉर्ड ऑफिसर ही कार्यवाही करणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. वर्षानुवर्षे दरडी कोसळणाऱ्या ठरावीक ठिकाणांचे सर्वेक्षण झालेले आहे.

गेल्या काही वर्षांचा अनुभव पाहता आपत्तींच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे नव्याने दरडी कोसळणारी ठिकाणेदेखील असू शकतात, याचे सर्वेक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. ते सर्वेक्षण तत्काळ करा, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिले.

हुतात्म्यांना अभिवादन

राज्याचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हुतात्मा स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्म्यांना अभिवादन केले. या वेळी आमदार दादाजी भुसे, दीपक केसरकर, संजय राठोड, अब्दुल सत्तार, अन्य आमदार तसेच मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबालसिंह चहल, जिल्हाधिकारी राजीव निवतकर आदी उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनीही पुष्प अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दादर येथील चैत्यभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, आमदार दादाजी भुसे, संदिपान भुमरे, संजय राठोड, भरत गोगावले, दीपक केसरकर, संजय शिरसाट यांच्यासह इतर मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन केले.

दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवाजी पार्क येथील स्मृती स्थळाला भेट देऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

टीम लोकराज्य

राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशन ३ आणि ४ जुलै २०२२ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात विधानसभा अध्यक्षपदी ॲड. राहुल सुरेश नार्वेकर यांची निवड करण्यात आली. दोन दिवसीय विशेष अधिवेशनाच्या कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी नियम २३ अन्वये प्रस्ताव दाखल केला होता. विधानसभेत मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर मतविभागणी घेण्यात आली. यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळावरील विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने १६४ मते मिळाल्याने त्यांनी हा विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे, असे अध्यक्षांनी या वेळी जाहीर केले.

विश्वासदर्शक ठराव जिंकला

राज्य विधिमंडळाचे विशेष अधिवेशनात ३ जुलै २०२२ रोजी अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आली. या पदासाठी ॲड. राहुल सुरेश नार्वेकर आणि राजन प्रभाकर साळवी या सदस्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. यानंतर झालेल्या निवडणुकीत ॲड. राहुल नार्वेकर यांना १६४ मते मिळाल्याने त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी जाहीर केले.

यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सदस्य अजित पवार, जयंत पाटील, बाळासाहेब थोरात, नाना पटोले यांच्यासह सभागृहातील ज्येष्ठ सदस्यांनी ॲड. नार्वेकर यांना अध्यक्षांच्या आसनावर नेऊन स्थानापन्न केले.

सर्वांना समान न्याय देतील...

ॲड. राहुल नार्वेकर हे स्वतः कायद्याचे उत्तम जाणकार आहेत. कोणताही पक्षीय अभिनिवेश न बाळगता ते सदनातील सर्व सदस्यांना निश्चितच समान न्याय देतील असा विश्वास व्यक्त करून विधानसभेच्या अध्यक्षपदी ॲड. राहुल नार्वेकर यांची बहुमताने निवड झाली, त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात अभिनंदनाचा ठराव मांडला. तसेच विधानसभा अध्यक्षपदी ॲड. नार्वेकर यांची निवड झाल्याने त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्राच्या विधिमंडळाला मोठी परंपरा लाभलेली आहे. ज्यांनी ज्यांनी या अध्यक्ष पदावर कार्य केले आहे, त्यांना देशपातळीवर नावाजले गेले आहे म्हणून विधिमंडळात कायमच अध्यक्षांना एक वेगळे महत्त्व आणि मान राहिलेला आहे. तीच धुरा खांद्यावर पुढे घेऊन चालण्याची जबाबदारी आता ॲड. राहुल नार्वेकर यांच्या खांद्यावर आलेली आहे. ती नक्कीच पूर्ण क्षमतेने निभावून नेतील आणि सभागृहाची प्रतिष्ठा उंचाविण्याचे कार्य करतील. हा एक ऐतिहासिक क्षण असून या सभागृहात शेतकरी बांधव, महिला, सामान्य नागरिक यांचे हक्क, अधिकार जोपासले जातील. जनतेच्या विकासासाठी काम करताना दोन्ही चाके समांतर सुरू राहतील. कायद्यासमोर सर्व समान म्हणून आपण कार्य करावे. हे सरकार पारदर्शकपणे कार्य करेल. सभागृहात कोणत्याही सदस्यांवर अन्याय होणार नाही, वेळप्रसंगी समज देऊन योग्य मार्गदर्शन आपण कराल, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केली.

ॲड. नार्वेकर हे राज्यातील आणि देशातील सर्वात तरूण अध्यक्ष आहेत. राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा पुरस्कार प्राप्त ॲड. नार्वेकर हे कायद्यात निष्णात असल्याने या पदावरून न्यायदानाचे काम करतील. यापूर्वीच्या सर्व अध्यक्षांनी उत्तम काम केले असून हीच परंपरा ॲड. नार्वेकर यांच्या कालावधीत पुढे सुरू राहील.

राज्याच्या सर्व नागरिकांचे प्रश्न सोडवण्याची संधी त्यांना मिळाली असून कोणत्याही अडचणी, प्रश्न सोडवण्याची क्षमता या सभागृहात आहे. त्यामुळे दोन्ही बाजू समजून घेऊन त्या विषयाला न्याय देण्याचे कार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त करून ॲड. राहुल नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल श्री.फडणवीस यांनी नवनियुक्त विधानसभा अध्यक्षांचे अभिनंदन केले.

विधानसभा अध्यक्षपदी ॲड. राहुल नार्वेकर यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

या पदाला गौरवशाली परंपरा असून, ती कायम ठेवत ॲड. नार्वेकर यांच्या कार्यकाळात लोकहिताचे निर्णय घेऊन राज्याच्या विकासाला गती मिळेल, असे सांगून माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ॲड. नार्वेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनीही ॲड. नार्वेकर यांना शुभेच्छा देऊन सभागृहात राज्याच्या सर्व प्रश्नांना न्याय मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

याचबरोबर सदस्य सर्वश्री सुनील प्रभू, अबू आझमी, बच्चू कडू, सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, नाना पटोले, आदित्य ठाकरे, दीपक केसरकर, हरिभाऊ बागडे, किशोर जोरगेवार, धनंजय मुंडे आदी सदस्यांनीही ॲड. नार्वेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षपद गांभीर्याने आणि न्यायबुद्धीने सांभाळीन...

भारतातील संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत वैशिष्ट्यपूर्ण स्थान असलेल्या 'महाराष्ट्र विधानसभा' या राज्यातील सर्वोच्च सभागृहाच्या अध्यक्षपदी बहुमताने निवड झाल्याबद्दल नवनिर्वाचित अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी सभागृहाचे आभार मानले. आपणा सर्वांच्या सदिच्छांसह मी विधानसभा अध्यक्षपदाचा कार्यभार नम्रपणे स्वीकारत असून लोकशाहीतील हे महत्त्वाचे पद मी गांभीर्याने आणि न्यायबुद्धीने सांभाळीन, अशी ग्वाही ॲड. नार्वेकर यांनी दिली.

राज्य विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात ॲड. राहुल नार्वेकर यांची महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षपदी बहुमताने निवड झाली, त्यानंतर ते बोलत होते.

आपली संसदीय लोकशाही सर्व प्रकारच्या राजकीय विचारछटांना स्थान देते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा आपल्या लोकशाहीचा आत्मा आहे. जनादेशाचा आदर राखणे आणि संसदीय सभ्याचार जपला जाणे आवश्यक आहे. ब्रिटनला संसदीय कार्यप्रणालीची जननी म्हणून ओळखले जाते. राजाचे अधिकार आणि हस्तक्षेप मर्यादित होत तेथील लोकशाही गेल्या ८०० वर्षांच्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर विकसित होत गेली. प्रगल्भ आणि परिपक्व होत गेली. मात्र तरिही विन्स्टन चर्चिल यांच्यासारख्या तेथील पंतप्रधान आणि मुत्सद्द्याला The best argument against democracy is a five-minute conversation with the average voter! असे का बरे म्हणावे लागले असेल...? चर्चिल साहेबांच्या या मार्मिक अवतरणामध्ये खूप काही दडले आहे. Speaker has less to speak याची मला जाणीव असल्याचे सांगून यापुढील काही काळ मला more to listen ची भूमिका पार पाडायची असल्याचे ॲड. नार्वेकर या वेळी म्हणाले.

ॲड. नार्वेकर म्हणाले, विधानसभेची ही पवित्र वास्तू राज्यातील १४ कोटी जनतेच्या इच्छा-आकांक्षांचे प्रतीक आहे. आपणासारख्या लोकप्रतिनिधींमार्फत या इच्छा-आकांक्षा विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सभागृहात मांडल्या जाणे आणि त्यानुसार निर्णयप्रक्रियेचे चक्र गतिमान राहणे आवश्यक आहे. यापुढील काळात सभागृहातील कामकाजाचा प्रत्येक क्षण लोकहिताच्या कारणासाठी, निर्णयाभिमुख चर्चेसाठी, विकासाभिमुख नियोजनासाठी आणि समाजातील अंतिम घटकांच्या शोषित वंचितांच्या उद्धारासाठी खर्ची पडेल, यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. यासाठी सर्वांचे सहकार्य लाभेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कायदे करणे हे कायदेमंडळाचे महत्त्वाचे कार्य आहे. विधेयकांवर दोन्ही बाजूने सांगोपांग चर्चा होऊन येणारा नवीन कायदा अधिकाधिक परिपूर्ण असावा, अशी अपेक्षा असल्याचे सांगून या संदर्भात येत्या काळात परिस्थिती निश्चितच सुधारलेली असेल, त्या दृष्टीने काही व्यवस्था आपण तयार करू, असे ॲड. नार्वेकर यांनी सांगितले.

राज्य विधानसभेला दिग्गज अध्यक्षांची तेजस्वी आणि प्रेरक परंपरा लाभली असल्याची उदाहरणे देऊन या मान्यवरांनी आपल्या संसदीय लोकशाहीचा सन्मान उंचावला असल्याचे अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी सांगितले. बाळासाहेब भारदे यांनी या विधानमंडळाला 'लोकशाहीच्या मंदिराची' अतिशय समर्पक उपमा दिलेली आहे. विधानसभा म्हणजे नवभारताचे व्यासपीठ आहे, या जाणिवेने सभागृहातील चर्चेचा स्तर दर्जेदार असायला हवा, अशी अपेक्षा व्यक्त करून सर्व सदस्यांनी आपले घटनादत्त कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडावे, असे आवाहनही ॲड. नार्वेकर यांनी केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सभागृहातील ज्येष्ठ सदस्यांचे आपल्याला मार्गदर्शन लाभेल, अशी भावना व्यक्त करून भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या अमृतमहोत्सवी वर्षात टिळक - गोखले - आंबेडकर - नाना पाटील-सावरकर यांसारख्या महान देशभक्तांची भूमी असलेल्या महाराष्ट्राच्या या सर्वोच्च सभागृहाच्या अध्यक्षपदी आपण माझी निवड केली हा मी माझ्या आजपर्यंतच्या सामाजिक आणि राजकीय कारकिर्दीतील सर्वोच्च बहुमान समजतो, असे ॲड. नार्वेकर यांनी सांगितले. याच सभागृहात असलेल्या हरिभाऊ बागडे, दिलीप वळसे-पाटील, नाना पटोले तसेच कार्यकारी अध्यक्ष नरहरी झिरवाळ या चार अनुभवी माजी विधानसभा अध्यक्षांचे आपल्याला मार्गदर्शन लाभेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी त्याग आणि बलिदान दिलेल्या सर्व आदरणीय नेत्यांना आणि शूरवीरांना तसेच छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या सभागृहाचे आणि लोकसभेचे पहिले अध्यक्ष दादासाहेब मावळणकर अशा सर्व महात्म्यांना नतमस्तक होत ॲड. नार्वेकर यांनी वंदन केले. तसेच या पदावर निवड झाल्यानंतर ज्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या अभिनंदनपर भावना व्यक्त केल्या ते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, धनंजय मुंडे, आदित्य ठाकरे, माजी राज्यमंत्री बच्चू कडू, दीपक केसरकर, माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे, नाना पटोले यांच्यासह सुनील प्रभू, अबू आझमी, किशोर जोरगेवार तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह सर्व सदस्यांचे त्यांनी आभार मानले.

नाव	:	ॲड. राहुल सुरेश नार्वेकर (विधानसभा अध्यक्ष)
जन्म	:	११ फेब्रुवारी १९७७
जन्म ठिकाण	:	मुंबई
शिक्षण	:	बी.कॉम, एलएल.बी.
ज्ञात भाषा	:	मराठी, हिंदी व इंग्रजी
वैवाहिक माहिती	:	विवाहित, पत्नी श्रीमती सरोजनी
अपत्ये	:	एकूण १ (एक मुलगी)
व्यवसाय	:	वकिली
मतदार संघ	:	१८७ – कुलाबा, जिल्हा – मुंबई शहर

इतर माहिती : अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध, अनेक संस्थांचे कायदेशीर सल्लागार म्हणून कार्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते, सप्टेंबर, २०१९ पासून भारतीय जनता पक्षाचे कार्य, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद २०१५-२०१६ चा राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेचा उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्राप्त,मे, २०१६ मध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेद्वारे ऑस्ट्रेलिया, न्युझिलँड व सिंगापूरचा अभ्यास दौरा, ऑक्टोबर, २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड. ३ जुलै २०२२ रोजी विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड.

शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र

शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा निश्चय राज्य सरकारने केला असून राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी पेट्रोल डिझेलवरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. विधानसभेत विश्वासदर्शक ठरावानंतर अभिनंदनाच्या प्रस्तावावर भाषणाच्या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.

हिरकणी गावाच्या विकासासाठी निधी

रायगड पायथ्याशी असलेल्या हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निधीतून हिरकणी गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी इंधनावरील कपात केली, त्याच धर्तीवर राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी इंधनावरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

आगामी कालावधीत सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यात येतील. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून साकारत असलेल्या समृद्धी महामार्गातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होऊन राज्याच्या विकासाला चालना मिळेल. मुंबईतील मेट्रो प्रकल्पाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल. मेट्रो प्रकल्प गतीने पूर्ण करण्याकडे राज्य शासनाचे प्राधान्य असेल. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांच्या कामांना गती देणार आहेत. तसेच शासनाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे एकांगी निर्णय न घेता सर्वांच्या हितासाठी शासन प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली.

राज्य शासन सर्वांना बरोबर घेऊन सर्व धर्मीयांना समन्यायाने वागणूक देणार असून सर्वांच्या विकासासाठी हे शासन काम करेल. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचा सच्चा सैनिक म्हणून मी काम करणार आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी तत्काळ निर्णय घेऊन सर्वसामान्यांची कामे लवकर होण्यासाठी आमचे सरकार भर देणार असून महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अहोरात्र प्रयत्न करणार आहोत, असे मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी सांगितले.

विरोधी पक्षनेतेपदी अजित पवार

विधानसभेच्या विरोधी पक्षनेतेपदी अजित पवार यांची निवड करण्यात आली या निवडीबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे अभिनंदन केले.

विश्वासदर्शक ठराव

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विधानसभेत विश्वासदर्शक ठराव जिंकल्याचे विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी जाहीर केले.

महाराष्ट्र विधानमंडळाचे दोनदिवसीय विशेष अधिवेशनाच्या कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार व भरतशेट गोगावले यांनी नियम २३ अन्वये प्रस्ताव दाखल केला होता, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळावर ही विधानसभा पूर्ण विश्वास व्यक्त करणारा हा प्रस्ताव होता. विधानसभेत मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर मतविभागणी घेण्यात आली, यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळावरील विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूने १६४ मते मिळाल्याने त्यांनी हा विश्वासदर्शक ठराव जिंकला आहे, असे अध्यक्षांनी या वेळी जाहीर केले. या प्रस्तावाच्या बाजूने १६४, तर प्रस्तावाच्या विरोधात ९९ सदस्यांनी मतदान केले, तर ३ सदस्य तटस्थ राहिले.

अहोरात्र काम करणारा नेता

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे अहोरात्र काम करणारा, माणुसकी असलेला नेता आहे. ज्याचा कुणी नाही, त्याचा मी आहे, ही धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण, तोच

कित्ता श्री. शिंदे हे आज पुढे नेत आहेत. येत्या काळात ते एक यशस्वी मुख्यमंत्री म्हणून काम करतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांची मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द अधिक यशस्वी करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

विधानसभेत विश्वासदर्शक ठराव पारित झाल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अभिनंदन प्रस्तावावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री श्री.शिंदे यांच्यावर मोठा विश्वास व्यक्त केला, त्याबद्दल सभागृहातील सदस्यांचे आभार मानून उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, एकनाथ शिंदे हे कट्टर शिवसैनिक आहेत, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जाज्वल्य विचारांचे ते एक पाईक असून कर्मावर अढळ विश्वास असलेले ते एक नेते आहेत. कुशल संघटक, जनतेचे सेवेकरी आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रभावामुळे १९८० मध्ये एकनाथ शिंदे शिवसेनेत सक्रिय झाले. कार्यकर्ता, शाखाप्रमुख, नगरसेवक, मंत्री अशा वेगवेगळ्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडत आज ते राज्याचे मुख्यमंत्री झाले. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी आंदोलन करून जनसामान्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर राहणाऱ्या श्री. शिंदे यांनी सीमाप्रश्नावर अतिशय आक्रमक आंदोलन केले, या आंदोलनातील सक्रिय सहभागामुळे ४० दिवस ते बेलारीच्या तुरुंगात होते, त्यातून त्यांच्या नेतृत्वाचा दबदबा तयार झाला, असेही उपमुख्यमंत्री या वेळी म्हणाले.

आपण मांडलेल्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या संकल्पनेला पूर्णत्व देण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास विभागाचे मंत्री असताना एक विशेष उद्देश वहन संस्था म्हणून श्री. शिंदे यांच्या विभागाने उत्तम काम केले. आता या महामार्गाचा एक टप्पा पूर्ण झाला असून या प्रकल्पात येणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी श्री. शिंदे यांनी प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटी देऊन अडथळे दूर केले. मुंबई-पुण्यातील अंतर कमी करणारी मिसिंग लेन किंवा वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू असे अनेक प्रकल्प राबवताना विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी उत्तम काम केले. आरोग्य हा त्यांचा आवडता विषय असून आरोग्यमंत्री असताना त्यांनी उत्तम काम केले, आरोग्य सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी अतिशय चांगल्या व्यवस्था उभ्या केल्या. महालक्ष्मी एक्सप्रेस पाण्यात अडकल्याचा प्रसंग असो किंवा कोल्हापुरातील पूरस्थिती असो या संकटांच्या वेळी श्री. शिंदे तातडीने मदतीला धावून गेले. कमी बोलायचे आणि अधिक काम करायचे हा स्वभाव आणि संयमामुळे त्यांची जडणघडण झाल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सामान्य जनता-कार्यकर्त्यांची काळजी घेणाऱ्या एकनाथ शिंदे यांना गरिबीमुळे दहावीनंतरचे शिक्षण पूर्ण करता आले नाही. अतिशय कष्टाने श्री. शिंदे यांनी आपले आयुष्य उभे केले. स्वतःच्या जीवनात अनेक कटू प्रसंग आले, पण न थकता त्यांनी आयुष्य उभे केले. निर्धार करून वयाच्या ५६ व्या वर्षी ७७ टक्के गुण मिळवून त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. मुलाला डॉक्टर केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पाठीशी पूर्ण ताकदीने, क्षमतेने उभा असून त्यांची मुख्यमंत्रिपदाची कारकीर्द अधिक यशस्वी करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगून हे सरकार कुठल्याही आकसाने, बदल्याच्या भावनेने काम करणार नाही. जे चांगले निर्णय आहेत, ते कायम करू किंबहुना हे निर्णय पुढे नेण्याच्या दृष्टीनेही काम करणार असल्याचेही उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या वेळी स्पष्ट केले.

टीम लोकराज्य

राज्यसभा द्विवार्षिक निवडणूक-२०२२ निकाल

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ६ जागांसाठी १० जून २०२२ रोजी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली. या राज्यसभा द्विवार्षिक निवडणुकीत ७ उमेदवारांपैकी ६ उमेदवार विजयी घोषित करण्यात आले.

विजयी उमेदवारांच्या निवडणूक क्रमवारीनुसार पीयूष वेदप्रकाश गोयल यांना पहिल्या फेरीत ४८०० मतमूल्ये, डॉ. अनिल सुखदेवराव बोंडे यांना पहिल्या फेरीत ४८०० मतमूल्ये मिळाले आहे. इम्रान प्रतापगढी यांना पहिल्या फेरीत ४४०० मतमूल्ये मिळाली आहे. प्रफुल मनोहरभाई पटेल यांना पहिल्या फेरीत ४३०० मतमूल्ये मिळाली असून संजय राजाराम राऊत यांनाही पहिल्या फेरीत ४१०० मतमूल्ये मिळाली आहेत, तर धनंजय भीमराव महाडिक यांना तिसऱ्या फेरीत ४१५६ मतमूल्ये मिळाली असून हे सर्व ६ उमेदवार विजयी घोषित करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांनी केलेल्या मतदानात २८४ वैध मते ठरली होती.

विधान परिषद निवडणूक निकाल

राज्य विधान परिषदेच्या दहा जागांसाठी २० जून २०२२ रोजी निवडणूक प्रक्रिया पार पडली. उमेदवारांना जिंकण्यासाठीचा २६०० हा मतमूल्यांचा कोटा पूर्ण करण्यासाठी फेरीनिहाय मिळालेले मतमूल्य पुढीलप्रमाणे :-

पहिल्या फेरीअखेर राम शिंदे (भाजपा) यांना ३०००, श्रीकांत भारतीय (भाजपा) यांना ३०००, एकनाथ खडसे (राष्ट्रवादी काँग्रेस) यांना २९००, प्रवीण दरेकर (भाजपा) यांना २९००, रामराजे नाईक-निंबाळकर (राष्ट्रवादी काँग्रेस) यांना २७००, उमा खापरे (भाजपा) यांना २७००, सचिन अहिर (शिवसेना) यांना २६०० आणि आमश्या पाडवी (शिवसेना) यांना २६००, तर पाचव्या फेरीअखेर प्रसाद लाड (भाजपा) यांना २८५७ इतकी मतमूल्ये मिळून त्यांनी विजयासाठीचा कोटा पूर्ण केला.

दहाव्या व शेवटच्या फेरीअखेर भाई जगताप (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) यांना २४७४ इतकी मतमूल्ये, तर चंद्रकांत हंडोरे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) यांना २२०० इतकी मतमूल्ये मिळाली. या फेरीअखेर अधिक मतमूल्यांच्या आधारे श्री.जगताप हे विजयी झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी राजेंद्र भागवत यांनी जाहीर केले.

देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचा वाटा सदैव मोठाच राहिला आहे. बहुतांश क्षेत्रात राज्य सदैव आघाडीवर राहिले आहे. राज्याने कृषी क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून अनेक योजना व उपक्रम देशासाठी आदर्श ठरले आहेत. शेतीच्या माध्यमातून शेतकरी समृद्ध होत आहे. शेतकरी बांधवांनी कोरोना संकटकाळात अर्थव्यवस्थेला ताकद दिली. त्यामुळे राज्याच्या सर्वांगीण प्रगतीत कृषी क्षेत्राचे मोठे योगदान असल्याचे सिद्ध झाले आहे. त्या अनुषंगाने कृषी विभागाचा घेतलेला हा आढावा..

कृषी क्षेत्रात अग्रेसर

सागरकुमार कांबळे

राज्यातील शेतीचा शाश्वत विकास होऊन शेतकरी सुखी व समृद्ध व्हावा, यासाठी राज्य शासन विविध योजना राबवत आले आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा), मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट), महाडिबीटी पोर्टल-अर्ज एक योजना अनेक, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन, रिसोर्स बँकेतील शेतकऱ्यांचा विस्तार कार्यामध्ये सहभाग, पिकस्पर्धा, विविध कृषी पुरस्कार, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना आदी योजना व उपक्रमांच्या माध्यमातून शेतकरी बांधव सर्वांगीण प्रगती साधत आहेत.

महिला शेतकरी व शेतमजुरांचा सन्मान

२०२२-२३ हे वर्ष 'महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले आहे. कृषी विभागाच्या योजना ५० टक्के महिलांसाठी राखीव, महिलांसाठी ३० टक्के पूरक अनुदान व प्रचलित योजनेतून अभिसरणाद्वारे महिलांना लाभ देण्यात येत आहेत. यापुढच्या काळातही कृषी विभागाची आघाडी कायम राहील, असा विश्वास आहे. महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात सुमारे २१ हजार कोटी रुपये थेट जमा करण्यात आले आहेत.

पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन लाखांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याज दराने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

बळीराजाच्या आरोग्यासाठी

कृषिप्रधान संस्कृतीचा शेतकरी कणा आहे. देशाच्या, राज्याच्या अर्थव्यस्थेचा शेतकरी आधार आहे. मात्र सर्वांच्या पोटाची काळजी घेणाऱ्या शेतकरी बांधवांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. त्यामुळे शेतकरी व त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची शासनाने काळजी घेतली आहे. कृषी विभाग आता शेतकरी बांधवांच्या आरोग्यासाठी

अव्वल कामगिरी

शेतमाल निर्यातीसाठी असलेल्या ट्रेसिबिलीटी नोंदणीच्या प्रणालीमध्ये देशातील ७२,२८० शेतकऱ्यांपैकी महाराष्ट्रातील तब्बल ६२,३४४ शेतकरी आहेत. भारतातील १२९ भौगोलिक मानांकनापैकी महाराष्ट्रातील २६ आहेत. देशात भौगोलिक मानांकन नोंदणीकृत शेतकरी ५,२६० आहेत. त्यापैकी ४३९० शेतकरी महाराष्ट्रातील आहेत. द्राक्ष, डाळींब, आंबा, केळी, कांदा, मिरची या पिकांच्या निर्यातीत राज्य आघाडीवर आहे. देशाच्या एकूण निर्यातीच्या ६५ टक्के फळे, ५५ टक्के भाजीपाला महाराष्ट्रातून निर्यात होतो. देशात सर्वाधिक ४५०० शेतकरी उत्पादक कंपन्या महाराष्ट्रात आहेत. पीएमएफएमई योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. ही आपल्या महाराष्ट्राची कामगिरी आहे. यावरून आपण कृषी क्षेत्रात केलेली कामगिरी, दिलेले योगदान अधोरेखित होते.

पोषक गुणधर्म असणाऱ्या भाज्या, कडधान्यांचे वाण मोफत देणार आहे. यामुळे पोषणमूल्यांची गरज भागण्यास मदत होणार आहे. 'आत्मांतर्गत पोषणयुक्त सुरक्षित अन्न योजना २०२२-२३' च्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या आरोग्याचा विचार करणारे महाराष्ट्र देशातले पहिले राज्य ठरले आहे.

लाभार्थी निवड : शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांना पोषणयुक्त व सुरक्षित अन्नाचा पुरवठा करणे, संतुलित अन्नाचा पुरवठा करणे, विषमुक्त सुरक्षित अन्नाचा पुरवठा करणे, ग्रामीण भागातील पोषणमूल्याअभावी होणारे कुपोषण कमी करणे, या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. सुरुवातीला प्रत्येक गावात १० किट देण्यात येणार आहेत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने किट देण्याचे प्रमाण वाढवण्यात येणार आहे. डीपीसी, सीएसआर, पंचायत समिती सेस, जिल्हा परिषद सेस, फलोत्पादन विभागाची परसबाग योजना यासाठी उपयोगात आणली जाणार आहे. आत्माचे प्रकल्प संचालक यासाठी प्रयत्नशील आहेत.

या योजनेसाठी ५० महिला लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार असून गावातील कुपोषित बालके असलेल्या कुटुंबाला प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच गावातील अनुसूचित जातिजमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार असून उर्वरित लाभार्थी आत्मा नोंदणीकृत शेतकरी गट, महिला बचतगटातील असणार आहेत. ग्राम कृषी विकास समितीच्या मान्यतेने लाभार्थी निश्चित करण्यात येणार आहेत.

बियाणे वाटप : भोपळा, शिरी दोडका, चोपडा दोडका, भेंडी, चवळी, वाल, मेथी, गाजर, गवार, मिरची, कोथिंबीर या बियाणांचे वाण शेतकऱ्यांना देण्यात येणार आहेत. हे बियाण्यांचे किट एक गुंठ्यासाठी पुरेसे असून एका शेतकरी कुटुंबाची दैनंदिन गरज भागू शकणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांनी बियाणे बँक तयार करून स्वत: वापरून इतरांनाही बियाणे देणे अपेक्षित आहे. या बियाणांच्या लागवडीनंतर हंगामाच्या शेवटी येणाऱ्या बिया पुढच्या वर्षी वापरायचा आहेत. या बियाण्यांचा पुरवठा महाबीज करणार असून गुणवत्तेची जबाबदारी महाबीजची आहे.

शेतकरी ते ग्राहक थेट विक्री

राज्यातील कृषी क्षेत्राच्या दृष्टीने खरीप हंगामाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'विकेल ते पिकेल' अभियानांतर्गत शेतकरी ते ग्राहक थेट विक्री करण्यासाठी २०,३१४ ठिकाणी शेतकऱ्यांना खासगी, सार्वजनिक व शासकीय कार्यालय आवारात बाजार उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियानामुळे आता शेतकरी ते ग्राहक थेट विक्री होत आहे. याचा राज्यातील शेतकरी बांधवांना मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे.

पत आराखडा–पीक कर्जाचे नियोजन

राज्यस्तरीय बँकर समितीच्या बैठकीत राज्याच्या २०२२-२३ च्या २६ लाख ३३ हजार कोटी रुपयांच्या पतपुरवठा आराखड्यास मंजुरी देण्यात आली. यामध्ये प्राधान्य क्षेत्रासाठी ५ लाख २२ हजार ०६८ कोटी रुपयांच्या, तर इतर क्षेत्रासाठीच्या २१ लाख १० हजार ९३२ कोटी रुपयांच्या निधीचा समावेश आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यात ४५.३७ टक्क्यांची वाढ आहे.

कृषीसाठी १.२६ लाख कोटी रुपये

प्राधान्य क्षेत्रासाठीच्या निधीमध्ये कृषी क्षेत्रासाठी १ लाख २६ हजार ०५८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. यामध्ये पीक कर्जासाठीच्या ६४ हजार कोटी रुपयांसह मुदत कर्जाच्या ६२ हजार ०५८ कोटी रुपयांचा समावेश आहे. इतर प्राधान्य क्षेत्रासाठी ३ लाख ९६ हजार ०१० कोटी रुपये ठेवण्यात आले आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी कृषी प्रक्रिया उद्योग तसेच कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ करणे अपेक्षित आहे. बँकांनी अल्प भू-धारक शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा वाढवण्याबरोबरच पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, कुक्कुटपालन क्षेत्रांसह महिला बचतगटांना अधिक कर्ज द्यावे, अशी सूचना बँकांना देण्यात आली आहे. यामुळे स्थानिक पातळीवर रोजगार वाढून विकासाला चालना मिळेल.

पीक कर्जासाठी पुढाकार

केंद्र शासनाने बँकांना पीक कर्जापोटी द्यावयाचा २ टक्क्यांचा व्याज परतावा पूर्ववत सुरू ठेवावा, असा ठरावही राज्यस्तरीय बँकर समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला आहे. तसेच शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी पीक कर्जाची तातडीने आवश्यकता आहे ही बाब लक्षात घेऊन बँकांनी मिशनमोड स्वरूपात शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वाटप करावे, आवश्यक असल्यास स्थानिक पातळीवर जिल्हाधिकाऱ्यांची मदत घेऊन यासाठी बँक मेळावे आयोजित करावेत, कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा वेगाने विकास होण्यासाठी प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेतून महाराष्ट्राला अधिकाधिक निधी द्यावा, अशा सूचना बँकांना देण्यात आल्या आहेत.

कृषी अन्नप्रक्रिया उद्योगांना वित्तपुरवठा

राज्य शासनाने कृषी अन्नप्रक्रिया संचालनालयाची स्थापना करून कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याचे धोरण स्वीकारले आहे. याअंतर्गत येणाऱ्या अर्जांना बँकांनी लवकरात लवकर कर्ज पुरवठा करावा, ज्या जिल्ह्यांचा कॅश डिपॉझिट रेशो कमी आहे, त्या जिल्ह्यांमध्ये बँकांनी विशेष उपाययोजना राबवाव्यात, याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

ग्रामस्तरावर बँक शाखा

प्रत्येक गावाच्या ५ कि.मी. परिसरात बँकांची शाखा असावी असे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागात सक्षमतेने बँक शाखा सुरू राहतील, याकडे बँकर समितीने लक्ष द्यावे, जिल्हास्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या सहकार्याने बँकांनी निश्चित केलेल्या

उद्दिष्टाप्रमाणे सक्षमतेने पतपुरवठा करावा, ज्या शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळाले नाही अशा जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीने मिशनमोड स्वरूपात पीक कर्जाचे वितरण व्हावे, यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

खरीप हंगामासाठी उपाययोजना

राज्याच्या खरीप हंगाम २०२२ मधील कापूस पिकाखाली लागवडीखालील ४२ लाख हेक्टर क्षेत्र अपेक्षित आहे. सोयाबीन पिकाखाली ४६ लाख हेक्टर, भात पिकाखाली १५.५० लाख हेक्टर, मका पिकाखाली ९.५० लाख हेक्टर तर कडधान्य पिकाखाली २३ लाख हेक्टर क्षेत्र आणण्याचे नियोजन केले आहे.

राज्यात बियाणांचा तुटवडा भासणार नाही यासाठी नियोजन करण्यात आले आहे. खरीप हंगामात कापूस सोयाबीन बरोबरच ज्वारी, बाजरी, भात, मका, तुर, मुग, उडीद, भुईमूग व तीळ ही इतर पिके घेतली जातात. या बियाणांचादेखील तुटवडा भासणार नाही यासाठी नियोजन करण्यात आले आहे.

त्याचबरोबर खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्यभरात खते बियाणे व कीटकनाशके यांची बनावट निविष्ठा विक्री होऊ नये, यासाठी राज्य जिल्हा व विभागस्तरावर भरारी पथके स्थापन केली आहेत. कृषी निविष्ठा या दर्जेदार गुणवत्तेच्या असाव्यात, यासाठी राज्यात ११३१ गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक कार्यरत असून त्यांचे माध्यमातून कृषी निविष्ठांची नमुने काढणे व प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्याचे काम करण्यात येत आहे.

भरारी पथक, नियंत्रण कक्ष

खतांचा काळाबाजार, साठेबाजी, चढ्या दराने खताची विक्री, खत उपलब्ध असतानाही खत उपलब्ध करून न देणे इत्यादी गोष्टी टाळण्याकरिता विभाग, जिल्हा व तालुकास्तरावर भरारी पथक स्थापन करण्यात आले आहेत. त्याचबरोबर नियंत्रण कक्ष विभाग, जिल्हा व तालुका, आयुक्तालय स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक ८४४६११७५००, ८४४६३३१७५० व ८४४६२२१७५० उपलब्ध आहेत. तक्रार नोंदवण्याकरिता controlroom.qc.maharashtragmail.com हा इमेल उपलब्ध करून देण्यात आला आहे.

कृषी सेवा केंद्रनिहाय नियोजन

कृषी सेवा केंद्रनिहाय उपलब्ध खताचे आसपासच्या गावाच्या मागणीप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे. ऐन हंगामात खत वितरणात सुसूत्रता राहण्यासाठी कृषी सेवा केंद्र निहाय अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून तुटवड्याच्या काळात संपर्क अधिकारी यांच्या उपस्थितीत खतांचे वितरण करण्यात येणार आहे. विशिष्ट खताचा आग्रह धरू नये. बाजारात पर्यायी सरळ व संयुक्त खते उपलब्ध आहेत. पर्यायी खत उपलब्धतेबाबत नियोजन करण्यात आले आहे. डीएपीला पर्याय म्हणून

एसएसपी + युरिया कॉम्बिनेशन, प्रोम यांचा वापराला चालना देण्यात येत आहे. पोटॅशला पर्याय म्हणून पीडीएम वितरणासाठी खत कंपन्यांना उद्युक्त करण्यात येत आहे. वॉटर सोलुबल फर्टिलायझर्सची उपलब्धता व वापर वाढवण्याबाबत प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात खते, बियाणांच्या उपलब्धतेबाबत तुटवडा भासणार नाही. राज्यात खते, बियाणांचा साठा पुरेसा उपलब्ध आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी काळजी करू नये.

अन्नप्रक्रिया संचालनालयाची स्थापना

अन्नप्रक्रिया संचालनालयाची स्थापना करण्यात आली असून यासाठी शहरानजीकच्या ३५० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. प्रक्रियेशी निगडित पुढील योजनांचे समन्वय आणि अभिसरण. १. मुख्यमंत्री अन्नप्रक्रिया २. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना ३. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान ४. नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (POCRA) ५. मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (SMART).

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा)

निवडक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यासाठी वर्ल्ड बँकेच्या संयुक्त विद्यमाने ४००० कोटी रुपयांचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. मार्च २०२२ अखेरपर्यंतचा एकूण प्रकल्प खर्च २२६१.५३ कोटी रुपये इतका आहे.

अर्ज एक योजना अनेक

महाडिबीटीपोर्टलवर (https://mahadbtmahait.gov.in/) शेतकरी योजना या सदराखाली जाऊन विविध लाभाच्या घटकांसाठी शेतकरी अर्ज करू शकतात. सद्य:स्थितीत पोर्टलवर नोंदणीकृत शेतकरी २२.४ लाख असून ५५.५७ लाख घटकांसाठी शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. १ एप्रिल २०२२ पर्यंत अनुदान वितरित करण्यात आले आहे. ही रक्कम १३३० कोटी रुपये इतकी आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशन

विषमुक्त सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यासाठी विदर्भातील आत्महत्याग्रस्त/नैराश्यग्रस्त अशा अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्ह्यांत अंमलबजावणी करण्यात येत आहे. परंपरागत कृषी विकास योजनेबरोबर अभिसरणाद्वारे (कन्व्हर्जन्स) एकूण ३५५ गट स्थापित करण्यात आले आहे. मिशनअंतर्गत एकूण ३८५ गट स्थापित.

शेतकऱ्यांची रिसोर्स बँक

नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणाऱ्या शेतकऱ्यांची रिसोर्स बँक तयार करण्यात

आली असून या शेतकऱ्यांना विस्तार कार्यामध्ये सहभागी करून घेण्यात आले आहे. अशा ५००९ शेतकऱ्यांची यादी कृषी संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. (एकूण रिसोर्स बँक शेतकरी संख्या-७२२०) रिसोर्स बँकेतील शेतकऱ्यांनी १३ हजार ४६१ विविध कृषी विस्तार कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना

या योजनेत राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी व शेतकऱ्यांच्या कुटुंबातील खातीधारक खातेदार म्हणून नोंद असलेले कोणतेही एक सदस्य (आई-वडील, शेतकऱ्याची पती/पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी) यांचा समावेश. २०२१-२२ (अंतरिम) मध्ये ११११ कुटुबांना ही मदत देण्यात आली आहे. मदतीपोटी २२.१० कोटी रुपये एवढी रक्कम वितरित करण्यात आली आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान

या अभियानांतर्गत ड्रॅगन फ्रुट, अव्हॅकाडो, स्ट्रॉबेरी, पॅशन फ्रुट लागवडीसाठी भर देण्यात येत आहे. २०२१-२२मध्ये यासाठी ४३.५९ कोटी रुपये खर्च करण्यात आला, तर २०२२-२३ साठी २१२.९२ कोटी रुपये रकमेचा आराखडा राबवण्याचे नियोजन आहे.

रोपवाटिका योजना

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर रोपवाटिका योजनेंतर्गत कृषी पदवीधर महिला- महिला शेतकरी- महिला शेतकरी गट- अल्प व अत्यल्प भू-धारक भाजीपाला उत्पादक शेतकरी व त्यांचे गट यांना लाभार्थी म्हणून प्राधान्य दिले जाते . २०२०-२१ व २०२२-२३ मध्ये १५०० रोपवाटिकांसाठी ३४८४.५० लाख रुपये रकमेस मंजुरी देण्यात आली आहे.

पीक विमा

नैसर्गिक आपत्तीच्या परिस्थितीत पिकांना विमा संरक्षण देण्यासाठी राज्यात 'प्रधानमंत्री पीक विमा योजना' राबवण्यात येत आहे. योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ९६.४६ लाख शेतकरी सहभागी झाले असून ५७.१६ लाख हेक्टर क्षेत्रावरील पीक संरक्षित करण्यात आले. त्यापैकी खरीप हंगामासाठी ६४.०६ लाख रुपये शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची रक्कम ३८२७.४७ कोटी रुपये निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्तीअंतर्गत २३८९.८६ कोटी रुपये व हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान ४५०.८९ कोटी रुपये इतके निश्चित करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंमलबजावणीतील ४-५ वर्षांतील अनुभव विचारात घेऊन राज्याने बीड जिल्ह्यात योजनेची अंमलबजावणी करताना विमा कंपनीच्या आर्थिक नफ्यावर मर्यादा आणून गेले २ वर्षापासून बीड जिल्ह्यात पीक विमा योजनेची अंमलबजावणी केली आहे. त्यातून प्राप्त झालेले निष्कर्ष विचारात घेऊन केंद्र सरकारकडे संपूर्ण राज्यात बीड मॉडेलची अंमलबजावणी करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच राज्य शासनदेखील याबाबत सकारात्मक विचार करून निर्णय घेणार आहे.

महत्त्वपूर्ण उपक्रम/मोहीम

- जमीन सुपीकता निर्देशांक फलक वाचन व त्याआधारित संतुलित खत वापर प्रत्येक गावात शेतकऱ्यांच्या सभा घेऊन ग्रामपंचायतीमध्ये प्रदर्शित केलेल्या जमीन सुपीकता निर्देशांक फलक आधारित खत वापराबाबत जनजागृती करण्यात येत आहे.
- २०१५-१६ ते २०२१-२२ या कालावधीत एकूण ५८.७९ लाख माती नमुन्यांची तपासणी करून एकूण २६६ लाख मृद् आरोग्य पत्रिकांचे वितरण.
- **कृषिक ॲप** : खताच्या विविध संयोजन पर्यायाकरिता शेतकऱ्यांच्या मोबाईलमध्ये 'कृषिक ॲप' डाऊनलोड करून त्याच्या वापराबाबत मार्गदर्शन केले जाते.
- विकेल ते पिकेल' अभियानांतर्गत आतापर्यंत शेतकरी ते ग्राहक थेट विक्री (संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियान) अंतर्गत २०,३१४ ठिकाणी शेतकऱ्यांना खासगी, सार्वजनिक व शासकीय कार्यालय आवारात बाजार उपलब्ध करून देण्यात आले आहेत.
- **मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट) : -** शेतमालाच्या स्पर्धात्मक व सर्वसमावेशी मूल्यसाखळ्या या प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात येत आहेत. वर्ष २०२२-२३ मध्ये १०० कोटी रुपये तरतूद उपलब्ध.
- **पीकस्पर्धा** : ही स्पर्धा १७ पिकांसाठी लागू करण्यात आली असून यामध्ये खरिपच्या ११ आणि रब्बीच्या ६ पिकांचा समावेश आहे.
- **विविध कृषी पुरस्कार पुरस्कार** : कृषी विभागांतर्गत कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांसाठी एकूण ९ प्रकारचे पुरस्कार देण्यात येतात. त्याचबरोबर युवा शेतकरी पुरस्कार, उत्कृष्ट कृषी संशोधक पुरस्कार या पुरस्कारांचाही नव्याने समावेश करण्यात आला आहे.
- **प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजना (पीएमएफएमई) :-** देशपातळीवर वैयक्तिक लाभार्थ्यांचे सर्वाधिक ६८३ प्रकल्पास मंजुरी. एकूण प्रकल्प मूल्य १०१.५७ कोटी रुपये, बीज भांडवल घटकांतर्गत ४,१३८ उद्योगांसाठी ११,७२० महिला बटतगट सदस्यांना ४१.२४ कोटी रुपये निधी उपलब्ध. महाराष्ट्र राज्य देशात प्रथम क्रमांकावर.

विभागीय संपर्क अधिकारी

देशामध्ये महाराष्ट्र राज्य कृषी क्षेत्रात अग्रगण्य आहे. राज्यातील जमीन, हवामान, पाऊसमान इत्यादींमध्ये वैविध्यता आहे. त्याचबरोबर देशातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील शेतकरी सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात अग्रेसर आहे. त्यामुळे फलोत्पादनाच्या बाबतीतही राज्याने देशपातळीवर इतर राज्याच्या तुलनेत क्रांतिकारक प्रगती केली आहे. फलोत्पादक शेतकऱ्यांच्या विकासासाठी राज्य शासनाने विविध निर्णय घेतले असून त्यासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांच्या माध्यमातून विक्रमी फलोत्पादन होत आहे.

विक्रमी फलोत्पादन

राजू धोत्रे

राज्यातील वैविध्यपूर्ण हवामानामुळे वेगवेगळ्या प्रकारची फळे, भाजीपाला, फुले, औषधी सुगंधी वनस्पती, मसाला पिके इत्यादींची लागवड केली जाते. त्याला जोड मिळाली आहे ती राज्य शासनाच्या महत्त्वपूर्ण योजनांची. राज्याच्या सकल उत्पादनामध्ये निश्चितच फलोत्पादनाचा मोठा वाटा राहिला आहे. फलोत्पादन विभागामार्फत फळे, भाजीपाला व फूलपिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या दृष्टिकोनातून वैविध्यपूर्ण योजना राबवल्या गेल्यामुळे फलोत्पादनाच्या प्रगतीस चांगली चालना मिळाली आहे.

रोपवाटिका व रोजगार हमीची साथ

शासनाने रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीची योजना सुरू केल्यामुळे फलोत्पादन क्षेत्र विस्तारास चांगली चालना मिळाली व देशात राज्य फलोत्पादन पिंकामध्ये अग्रगण्य ठरले आहे. राज्यामध्ये दर्जेदार रोपनिर्मिती व गुणवत्तापूर्ण कलमे, रोपांची निर्मिती करून शेतकऱ्यांना उच्चप्रतीची कलमे, रोपे पुरवण्यासाठी राज्यातील शासकीय रोपवाटिकांची स्थापना करण्यात आली आहे.

निर्यातीतही अग्रेसर

राज्याने केवळ फलोत्पादन पिकाच्या क्षेत्र वाढीमध्येच प्रगती केलेली आहे, असे नाही तर राज्यातील मोठ्या प्रमाणावर फळे व भाजीपाल्याचीही निर्यात युरोपियन युनियन व इतर देशांमध्ये होत आहे. राज्यामधून आंबा, द्राक्ष, केळी, भाजीपाला इ. पिकांची मोठ्या प्रमाणावर निर्यात होत असून, देशाच्या पातळीवर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र निर्यातीमध्ये सुद्धा अग्रगण्य राज्य आहे.

राज्यातील फलोत्पादनामध्ये झालेल्या वाढीमध्ये शासकीय योजनांचा जसा सहभाग आहे, तसाच राज्यातील शेतकऱ्यांचेसुद्धा मोठे योगदान आहे. राज्यात विविध फळांच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या असून त्यांच्याद्वारे फळे, फुले व भाजीपाला पिकांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती व निर्यात केली जाते. त्यामुळे राज्याचे स्थान देशाच्या व जगाच्या नकाशावर अधोरेखित झाले आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाच्या माध्यमातून फळे, भाजीपाला, पुष्पोत्पादन यांच्या उत्पादनाबरोबरच मूल्यवर्धनामध्येसुद्धा राज्याने आघाडी घेतली आहे.

राज्यातील शेतकरी समृद्ध व्हावा, त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळावा, चांगली बाजारपेठ प्राप्त व्हावी याचबरोबर नव्या तंत्रज्ञानाचा वापर जास्तीत जास्त व्हावा यासाठी राज्य शासन राबवत असलेल्या काही वैविध्यपूर्ण योजना व उपक्रम पुढीलप्रमाणे...

'सिट्रस इस्टेट'ची स्थापना

औरंगाबाद जिल्ह्यातील तालुका फळरोपवाटिका-पैठण प्रक्षेत्रावर मोसंबी फळपिकासाठी 'सिट्रस इस्टेट' ही योजना राबवण्यास तसेच 'सिट्रस इस्टेट'ची स्थापना करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचे कार्यक्षेत्र पैठण केंद्रबिंदू मानून १०० किलोमीटर परिघात राहील. या 'सिट्रस इस्टेट'साठी ३६ कोटी ४४ लाख ९९१ रुपये एवढी तरतूद टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मोसंबी फळपिकाची उच्च दर्जाची कलमे पुरेशा प्रमाणात निर्माण करण्यासाठी तालुका फळ रोपवाटिका-पैठण, जि. औरंगाबाद या फळ रोपवाटिका प्रक्षेत्रावर उच्च तंत्रज्ञानावर आधारित फळ रोपवाटिका स्थापन करणे, सदर प्रक्षेत्रावर मोसंबीची जातिवंत मातृवृक्ष लागवड करणे, मोसंबी फळपिकाच्या शास्त्रोक्त लागवड पद्धतीच्या फळबागा विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांना कीड-रोगमुक्त उच्च दर्जाची कलमे पुरेशा प्रमाणात किफायतशीर दराने उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

नवीन सिंचन विहिरी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात नवीन सिंचन विहिरींची कामे सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या सिंचन विहिरींची मर्यादा ५ वरून २० पर्यंत वाढवण्यात आली आहे. ग्रामपंचायत लोकसंख्या १५०० असेल, तर ५ नवीन सिंचन विहिरी, १५०१ ते ३००० पर्यंत १०, ३००१ ते ५००० पर्यंत १५ तर ५००० च्या पुढे २० नवीन सिंचन विहिरींची कामे मंजूर करण्यात येत आहेत.

फळबाग लागवड कार्यक्रम

रोजगार हमी योजना विभागांतर्गत राबवण्यात येत असलेल्या फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड

करण्यास तसेच ही योजना पुढे चालू ठेवण्यास ८ जुलै २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या योजनेंतर्गत १४ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व राज्य रोजगार हमी योजना अंतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत कलमे/रोपे तसेच फळबाग लागवड व वृक्ष लागवड याकरिता राज्यातील स्थानिक भौगोलिक व क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर, कलमे, रोपे, वृक्ष निवडण्याची मुभा संबंधित लाभार्थीस देण्यात आली आहे.

फळबागांची पुनर्लागवड

निसर्ग चक्रीवादळामुळे कोकण विभागात नुकसानग्रस्त फळबागांचे रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजनेंतर्गत पुनर्लागवड व पुनरुज्जीवन लागवड कार्यक्रम घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य रोजगार हमी योजनेशी निगडित फळबाग योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. २०२०-२०२१ करिता ५० कोटी रुपयांचा निधीची तरतूद करण्यात आली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी रोपवाटिका

राज्य फलोत्पादनामध्ये आघाडीवर आहे. तसेच मोठ्या प्रमाणात भाजीपाला पिकाचे व्यावसायिक पद्धतीने लागवड करून उत्पादन घेतले जाते. त्याची निर्यातही मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मागील दोन-तीन वर्षांपासून भाजीपाला पिकाचे निर्यातक्षम व विषमुक्त उत्पादन

करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. त्यामुळे भाजीपाला अभियानाच्या चांगल्या जाती व चांगली रोपे याची मागणी वाढत आहे. त्या दृष्टीने भाजीपाला रोपांची नियंत्रित वातावरणामध्ये तयार झालेली कीड व रोगमुक्त भाजीपाला रोपांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना राबवण्यात येत असून ही योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरत आहे.

शेत, पाणंद रस्ते योजना

राज्यातील शेतकरी आणि गावकरी समृद्ध व्हावेत, या दृष्टिकोनातून 'मी समृद्ध तर गाव समृद्ध आणि गाव समृद्ध तर माझा महाराष्ट्र समृद्ध' ही संकल्पना मनरेगा व राज्य रोहयोच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. सद्य:स्थितीत राज्यात पालकमंत्री शेत, पाणंद रस्ते योजना राबवण्यात येत आहे. ही योजना राबवताना येणाऱ्या अडचणी दूर करून या योजनेतील कामांसाठी मनरेगामधून आवश्यक असा निधी उपलब्ध व्हावा, यासाठी मनरेगा आणि राज्याची रोहयो यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. यातून मनरेगामध्ये होणाऱ्या विविध कामांमधील अकुशल व कुशलच्या संयोजनातून शेत-पाणंद रस्ते बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात २४ हजार कि.मी. रस्ते करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

देशाच्या सागरी किनारपट्टीवरील राज्यांमध्ये मत्स्यव्यवसायाला महत्त्वाचे स्थान असून देशाच्या आर्थिक विकासात या क्षेत्राचा मोठा वाटा आहे. महाराष्ट्राला सागरी व्यवसायाची प्राचीन परंपरा असून राज्याला लाभलेल्या ७२० कि.मी. च्या समुद्रकिनाऱ्यावर ठाणे, पालघर, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे सागरी जिल्हे असून या ठिकाणी होणारे मत्स्योत्पादन आणि मत्स्यव्यवसायाच्या संधींमुळे महाराष्ट्र हे देशातील एक प्रमुख मत्स्यउत्पादन करणारे, मत्स्यपुरवठा करणारे राज्य ठरले आहे.

मत्स्यव्यवसायात अग्रेसर

किशोर गांगुर्डे

रोजगार, अन्न व पौष्टिक सुरक्षा, परकीय चलन, मिळकत आणि लाखोंच्या उत्पन्नासाठी विशेषत: ग्रामीण भागातील विकासातील महत्त्वपूर्ण कामांमुळे मत्स्यपालन विकास कार्यक्रमात मत्स्यव्यवसाय क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. या क्षेत्राने राज्यामध्ये प्राथमिक पातळीवर सुमारे ३ लाख ५५ हजारांपेक्षा अधिक मच्छीमार, मत्स्य शेतकरी व या व्यवसायावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करून दिले आहे.

राज्यातील मत्स्योत्पादनाच्या वृद्धीबरोबरच या क्षेत्राच्या विकासासाठी विविध कार्यक्रम राज्यात राबवण्यात येत आहेत. उपलब्ध जलक्षेत्रातून जास्तीत जास्त मासळीचे उत्पादन घेणे, जलक्षेत्र मत्स्यव्यवसायाखाली आणून उत्पादनात वाढ करणे, पारंपरिक मच्छीमारांना सक्षम बनवण्यासाठी अद्ययावत व प्रगत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याबरोबरच मोफत विमा संरक्षण, तलाव ठेक्याने देणे, मत्स्यसंगोपनाद्वारे तलावातील मत्स्य उत्पादनात वाढ करण्यासह विविध कार्यक्रम राबवण्यात येत आहेत. सागरी क्षेत्रातील मासेमारी नौकांवर वायरलेस, फिशफाइंडर व जीपीएस यंत्रणा बसवणे, अवैध मासेमारांवर कारवाई करणे, दुर्बल घटकांतील मच्छीमारांच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या दृष्टीने नवीन कार्यक्रमाची आखणी करणे तसेच अनुसूचित जाती-जमातीसारख्या समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींना मत्स्यव्यवसायात सामावून घेऊन उपजीविकेसाठी व्यवसाय उपलब्ध करून देणे असे विविध कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहेत.

राज्यातील मत्स्यबीजाची मागणी स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने शासकीय

मत्स्यबीज केंद्रे सार्वजनिक-खासगी-भागीदारी तत्त्वावर भाड्याने देण्यात येत असून प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेतून खासगी मत्स्यबीज निर्मितीला चालना देण्याबरोबरच शासकीय व खासगी मत्स्यबीज संवर्धन क्षेत्र वाढवण्यावर भर देण्यात येत आहे.

मच्छीमार बंदरांचे आधुनिकीकरण

केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ससून गोदी बंदराच्या आधुनिकीकरणाचे काम महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत सुरू आहे. ससून गोदी मासेमारी बंदर हे जुने मत्स्यबंदर असून या बंदराची एकूण जागा ५.३९ हेक्टर एवढी आहे. या बंदराचे एकूण वार्षिक मत्स्योत्पादन सरासरी ४८,००० मे.टन असून जुन्या व नव्या ससून गोदी मासेमारी बंदराच्या व आधुनिकीकरणाकरिता ५१.१७ कोटी रुपयांच्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गतच करंजा, आनंदवाडी व मिरकरवाडा या लहान बंदरांचे बांधकाम करण्यात येत असून यासाठी अनुक्रमे १४९.८० कोटी, ८८.४४ कोटी आणि १४६.४९ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून बांधकाम प्रगतिपथावर आहे.

अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धन

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभापासून अवरुद्ध पाण्यात मत्स्यसंवर्धनाची योजना सुरू आहे. मत्स्यसंवर्धनास योग्य असलेल्या जलक्षेत्रात मत्स्यबीज संचयन करण्यात येऊन मत्स्यशेतीद्वारे गोड्या पाण्यातील मत्स्योत्पादन वाढवणे, हा या योजनेचा हेतू आहे. दरवर्षी मत्स्यव्यवसाय विभागाकडून जलद वाढणाऱ्या जातीचे स्थानिकरीत्या निर्माण केलेले मत्स्यबीज संवर्धकांना पुरवून तलाव जलाशयामध्ये मत्स्यशेती करण्यास प्रोत्साहन देण्यात येते. राज्यामधील नवीन तयार झालेल्या तलावामध्ये जलद गतीने वाढणाऱ्या मत्स्यबीजाची शासनामार्फत साठवणूक करण्यात येते. या योजनेतून २०२०-२१ मध्ये सुमारे २६९३ लक्ष मत्स्यबीजाचे संचयन होऊन त्यातून वार्षिक ९७ हजार ३१२ टन मत्स्योत्पादन झाले आहे.

मासेमारी साधनांच्या खरेदीवर अर्थसाहाय्य

मच्छीमारी सहकारी संस्थांच्या सभासदांना महत्त्वाच्या मासेमारी साधनांच्या खरेदीवर अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. अनुदानाचे प्रमाण खालीलप्रमाणे :-

- सागरी मत्स्योद्योगासाठी आवश्यक असलेली नायलॉन सूत/तयार जाळी/ मोनोफिलामेंट सूत जाळीच्या किमतीच्या १५ टक्के, तर भूजल मत्स्योद्योगासाठी आवश्यक असलेल्या नायलॉन सूत/ तयार जाळीच्या तसेच मोनोफिलामेंट जाळीच्या सुताच्या किमतीच्या ५० टक्के अनुदान दिले जाते.
- नौका बांधण्यासाठी अनुदान- प्रकल्प किमतीच्या ५० टक्के किंवा रु. तीन हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल ती.

लहान मच्छीमारांना मासेमारीसाठीच्या साधनांवर अर्थसाहाय्य

- **रापणकारांना रापणीच्या सूतावर अनुदान -** नायलॉन सूत/जाळी किंवा मोनोफिलामेंट सिंथेटिक सूत/जाळी किंवा फिलामेंट- १५ टक्के
- **बिगर यांत्रिकीकांसाठी लहान मासेमारांना अर्थसाहाय्य -** प्रकल्प किमतीच्या ५० टक्के परंतु ३० हजार रुपयांपर्यंतच्या मर्यादेत. यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान सागरी विभागात देण्यात येत होते.

मच्छीमार युवकांना प्रशिक्षण

मासेमारी यांत्रिकी नौका चालवण्यासह भूजलाशयातील मच्छीमार विकासाचे मच्छीमार युवकांना विभागाच्या विविध प्रशिक्षण केंद्रांमधून प्रशिक्षण देण्यात येते. मच्छीमार यांत्रिक बोटींच्या संख्येत वाढ झाली असल्यामुळे या बोटीवरील इंजिनाची निगा राखण्यासह ते चालवण्याबरोबरच कोणत्या पद्धतीने मच्छीमारी करून उत्पादन वाढवण्याबाबत मच्छीमार युवकांना प्रशिक्षण दिले जाते. बृहन्मुंबईतील वर्सोवा, रत्नागिरी, वसई, अलिबाग, सातपाटी, मालवण येथे प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना

२०२१-२२ ते २०२४-२५ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र शासनाची प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजना राबवण्यात येत आहे. केंद्रीय क्षेत्रीय योजना, लाभार्थीभिमुख योजना व लाभार्थी हिस्सा नसलेल्या योजना राबवण्यात येत आहे. देशातील मत्स्यव्यवसाय क्षेत्राच्या टिकाऊ व जबाबदार विकासाच्या माध्यमातून नीलक्रांती घडवून आणण्यासाठी प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत मत्स्यपालक, मासे कामगार, मासे विक्रेते, अनुसूचित जाती- जमाती, महिला, दिव्यांग व्यक्ती, बचतगट, मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील संयुक्त उत्तरदायित्व गट, मत्स्यव्यवसाय फेडरेशन, उद्योजक, खासगी कंपन्या आणि मत्स्य उत्पादक संघटना/कंपन्यांना मत्स्यपालनाच्या विकासाचे उपक्रम राबवण्याकरिता आर्थिक सहाय्य केले जात आहे. या योजनेतून केंद्रपुरस्कृत लाभार्थी योजनेसाठी सर्वसाधारण गटाकरिता केंद्र २४ टक्के अनुदान, १६ टक्के राज्याचे अनुदान व लाभार्थींचा सहभाग ६० टक्के असणार आहे. अनुसूचित जाती व जमाती तसेच महिलांसाठी ३६ टक्के, यात केंद्र २४ टक्के, राज्य आणि लाभार्थी सहभाग ४० टक्के राहील. केंद्रपुरस्कृत गैर लाभार्थी योजनेत ६० टक्के केंद्राचा, तर ४० टक्के राज्याचा हिस्सा राहील. केंद्रपुरस्कृत लाभार्थी हिस्सा नसलेल्या योजनेसाठी केंद्राचा हिस्सा ६० टक्के, तर राज्याचा हिस्सा ४० टक्के आहे.

राज्यातील मत्स्यव्यवसायावर दृष्टिक्षेप

- राज्यामध्ये ३.५५ लाख हेक्टर गोड्यापाण्याचे क्षेत्र आहे.
- ७२० कि.मी. लांबीच्या सागरी किनारपट्टीमध्ये १,१२,५१२ चौ. कि. मी. सागरी मासेमारी क्षेत्र आहे.
- १७,१२५.१५ हेक्टर निमखारे पाण्याचे क्षेत्र असून यातील खाजण जागा कोळंबी संवर्धनाकरिता उपयुक्त आहे.
- २०२०-२१ मध्ये सागरी क्षेत्रातून ३,९८,५११ मे.टन मत्स्योत्पादन झाले असून त्याचे मूल्य ६००६.४८ कोटी इतके आहे.
- भूजल क्षेत्रातून १२४५८७ मे. टन मत्स्योत्पादन असून त्याचे मूल्य १६५८.८१ कोटी इतके आहे.
- राज्यातून ११०६५३ मे.टन मासे निर्यात करण्यात आले असून त्यापासून ३६८१.२२ कोटी परकीय चलन महाराष्ट्र राज्यास प्राप्त झाले आहे.
- सद्य:स्थितीत राज्यामध्ये एकूण ३२ मत्स्योत्पादन केंद्र व २ कोळंबी बीज उत्पादन केंद्र आहेत. ३ मत्स्यबीज उत्पादन केंद्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे आहेत. ७ केंद्र भाडेपट्टयाने देण्यात आले आहेत.
- ३२ मत्स्यबीज संवर्धन केंद्र कोळंबी बीज संवर्धन केंद्र १ असे एकूण ३३ संवर्धन केंद्रे राज्यात आहेत.
- सागरी मासेमारी क्षेत्रात १७३ मासळी उतरवण्याची केंद्रे आहेत.
- सागरी भागात १६३१४ यांत्रिकी तर ६९७६ बिगर यांत्रिकी नौका असून १५५४ ओबीएम कार्यन्वित आहे.

महामत्स्य अभियान

सागरी, निमखारे पाणी आणि भूजलाशयातील मत्स्योत्पादनासह मत्स्योद्योगात वाढ करून अधिकाधिक रोजगार निर्मिती करून मच्छीमारांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त २५ मे ते ७ ऑगस्ट या कालावधीत राज्यात 'महामत्स्य अभियान' राबवण्यात येत आहे. सागरी जलक्षेत्रामध्ये अवैधरीत्या होणाऱ्या मासेमारीला प्रतिबंध घालण्याबरोबरच मत्स्यव्यवसाय विकासाच्या प्रमुख उद्दिष्टांची पूर्तता होण्याकरिता मत्स्योत्पादन वाढवण्यासाठी महामत्स्य अभियान राज्यात राबवण्याची संकल्पना पुढे आली. मत्स्योउत्पादनासह मत्स्योद्योगात वाढ करून अधिकाधिक रोजगाराची निर्मिती करून या व्यवसायातील म्हणजेच मच्छीमारांची आर्थिक सामाजिक स्थिती सुधारण्याचे आणि त्यातून मत्स्यव्यवसाय विकासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे, तरीही महामत्स्य अभियानाद्वारे प्रथिनयुक्त आहार, जनजागृती, प्रशिक्षण, पायाभूत सुविधा, आस्थापनांचे अद्ययावतीकरण, ई-गव्हर्नन्स आणि अभिनव प्रकल्प राबवण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

राज्यातील शेळीपालन व्यवसाय हा शेतीला पूरक व्यवसाय म्हणून फायदेशीर ठरला आहे. अल्प भू-धारक, अत्यल्प भू-धारक तथा भूमिहीन ग्रामीण लोकांच्या उपजीविकेचे शेळीपालन व्यवसाय हे महत्त्वपूर्ण साधन आहे. त्यामुळे शेतकरी, बेरोजगार तरुण याकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहत आहेत. पशुसंवर्धन विभागाने शेळीपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम व योजना राबवल्या आहेत. त्याचरोबर विविध योजनांच्या माध्यमातून शेतकरी व महिलांना शेळीपालन करण्यासाठी प्राधान्य दिले जात आहे.

शेळीपालनः प्रगतीची दिशा

राजू धोत्रे

राज्यामध्ये शेळीपालन व्यवसाय हा शेतमजूर, अल्प, अत्यल्प भू-धारक, भटकंती करणारा समाज तसेच आदिवासी यांच्या उपजीविकेचा एक प्रमुख व्यवसाय आहे. शेळ्यांपासून दूध, मांस, कातडी व लेंडीखताचे उत्पादन मिळत असल्याने राज्यामध्ये अंदाजे ४८ लाख कुटुंबांना शेळी पालनामधून अर्थार्जन होत आहे. अत्यंत कमी भांडवलातसुद्धा शेळीपालन व्यवसाय सुरू करता येऊ शकतो. त्यामुळे शेतकरी, बेरोजगार तरुण व महिला शेतऱ्यांना शेळीपालनासाठी प्रोत्साहित केले जात आहे.

महिलांना शेळ्यांचे वाटप

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाची पूर्वी राज्यात १० प्रक्षेत्र होते, ते आता १६ प्रक्षेत्र झाले आहेत. मांडग्याळ या मेंढीच्या जातीस केंद्र शासनाचे मानांकन प्राप्त झाले आहे. मांडग्याळ ही मेंढीची जात महाराष्ट्रात प्रसिद्ध जात म्हणून ओळखली जात आहे. राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येतात. याअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी व मेंढी महामंडळ महाराष्ट्र शासन व गोट बँक ऑफ कारखेडा यांचे संयुक्त विद्यमाने ग्रामीण भागातील पशुपालकांचे जीवनमान उंचावण्याकरिता ग्रामीण भागातील महिलांना शेळ्या वाटप करण्यात आल्या आहेत.

नागपूर जिल्ह्यातील ५०० महिलांना सहभागी करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी महामंडळाच्या प्रक्षेत्र बोंद्री येथे गोट बँकेची स्थापना करण्यात आली आहे. या अंतर्गत महामंडळाच्या निधीतून प्रायोगिक तत्त्वावर ५०० महिलांना शेळ्यांचे वितरण करण्यात आले आहे. येत्या काळात संपूर्ण महाराष्ट्रात हा प्रयोग राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक विकासात भर पडेल.

संग्रहीत

शेळीपालनासाठी पायाभूत सुविधा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या प्रक्षेत्रावरचे बळकटीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी ९४ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले आहे. यामध्ये पशुधन खरेदी करणे, नवीन वाडे बांधकाम, कृत्रिम रेतन कार्यक्रम राबवणे, मुरघास निर्मिती यंत्रसामग्री, शेळी/मेंढी पालन प्रशिक्षण केंद्र इमारत बांधकाम, प्रशिक्षणार्थी निवासी इमारत बांधकाम व शेतकरी निवासस्थान, जमीन विकास, सिंचन सुविधा विहीर, पाईपलाईन, इलेक्ट्रिक मोटर इत्यादींचा समावेश आहे. त्याचबरोबर ट्रॅक्टर ट्रॉली, कृषी अवजारे व चारा कापणी यंत्र, वैरण साठवणूक गोडाऊन, शेळी-मेंढी खाद्य कारखाना, कार्यालय इमारत बांधकाम, अधिकारी कर्मचारी निवास बांधकाम, प्रक्षेत्रावरील आवश्यक साधनसामग्री, सुरक्षा भिंत, सिल्वी-पाश्चर विकसित करणे, अंतर्गत रस्ते, अल्ट्रासोनोग्राफी युनिट, फिरते शेळी-मेंढी चिकित्सालय वाहन खरेदी, फॉण्डर ब्लॉक मेकिंग युनिट व सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत.

शेळी समूह योजना

राज्यस्तरीय योजनेंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या मौजे पोहरा, जि. अमरावती येथे 'शेळी समूह योजना' (गोट क्लस्टर स्किम) ही नवीन योजना २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून राबवण्यासाठी, तसेच पोहरा येथील प्रक्षेत्राप्रमाणे राज्यातील इतर पाच महसूली विभागामध्ये प्रत्येकी १ याप्रमाणे आणखी ५ प्रक्षेत्रावर शेळी समूह योजना राबवण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे. मौ. पोहरा, जि. अमरावती येथे 'शेळी समूह योजना' ही नवीन योजना २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून राबवण्यात येणार आहे.

योजनेचा उद्देश : (१) राज्यामध्ये समूह विकासामधून शेळीपालन व्यवसायास गती देणे. (२) शेळीपालन संबधीत नवीन उद्योजक निर्माण करणे. (३) शेळी पालकांचे उत्पादक कंपनी, फेडरेशन, संस्था स्थापन करून त्या माध्यमातून त्यांना शेळीपालन प्रशिक्षण, शेळीपालन व्यवसायाकरिता लागणाऱ्या सुविधा पुरवणे, जसेच तांत्रिक माहिती, अद्ययावत तंत्रज्ञान, आरोग्यसुविधा, आनुवंशिक सुधारणा तसेच शेळ्यांकरिता बाजारपेठ उपलब्ध करून देणे. (४) शेळीपालकांना फॉरवर्ड लिंकेजेस निर्माण करून देणे, जसे शेळ्यांच्या वजनावर विक्रीची व्यवस्था, दूधप्रक्रिया उद्योग निर्माण करणे, माल साठवणुकीकरिता शीतगृह, खाद्य कारखाने, निर्यात सुविधा उपलब्ध करून देणे, प्रशिक्षणाची व्यवस्था करणे, कौशल्य विकास करणे, कृत्रिम रेतन, लसीकरण इत्यादीची व्यवस्था करणे. (५) शेळी पालनकरिता लागणाऱ्या वस्तू, साहित्य उपलब्ध करून देणे. (६) शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीकरिता प्रयत्न करणे. (७) ग्रामीण भागामध्ये स्वयंरोजगार निर्मिती करणे. (८) शेळ्यांच्या पैदास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे.

योजनेचे ठिकाण व कार्यक्षेत्र : या योजनेचे ठिकाण मौजे पोहरा, ता. जि. अमरावती असून या योजनेचे कार्यक्षेत्र अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ (नागपूर, वर्धा व हिंगोली तात्पुरत्या स्वरूपात समाविष्ट) आहे. मौजे पोहरा येथे पशुसंवर्धन विभागाच्या ९.५ एकर क्षेत्रावर शेतकरी, पशुपालक, शेळीपालनाशी संबंधित व्यावसायिक यांच्याकरिता विविध सुविधा निर्माण करण्यात येतील आणि त्यांच्या माध्यमातून प्रकल्प चालवण्यात येणार आहे. तसेच पोहरा येथील प्रक्षेत्राप्रमाणे राज्यातील इतर ५ महसूली विभागामध्ये प्रत्येकी १ याप्रमाणे आणखी खालील ५ प्रक्षेत्रावर शेळी समूह योजना राबवण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली आहे.

संग्रहीत

योजनेचे ठिकाण : १) बोंद्री, ता. रामटेक, जि. नागपूर. योजनेचे कार्यक्षेत्र नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली. २) तिर्थ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. योजनेचे कार्यक्षेत्र औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, लातूर, उस्मानाबाद. ३) रांजणी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली योजनेचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर. ४) बिलाखेड, ता. चाळीसगाव, जि. जळगाव योजनेचे कार्यक्षेत्र नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, अहमदनगर ५) दापचरी, जि. पालघर मुंबई शहर, मुंबई उपनगरे, पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग.

योजनेचे स्वरूप

(अ) शेळी पालकांना प्रोत्साहित करणे : या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जिल्ह्यामधील किमान ३० हजार शेतकऱ्यांना, पशुपालकांना या व्यवसायाबाबत प्रोत्साहित करण्यात येईल. त्यासाठी या भागामध्ये सर्वेक्षण करून या व्यवसायामध्ये इच्छुक असणाऱ्या व्यक्तींची नोंदणी करण्यात येईल. त्यांना शेळीपालनाचे प्रशिक्षण देण्यात येईल. यामध्ये शेळी उत्पादक कंपनी, फेडरेशन, संस्था यांच्या माध्यमातून शेळी समूह निर्माण करण्यात येईल. या समूहाच्या माध्यमातून शेळीपालकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी शेळ्या खरेदी करण्याकरिता मदत करण्यात येईल.

(ब) योजनेंतर्गत समाविष्ट बाबी : १) सामूहिक सुविधा केंद्र स्थापन करणे : या प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांना शेळीपालन व्यवसायासंबंधित विषयाचे सखोल ज्ञान व्हावे, याकरिता 'स्टेट ऑफ दि आर्ट' ही संकल्पना विचारात घेऊन शेळी समूह प्रकल्पांतर्गत २ एकरक्षेत्रावर सामुहिक सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यामध्ये प्रशिक्षण केंद्र (प्रशिक्षण वर्ग, विद्याशाखा खोली, बहुउद्देशीय हॉल), १०० प्रशिक्षणार्थीकरिता निवासस्थान, कर्मचारी निवासस्थान, इलेक्ट्रिसिटी, पाणीपुरवठा सुविधा, फर्निचर व इतर अनुषंगिक सुविधांची उभारणी करणे इ. बाबींचा समावेश असेल.

२) शेळ्यांचे दूध व दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया केंद्र स्थापन करणे : या प्रकल्पांतर्गत सुमारे २.५ एकर क्षेत्रावर शेळ्यांचे दुध व दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया केंद्राचे २ युनिट्स स्थापन करण्यात येणार आहे.

३) शेळ्यांचे मांसप्रक्रिया केंद्र स्थापन करणे : या प्रकल्पांतर्गत सुमारे १.५ एकर क्षेत्रावर मांसप्रक्रिया केंद्र (१ युनिट) स्थापन करण्याचे नियोजन आहे.

४) शेळी उत्पादक कंपनी व खासगी व्यावसायिकांकरिता कार्यालय : या प्रकल्पांतर्गत सुमारे ०.५ एकर क्षेत्रावर शेळी उत्पादक कंपनी व खाजगी व्यावसायिकांसाठी कार्यालय उभारण्यात येईल.

विभागीय संपर्क अधिकारी

'जंगल' म्हणजे निव्वळ महसूल मिळवण्याचे साधन ही इंग्रजांच्या काळातील मानसिकता स्वतंत्र भारतातही अनेक वर्ष अबाधित राहिली. जंगल परिसंस्थेवर ज्यांची जीवनशैलीच नव्हे, तर अस्तित्व अवलंबून आहे, अशा मूळ वनवासींना त्यांचे अधिकार नाकारण्यात आले होते. अनेक वर्षांपासून त्यांच्यावर होणारा हा अन्याय दूर करण्याचे काम सन २००६ च्या क्रांतिकारी वनहक्क कायद्याने केले आहे. या एका कायद्याने जल, जंगल, जमिनीवर जंगलात राहणाऱ्या पारंपरिक वनवासींना त्यांचा हक्क बहाल केला.

क्रांतिकारी वनहक्क कायदा

मनिषा सावळे

आदिवासींचे वनजमिनींवरील हक्क मान्य करून मूळ वनवासींना उपजीविका आणि खाद्य सुरक्षितता मिळवून देण्याचा हक्क हा कायदा देतो. यामध्ये राष्ट्रीय उद्याने, अभयारण्यांचाही समावेश आहे. जंगलाचे संवर्धन-संरक्षण करण्याची जबाबदारीही जंगलात राहणाऱ्यांवर सोपवतो. या कायद्याने वनवासींना वनाशी संबंधित वैयक्तिक आणि सामूहिक असे दोन प्रकारचे हक्क दिले आहेत. वैयक्तिक वनहक्कांमध्ये वनजमिनीवर अन्न उत्पादन करण्याचा, शेती करण्याचा, निवारा मिळवण्याचा आणि घर करण्याचा अधिकार मिळाला आहे, तर सामूहिक वनहक्कांमध्ये निस्तार हक्क, गौण वनउपजावर स्वामित्व अधिकार, वनव्यवस्थापन करण्याचा समावेश आहे. यामध्ये गुरे चारणे, मासेमारी करणे, जलस्रोत वापरणे, वनजमिनीवर व्यवस्थापन दाव्यांतर्गत मिळालेल्या सामूहिक वन्यस्रोतांच्या शाश्वत वापरासाठी पुनरुज्जीवन, संवर्धन, व्यवस्थापनाचा अधिकार, जैवविविधतेचा वापर करण्याचे हक्क, समूहाचा बौद्धिक संपदा आणि पारंपरिक ज्ञानावरचा हक्क, समूहाकडून वापरला जाणारा इतर कोणताही अधिकार; जो या उपकलमांमध्ये नोंदवलेला आहे. मात्र त्यामध्ये पारंपरिक शिकारीचा किंवा वन्यप्राण्याला जायबंदी करण्याचा किंवा त्याचा अवयव काढून घेण्याचा हक्क समाविष्ट नाही.

वनहक्क दावे प्रमाणपत्र वितरित करताना जिल्हाधिकारी अमोल येडगे.

तीन समित्यांद्वारे प्रस्तावांना मान्यता

गावकऱ्यांना आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी एक हेक्टरपर्यंतच्या वनजमिनींचे वनेतर वापराकरिता म्हणजेच शाळा, दवाखाना किंवा इस्पितळ, अंगणवाड्या, योग्य किमतीत वस्तू विकणारी दुकाने, वीज किंवा टेलिकम्युनिकेशन तारा, टाक्या किंवा इतर लहान-सहान जलस्रोत, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा आणि पाण्याच्या नलिका, पाणी साठवण्याच्या रचना, लहान सिंचन कालवे, अपारंपरिक ऊर्जास्रोत, व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, रस्ते, सामुदायिक केंद्र या सुविधांसाठी रूपांतर करण्याचा हक्कही या कायद्याने वनवासींना दिला आहे. हे हक्क मंजूर करून घेण्याची एक प्रक्रिया पार पाडावी लागते. यामध्ये तीन प्रकारच्या समित्यांद्वारे प्रस्ताव मान्य केले जातात. गावस्तरीय समिती, उपविभागीय समिती आणि जिल्हास्तरीय समितीपुढे प्रस्ताव ठेवून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे हे वैयक्तिक आणि सामूहिक वनहक्क दावे मान्य करण्यात येतात.

२००८ पासून अंमलबजावणी

यवतमाळ जिल्ह्यात वनहक्क कायद्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी २००८ मध्ये सुरू झाली. तेव्हापासून केवळ ९५ प्रकरणे मान्य करण्यात आली होती. अनेक वर्षांपासून वैयक्तिक आणि सामूहिक

मी २००४ पासून जंगलात शेती करत आहे. मात्र शेतीचा हक्क, अधिकार माझ्याकडे नव्हते. यासाठी मला २००५मध्ये तुरुंगवाससुद्धा भोगावा लागला. त्यानंतर २००६ मध्ये आलेल्या कायद्यानुसार उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अतिक्रमण केलेल्या शेतीची कागदपत्रे सादर केली. मात्र अनेक दिवस माझा प्रस्ताव प्रलंबित होता. २०२०- २१ मध्ये मला या शेतीचा हक्क मंजूर करण्यात आला असून त्याचा सातबारासुद्धा मिळाला आहे. त्यामुळे मला शेतीसाठी शासनाच्या योजनांचा लाभ घेता येत असून सहकारी सोसायटीमार्फत कर्जसुद्धा उपलब्ध होत आहे. विंधन विहिरीसाठी मी प्रस्ताव सादर केला आहे. माझ्या गावात ३६ लोकांना या कायद्यामुळे वनहक्क दावे मंजूर झाले आहेत. या कायद्याने आदिवासींचा जंगलावरील हक्क अबाधित ठेवला आहे.

- परसराम पराते, पारवा

.....

खडकी गावाला सामुहिक वन हक्क मंजूर झाल्यामुळे गावात सामुहिक वन व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली. या समितीमार्फत गावात जंगलातील तेंदूपाने, मोहाडी, तसेच इतर गौण गोळा करणे तसेच औषधी वनस्पती गोळा करता येत आहेत. गावात जमा केलेली तेंदूपाने विकून गावाला २६ हजार रुपयांचा नफा झाला. त्यातून गावातील बांध-बंदिस्ती, ढाळीचे बांध, जनावरांसाठी पिण्याची पाण्याची टाकी तसेच देवीसाठी शेड उभारण्यात आले आहेत. बांबू लागवड आणि उत्पादन याकडे सामुहिक वन व्यवस्थापन समिती लक्ष केंद्रीत करणार आहे. या कायद्याने आदिवासी गावांच्या विकासाचा मार्ग मोकळा केला आहे.

- अशोक धुर्वे, सचिव, वन व्यवस्थापन समिती, खडकी

.....

पैनगंगा अभयारण्यात असलेल्या बंदी भागातील सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी २०१९ पासून लढत होतो. जिल्हाधिकाऱ्यांनी २०२१ मध्ये १३ गावातील दाव्यांना मंजुरी दिल्यामुळे एक समाधान आहे. आता या गावातील जंगलाचे सीमांकन, तेंदूपत्ता संकलन तसेच इतर सर्व महत्त्वाच्या बाबींचे आराखडे तयार करण्यास सुरुवात केली आहे.

- बाबुसिंग जाधव, अध्यक्ष, मोरचंडी विकास समिती

.....

वनहक्क कायद्यामुळे आदिवासींना त्यांचे जल, जंगल आणि जमिनीचे अधिकार प्राप्त झाले आहेत. यवतमाळ जिल्ह्यात झरी-जामणी, पांढरकवडा, मारेगाव, घाटंजी, वणी या भागात मोठ्या प्रमाणात आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. अनेक वर्षांपासून या आदिवासींचा उदरनिर्वाह जंगलावरच अवलंबून आहे. अनेक वर्षांपासून ते कसत असलेल्या जमिनीचे अधिकार त्यांना या कायद्यामुळे मिळाले आहेत. प्रलंबित असलेली प्रकरणे वर्षभरात निकाली काढता आली, याचा जास्त आनंद आहे.

- अमोल येडगे, जिल्हाधिकारी, यवतमाळ

वनहक्काची प्रकरणे प्रलंबित होती.

जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी वर्षभरापूर्वी पदभार सांभाळताच सतत गावस्तरीय आणि विभागस्तरीय समित्यांचा आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा केला. त्यांच्या सातत्यपूर्ण आढाव्यामुळे वर्षभरात ३७० वैयक्तिक प्रकरणात वनहक्क पट्टे वाटप झाले आहेत, तर ६५ सामूहिक वनहक्काची प्रकरणे मंजूर झाली आहेत. यामुळे वनवासींना कायमस्वरूपी स्वहक्काच्या उपजीविकेच्या साधनांसोबतच गावांनाही त्यांचे अधिकार मिळाले आहेत. वैयक्तिक वनहक्क मंजूर केलेल्या ३७० आणि पूर्वीची ९५ प्रकरणे मिळून ४६५ लाभार्थ्यांना भूमिअभिलेख कार्यालयामार्फत मोजणी करून जमिनीचा सातबारासुद्धा वाटप केलेला आहे. यामुळे जंगलात राहणाऱ्या आदिवासींना त्यांचे स्वतःचे पक्के घर बांधता येईल. तसेच शेतीसाठी असणाऱ्या योजनांचा लाभ घेता येईल.

प्रलंबित दावे निकाली

सामूहिक वन हक्काच्या निरंतर वापरासाठी ग्रामसभेद्वारे सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीचे गठन करणे आवश्यक आहे. तिच्या माध्यमातून सामूहिक वन हक्क क्षेत्राचे व्यवस्थापन व संवर्धन आराखडा तयार करायचा असतो. यासाठी सुद्धा जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या ६४ गावांमध्ये गावातीलच स्वयंसेवकांची नियुक्ती केली आहे. त्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. याशिवाय बंदी असलेल्या उमरखेड तालुक्यातील सहस्त्रकुंड या भागातील वनक्षेत्रातसुद्धा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले सामूहिक वनहक्काचे तेरा दावे जिल्हाधिकाऱ्यांनी निकाली काढले आहेत.

वन व्यवस्थापन समित्यांना प्रोत्साहन

उपजीविकेबरोबरच जंगल आपले आहे, आपल्या पुढील येणाऱ्या पिढ्यासाठी ते सुदृढ राहिले पाहिजे, त्यासाठी जंगलाचे महत्त्व, जंगलाचे संरक्षण, संवर्धन आणि दुर्मीळ वनस्पती व प्राणी यांचे जतन गावपातळीवर करणे आवश्यक आहे. यासाठी जैवविविधता रजिस्टर तयार करणे, स्थानिक प्रजातींची नोंद ठेवणे, त्यांचे जतन करणे, वनस्पतींच्या शास्त्रीय बागांची निर्मिती करून जतन व संवर्धन करणे, पारंपरिक पद्धती व ज्ञानाची नोंद ठेवणे, बियाणे पेढ्या तयार करणे, जैवविविधता राखून ठेवणे, बेकायदेशीर जंगलतोड थांबवण्यासाठी उपाययोजना करणे इत्यादी बाबींसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी गावातील वन व्यवस्थापन समित्यांना आराखडा तयार करण्यास प्रोत्साहित केले आहे.

जिल्हा माहिती अधिकारी,यवतमाळ

आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. मग ते विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्र असो की संरक्षण दल. सर्वत्र नारीशक्ती आघाडीवर आहे. कृषी क्षेत्रातही महिला अग्रेसर असून शेतीमध्ये नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आहेत. शेतीतून भरघोस उत्पन्न घेत स्वतःबरोबरच कुटुंबीयांनाही आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. यंदाचे वर्ष हे 'महिला शेतकरी व शेतमजूर सन्मान वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले आहे. यानिमित्त राज्यातील विविध भागातील महिला शेतकऱ्यांच्या या काही प्रातिनिधिक यशोगाथा...

परावलंबित्व ते आत्मनिर्भरता

प्रयोगशील शेतीतून भरघोस उत्पन्न

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील वेढेगाव येथील माधुरी महादेव भोईर या गेल्या ३० वर्षांपासून शेती करत आहे. प्रयोगशील महिला शेतकरी म्हणून राज्य शासनाचा जिजामाता कृषिभूषण पुरस्कार व वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आले. जिल्हा परिषदेचा कृषी विभाग तसेच पंचायत समिती भिवंडी यांच्यातर्फेदेखील त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

माधुरीताई वर्षभर वेगवेगळी पिके घेतात. खरिप हंगामात भाताचे पीक घेतात. त्यात स्थानिक तसेच संकरित जातीची लागवड करून जास्तीत जास्त उत्पन्न घेतात. त्याचप्रमाणे कारली, दोडका, काकडी असा भाजीपालाही त्या खरिप हंगामात घेतात. रब्बी हंगामामध्ये टोमॅटो, वांगी, कोबी, आचारी मिरची, ज्वाला मिरची, काकडी, मका, हरभरा, वाल, घेवडा इत्यादी पिके घेऊन त्यांनी विक्रमी उत्पन्न घेतलेले आहे. त्यांच्याकडे आंबा, चिकू, नारळ, काजू आदींची फळझाडे लागवड केलेली आहे. त्याचप्रमाणे फुलशेतीमध्ये त्यांनी झेंडूची लागवड करून चांगल्याप्रकारे उत्पादन काढले आहे. तालुक्यामध्ये त्यांची शेती आदर्श शेती म्हणून ओळखली जाते. तालुक्यातील इतर शेतकऱ्यांसाठी त्या प्रेरणादायी ठरल्या आहेत. त्यांच्या मालकीचा तलाव असून त्यातील पाण्याच्या योग्य वापराने त्या ठिबक सिंचन, तुषार सिंचन यांचा नियोजनबद्ध वापर करून उन्हाळ्यामध्ये भाजीपाला पिके घेतात. वीज पंपाने पिकांना पाणी देणे, पॉवर टिलरने शेतीची मशागत करणे, भाजीपाला पिके बाजारात नेणे अशी कामे त्या स्वतःच करतात. त्यांनी नियोजनानुसार शास्त्रीय

पद्धतीने शेती करून जास्तीत जास्त उत्पन्न घेऊन दाखवले आहे. गावामध्ये पुढाकार घेऊन प्रथमच भाजीपाला पिकांचे लागवडीचे तंत्र अवगत करून परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांना त्यांनी भाजीपाला घेण्यास प्रवृत्त केले आहे. सेंद्रिय खताचा वापर करून जास्तीत जास्त उत्पन्न कसे घेता येईल याचा आदर्श शेतकऱ्यांना त्यांनी घालून दिला आहे.

गांडूळ खत प्रकल्पातून मिळणाऱ्या खताचा वापर त्या शेतीमध्ये करतात. खरीप हंगामामध्ये त्यांनी संकरित सह्याद्री भाताचे विक्रमी उत्पादन काढलेले आहे. त्या कुक्कुटपालन व दुग्धव्यवसाय करतात. त्यांच्याकडे बायोगॅस असून अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करतात. कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग या योजनेंतर्गत त्या सभासद असून वेगवेगळे प्रयोग आपल्या शेतीमध्ये करतात. त्या परिसरातील महिला व गावातील महिला यांना शेतीविषयक मार्गदर्शन करतात. त्यांनी बचतगटामार्फत व्यवसायासाठी महिलांना प्रवृत्त करून पत्रावळ्या तयार करणे, पापड, लोणची, मसाल्याचे पदार्थ तयार करणे असे व्यवसाय सुरू करून गरीब आदिवासी महिलांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न केलेले आहेत.

– जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

फळबाग लागवडीतून आर्थिक प्रगती

जालना जिल्ह्यात पारंपरिक शेतीबरोबरच फळपिके घेण्यावरही भर देण्यात येतो. जालना जिल्हा हा मोसंबी उत्पादनात अग्रेसर जिल्हा आहे. नगदी पीक म्हणून ओळख असलेल्या द्राक्ष पिकाची लागवडही जिल्ह्याच्या काही भागामध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात येते. जालना तालुक्यातील गोलापांगरी या गावातील रहिवासी छाया दत्तात्रय मोरे-पाटील या अल्पशिक्षित असतानाही केवळ जिद्द व चिकाटीच्या बळावर पारंपरिक शेतीबरोबरच फळपिकांची लागवड करत वर्षाला १० ते १२ लाख रुपयांचा निव्वळ नफा कमवत आहेत. त्यांची प्रगतिशील शेतकरी म्हणून जिल्ह्यात ओळख असून फळबाग लागवडीतून साधलेली आर्थिक उन्नती या भागातील महिलांना प्रोत्साहन देत आहे.

जालना जिल्हा मुख्यालयापासून १५ कि.मी. अंतरावर गोलापांगरी गाव वसलेले आहे. गावाच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन हे शेतीच आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना सातत्याने नापिकीला सामोरे जावे लागते. परंतु बाजारात मागणी

असलेल्या व नगदी उत्पन्न देणाऱ्या पिकांची निवड, उत्तम नियोजन तसेच लागवडीचे ज्ञान या त्रिसूत्रीचा वापर करून छायाताई या लाखो रुपयांचे उत्पन्न आपल्या शेतीमधून घेत आहेत.

५१ वर्षीय छायाताईंचे शिक्षण केवळ दहावीपर्यंत झाले आहे. चूल व मूल यामध्ये न अडकता आपल्या संसाराचा गाडा हाकत आपल्याकडे असलेल्या शेतीमध्ये पारंपरिक पिकांबरोबरच नगदी पीक घेण्याचे त्यांनी ठरवले. पीक घेण्यासाठी तांत्रिक माहितीची आवश्यकता असल्याने त्यांनी जिल्ह्याचा कृषी विभाग, आत्मा व कृषी विज्ञान केंद्र गाठले. पारंपरिक पिकांबरोबरच नगदी उत्पन्न देणारे द्राक्ष, मोसंबी, पपई, डाळिंब यासह बाजारात मागणी असलेल्या फळपिकांची नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून लागवडीची माहिती त्यांना या ठिकाणाहून मिळाली. छायाताईंनी क्षणाचाही विलंब न लावता शेतीमध्ये द्राक्ष, मोसंबी, पपई, डाळिंब, केळी व आंबा लागवडीची तयारी केली. द्राक्षाची सोनाका व कृष्णा सीडलेस या जातीचे कलमे लावली. लागवडीसाठी अधिकचा पैसा खर्च होऊ नये, यासाठी घरातील जुन्या साड्यांचे त्यांनी या द्राक्षासाठी शेड तयार केले. त्याचबरोबर ऊसाचे एक डोळा पद्धतीने रोपे तयार करून त्याचीही लागवड केली. पिकांसाठी उत्तम प्रतीचे खत मिळावे, यासाठी शेतामध्येच गांडुळखताच्या युनिटची उभारणीही त्यांनी केली. या लागवडीपासून त्यांना विक्रमी असे उत्पादन होत आहे.

फळपिकांचे उत्पादन तर झाले, परंतु उत्पादित केलेल्या मालाला चांगला भाव मिळणेही आवश्यक आहे. यासाठी त्यांनी द्राक्षांची पॅकिंग करून जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात माल विकण्याची तयार केली. त्यानुसार त्यांनी त्यांच्या मालाची ब्रँडिंग करून आकर्षक पद्धतीने मालाचे पॅकिंग केले व बाजारामध्ये विक्रीसाठी द्राक्षे पाठवली. त्यांच्या या आकर्षक पॅकिंगमुळे उत्पादित केलेल्या मालाला अपेक्षेपेक्षा अधिक भाव मिळाला. फळपिकांच्या या लागवडीतून छायाताई दरवर्षी १० ते १२ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळवत आहेत. त्यांना अनेक पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

आजच्या आधुनिकतेच्या युगात शेती क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे. केवळ पारंपरिक शेती न करता नगदी उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या लागवडीवरही भर देणे गरजेचे आहे. यासाठी महिलांनी कृषी विभागामार्फत राबवण्यात येणारे विविध प्रशिक्षण, अभ्यास दौरे यासह इतर माध्यमातून ज्ञान आत्मसात करून आपली आर्थिक उन्नती साधावी, असे छायाताई सांगतात.

– प्रमोद धोंगडे,
जिल्हा माहिती अधिकारी, जालना

कोरफड शेतीतून आर्थिक सक्षमीकरण

हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात माळवटा येथे राहणाऱ्या वनिता अशोकराव दंडे या महिला शेतकरी आहेत. त्यांच्याकडे पाच एकर शेती असून शिक्षण बी.ए.पर्यंत झाले आहे. शेतीच्या कामात पतीला हातभार लावण्यासाठी त्या रोज शेतीच्या कामात मदत करत होत्या. त्यानंतर त्यांनी पारंपरिक शेतीला छेद देऊन कोरफड शेती करण्याचे ठरवले. तीन एकर शेतात त्यांनी कोरफड या औषधी वनस्पतीची लागवड केली. पहिल्याच वर्षी त्यांना चांगले उत्पादन मिळाले. त्यातून त्यांना जवळपास दीड ते दोन लाख रुपयांचा फायदा झाला.

कोरफडसमवेत त्यांनी अश्वगंधा, शतावरी, गुळवेल आणि जिरेनियम अशा अनेक वनस्पतींची लागवड केली. या औषधी वनस्पतींच्या माध्यमातून त्यांनी सौंदर्य प्रसाधनांची निर्मिती केली. यात हळद स्क्रिम, कोरफड स्क्रिम, कोरफड शाम्पू अशी प्रसाधने तयार करून ती बाजारात विक्री करण्यास सुरुवात केली. यात त्यांची दिवसेंदिवस मागणी वाढल्याने त्यांनी कृष्णा हर्बल व कॉस्मेटिक हा ब्रॅण्ड तयार केला. या साधनाची थेट बाजारात विक्री करण्यासाठी शासनाच्या 'विकेल ते पिकेल' या अभियानांतर्गत त्यांनी थेट ग्राहक विक्री केंद्र सुरू केले.

शेतकऱ्यांनी पिकवलेला शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'विकेल ते पिकेल' अभियानांतर्गत शेतकरी ते ग्राहक थेट शेतमालाची विक्री केली जाते. या अभियानांतर्गत त्यांनी ज्वारी, बाजरी, गहू, सर्व प्रकारच्या डाळी, लोणचे व पपई इत्यादी शेतमालांची ग्राहकांना वाजवी दरात थेट विक्री केली जाते. शेतातील सेंद्रिय भाजीपाला व फळांची ग्राहकांना विक्री करण्यात येते. त्या प्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून पपईपासून जाम, जेली, टूटीफ्रुटी तयार करतात व 'विकेल ते पिकेल' अंतर्गत थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवतात. कृषी विभागाच्या 'आत्मा' योजनेमार्फत घेण्यात आलेल्या प्रशिक्षणातून त्यांनी पूजा महिला बचतगट

तयार केला असून या बचतगटामध्ये २० महिला आहेत. त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम वनिता स्वत: करतात. त्यांच्या कामाची दखल घेऊन मिटकॉनने महाराष्ट्र उद्योगिनी पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित केले आहे.

– श्वेता पोटुडे-राऊत,
प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली

बेरोजगारीवर केली मात

रोजगारासाठी सतत होणारी पायपीट... उपजीविकेसाठी होणारी ससेहोलपट...यातून येणारी आर्थिक ओढाताण....हे वास्तव होते शीतल विजय केदारे यांच्या कुटुंबीयांचे. आज मात्र पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजनेमुळे संपूर्ण कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळाले असून रोपवाटिकेच्या माध्यमातून बेरोजगारीवर त्यांनी मात केली आहे.

केदारे ग्रो हायटेक नर्सरी

श्रीगोंदा तालुक्यातील लोणी रोडवरील मखरेवाडी येथे 'केदारे ग्रो हायटेक नर्सरी' सध्या विविध फळे व भाजीपाला पिकांच्या रोपांनी बहरून आली आहे. राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना राबवली जाते. या योजनेच्या माध्यमातून रोपवाटिकेसाठी शासकीय अनुदान देण्यात येते. श्रीमती केदारे यांना शासनाच्या योजनेविषयी वृत्तपत्रातून माहिती मिळाली. त्यांनी तत्काळ श्रीगोंदा तालुका कृषी अधिकारी दीपक सुपेकर यांच्याशी संपर्क साधला. कृषी अधिकाऱ्यांनी महाडिबीटी पोर्टलद्वारे त्यांचा कागदपत्रांच्या पूर्ततेसह परिपूर्ण अर्ज भरून घेतला. त्यानंतर साधारणतः महिनाभरातच त्यांची सोडतीद्वारे या योजनेच्या लाभासाठी निवड झाली. तालुका कृषी कार्यालयाने त्यांना तत्परतेने केलेल्या मदतीमुळे त्यांचा शासन यंत्रणेविषयी सकारात्मक दृष्टिकोन तयार झाला. आज त्यांच्या स्वतःच्या ०.८० हेक्टर क्षेत्रावर सुसज्ज रोपवाटिका तयार झाली आहे. 'केदारे ग्रो हायटेक नर्सरी' हे नाव त्यांनी या रोपवाटिकेला दिले आहे. ४ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या रोपवाटिकेसाठी शेडनेट गृह, पावर नॅपसॅक स्प्रेअर व क्रेट्स यासाठी एकूण २ लाख रुपयांचे शासकीय अनुदान मिळाले आहे. प्रत्यक्षात त्यांना फक्त २ लाख रुपये भागभांडवल उभे करावे लागले आहे. रोपवाटिकेत सध्या कलिंगडाच्या विविध जातींची १ लाखापेक्षा जास्त रोपे उपलब्ध आहेत. त्यात मिरचीची ६० हजार, काकडी १० हजार, खरबूज १० हजार व वांग्याच्या २५ हजार रोपांचा समावेश आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजनेच्या माध्यमातून आज माझे संपूर्ण कुटुंब स्वावलंबी झाले असून आम्हाला शाश्वत रोजगार मिळाला आहे. या माध्यमातून बेरोजगारीवर मात करता आली असल्याची भावना श्रीमती केदारे यांनी व्यक्त केली आहे.

– सुरेश पाटील,
माहिती अधिकारी, उप माहिती कार्यालय, शिर्डी

'तिच्या' हाती ट्रॅक्टरची चावी...

राज्य शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत व्याळा ता. बाळापूर, जि. अकोला येथील सक्षम महिला बचतगटाला कृषी अवजारे बँक योजनेचा

लाभ मिळाला आणि महिला बचतगट चालवणाऱ्या महिलांच्या हाती ट्रॅक्टरची चावी आली. आता या महिलांना बचतगटातील सदस्यांना तसेच गावातील गरजू शेतकऱ्यांना कृषी अवजारे भाड्याने देऊन आपल्या बचतगटाचा व्यवसाय वाढवणे शक्य तर झालेच; शिवाय गावातील शेतकऱ्यांना माफक दरात शेतीची कामे अवजारांद्वारे करणेही शक्य झाले. एक प्रकारे उत्पादन खर्च कमी करण्याचा हा मार्ग ठरला आहे.

दहा महिला सदस्य असलेल्या या बचतगटाने कृषी विभागाकडे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत कृषी अवजारे बँक योजनेचा लाभ मिळावा, यासाठी अर्ज केला. त्यातून बचतगटाचे सर्व व्यवहार तपासून त्यांना कृषी अवजारे नोव्हेंबर २०२१ मध्ये देण्यात आली. त्यात तीन फाळी नांगर, रोटाव्हेटर, बीबीएफ पेरणी यंत्र, पेरणीयंत्र व ट्रॅक्टर अशी अवजारे मिळाली. ही अवजारे आल्यापासून महिला बचतगटातील सदस्यांनी आपापल्या शेतातील विविध मळणी, मशागत व अन्य कामे केली. कामे झाल्यावरही उरलेल्या वेळात गावातील शेतकऱ्यांना एकरी हजार रुपये या दराने यंत्रे उपलब्ध करून त्यांना कामे करून दिली. आता खरीप हंगामासाठी गावातील शेतकऱ्यांना या अवजारांमुळे माफक दरात नांगरणी, जमीन सपाटीकरण, ढेकळे मोकळी करून जमीन स्वच्छ करणे इत्यादी

कामे करता आली. पुरेसा पाऊस झाला की, पेरणीच्या कामांसाठी पेरणीयंत्राची मागणी व कामे सुरू होतील. गेल्या नोव्हेंबरपासून आतापर्यंत दोन लाख रुपयांची उलाढाल या बचतगटाने केली असल्याची माहिती बचतगटाच्या सचिव संध्या बोचरे यांनी दिली.

अकोला जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत कृषी विभागामार्फत आठ महिला बचतगटांना कृषी अवजारे बँक योजनेचा लाभ मिळाला आहे. ६० टक्के अनुदानावर ही अवजारे त्यांना खरेदी करता येतात. आता ही अवजारे शेतकऱ्यांना सहज आणि अल्पदरात उपलब्ध होऊन शेतीची कामे होऊ लागली आहेत.

कृषी अवजारे बँक योजनेत अवजारे प्राप्त झाल्याने बचतगटाला कामे मिळू लागली आणि शेतकऱ्यांना स्वस्तात कामे करता येऊ लागली. 'तिच्या'हाती ट्रॅक्टरची चावी येताच गावातील शेती कामांचे चक्र वेगवान पद्धतीने फिरू लागले. शेतीतील उत्पादन खर्च कमी करणे हा शेतकऱ्याचा फायदा करण्याचा एक मार्ग असून या उपक्रमामुळे तोच साध्य होताना दिसतोय.

– डॉ. मिलिंद दुसाने,
जिल्हा माहिती अधिकारी, अकोला

भाजीपाला पिकातून १३ लाखांचे उत्पन्न

लग्नानंतर तीन वर्षांनी पतीचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यावेळेस मोठी मुलगी दोन वर्षाची, तर छोटी सहा महिन्यांची. या दोन लहान मुलींना घेऊन आयुष्य जगण्याचे आव्हान लिलया पेलत कौटुंबिक जबाबदाऱ्यांसोबतच एक आदर्श शेती उभी केली आहे. वेंडली (ता. चंद्रपूर) येथील नंदा शंकर पिंपळशेंडे यांनी. सुरुवातीला कोरडवाहू शेतीपासून सुरू झालेला प्रवास आज ठिबक सिंचन योजनेमुळे

फुलला आहे. याला नंदाताईंच्या कष्टाची जोड आहे. म्हणूनच वर्षभर भाजीपाला पिकवून १२ ते १३ लाखांचे उत्पन्न त्या सहजरीत्या घेतात.

चंद्रपूर शहरापासून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या वेंडली येथे नंदाताईंची चार एकर शेती आहे. २००८ पासून त्या शेती करतात. कोरडवाहू असल्याने सुरुवातीला सोयाबीन आणि कापूस ही पारंपरिक पिके घेण्यास त्यांनी सुरुवात केली. शेतीसाठी कधी कर्ज तर कधी गटाचा पैसा त्या उपयोगात आणत. मात्र वर्षाकाठी हाती काहीच शिल्लक राहत नव्हते. त्यामुळे त्यांनी पारंपरिक पिकांना फाटा देऊन २०१३ पासून भाजीपाला लावण्यास सुरुवात केली. शेतात बोअर केला आणि लगेच दुसऱ्या वर्षी म्हणजे २०१४ मध्ये ठिबक सिंचन योजनेचा लाभ घेतला. आज नंदाताईंच्या संपूर्ण चार एकरात सिंचनाची सोय असल्याने वर्षभर त्या भाजीपाला पिकवतात. यात कारले, दोडके, मिरची, टमाटर, पालक, वांगे, वाल, चवळीच्या शेंगा, कोथिंबीर एवढेच नाही तर अमेरिकन ब्रोकली (फुलकोबीचा प्रकार) आदी भाजीपालावर्गीय पिकांचा समावेश आहे. दोन ते अडीच महिन्यात एक पीक त्यांच्या हाती येते. कारले तर केवळ दीड महिन्यातच उगवत असल्याने या हंगामाची सुरुवात त्यांनी कारले लावून केली आहे. हे सर्व करण्यासाठी सकाळी सात वाजता त्या शेतात असतात. दुपारच्या जेवणाचा डबाही शेतातच मागवून घेतात. त्यांच्या शेतात रोज ८ ते १० मजूर कायम कार्यरत असतात.

वर्षभर भाजीपाला लागवड व मजुरी पकडून त्यांना ७ ते ८ लाख रुपये खर्च येतो, तर वर्षाकाठी या उत्पादनातून १२ ते १३ लाख रुपयांचे उत्पन्न त्यांच्या हाती येते. म्हणजे प्रतिवर्ष जवळपास पाच लाख रुपये निव्वळ नफा त्यांना भाजीपाल्यातून मिळतो. याशिवाय त्यांच्या शेतात काम असल्याने इतर लोकांना रोजगार उपलब्ध होतो. सुरुवातीला झोपडीत राहणाऱ्या नंदाताईने वेंडली येथे गोठ्याच्या जागेवर स्लॅबचे पक्के घर उभे केले आहे. तसेच दोन्ही मुलींना उच्चशिक्षणसुद्धा दिले आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर

सेंद्रिय पद्धतीने आदर्श शेती

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील करपेवाडी येथील महिला शेतकरी कुसुमताई बापुराव करपे या वैविध्यपूर्ण शेती करत आहेत. त्यांनी भाजीपाला, फुलशेती, कलिंगड व ऊसाची सेंद्रिय पद्धतीने शेती करीत महिला शेतकऱ्यांसमोर एक आदर्श उभा केला आहे.

श्रीमती करपे यांचे वय ६२ वर्षे असून त्यांचे शिक्षण एम.ए.पर्यंत झाले आहे. त्यांचा नेहमीच शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून शेती करण्यावर भर राहिला आहे. करपेवाडी ता. पाटण या अतिशय लहानशा खेड्यातील कष्टकरी प्रगतशील शेतकरी म्हणून त्या ओळखल्या जातात. त्या कोणतेही पीक घेताना माती परीक्षणाचा वापर, एकात्मिक कीड पद्धतीचा वापर, सेंद्रिय निविष्ठांचा वापर, गट शेतीचा वापर तसेच शेतीची सर्व कामे महिलांच्या माध्यमातून पार पाडतात.

कृषी विभागाच्या विविध योजनांचा त्या स्वतः लाभ घेतात आणि इतर शेतकऱ्यांना योजनेविषयी मार्गदर्शन करीत असतात. कृषी विभागाच्या मदतीने उभारलेल्या पॅक हाऊसच्या माध्यमातून शेतमालाची प्रतवारी करून पॅकिंग शेतातच करतात. कुसुमताई यांची शेतीविषयक आवड, वृक्षप्रेम, महिलांचा सहभाग तसेच इतरांना नेहमीच मार्गदर्शन करण्याच्या भूमिकेमुळे त्यांना आतापर्यंत कृषी क्षेत्रातील वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, डॉ. जे. डे. बसू सेंद्रिय आधुनिक पुरस्कार, उत्कृष्ट शेतकरी पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. इतर शेतकऱ्यांनीही या उपक्रमाची अंमलबजावणी करावी, असे शेतकऱ्यांना त्या नेहमी सांगतात. जमिनीचा सेंद्रिय कस कसा वाढत जाईल, याविषयी त्या नेहमी दक्ष असतात. गांडूळ खत, दशपर्णी अर्क, बिजामृत इत्यादी सेंद्रिय पद्धतीचा अवलंब

त्या स्वत: आपल्या शेतात करत आहेत. तसेच विविध ठिकाणी व्याख्याने, आकाशवाणीवरील मुलाखत तसेच इतर माध्यमातून त्या शेतकऱ्यांना शेतीविषयक ज्ञानदानाचे काम आपल्या स्वत:च्या अनुभवातून देत असतात.

– दत्तात्रय कोकरे,
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

पारंपरिक शेतीला दिली नवी जोड

शेतीपूरक उद्योगाला बचतगटांसारखा दुसरा सक्षम मार्ग नाही, हे ओळखून महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) काही गावात विशेष भर देण्यात आला. या गावापैकी एक असलेले गाव म्हणजे नांदेड जवळील नाळेश्वर. शांताबाई बाबुराव धोत्रे ही या गावातील माविमच्या विकासाची दूत असलेली महिला शेतकरी प्रतिनिधी. वय वर्षे ५२. आपल्याजवळ असलेल्या थोड्याबहुत शेतीवर स्वत:चे कुटुंब व गावातील बचतगटाच्या महिलांनाही

सावरण्याची हिंमत ठेवणारी ही बाई. पती बाबु मुंजाजी धोत्रे (वय वर्षे ५६) यांना फक्त तुम्ही सोबत रहा, आम्हाला धीर द्या, अशी स्पष्ट भूमिका घेणारी ही महिला बचतगटाची दूत. सगळे धैर्य एकवटून पारंपरिक शेतीला शांताबाईंनी नवी जोड दिली. पाण्याची कमतरता नेहमीचीच असल्याने त्यांनी वेगळा विचार केला.

कृषी विभागाकडे शेततळ्याच्या योजनांविषयी त्यांनी चौकशी केली. कृषी विभागाने त्यांच्यातील उत्साह बघून शेततळे मंजूर केले. शासकीय योजनेतून २० गुंठ्यावर शेततळे साकारले. शेततळ्यात प्लास्टिकच्या आच्छादनामुळे पाणी मोठ्या प्रमाणात त्यांना उपलब्ध करता आले. या पाण्याचा सुयोग्य वापर व्हावा, यासाठी त्यांनी पर्यायाची शोधाशोध सुरू केली. यासोबतच फुलांच्या शेतीचे स्वप्नही पाहिले. ठिबक सिंचनाच्या माध्यमातून पाण्याच्या सुयोग्य वापराचा त्यांनी मार्ग निवडला. यातूनच २० गुंठ्यांवर त्यांनी गुलाब, गलांडा व इतर फुलझाडांची लागवड केली. पारंपरिक ऊस केवळ दीड एकरावर घ्यायला सुरुवात केली, तर उरलेल्या २० गुंठ्यांवर गहू व इतर पिके घेतली.

पाण्याच्या साठ्याला वेगळी जोड देता येईल का, याचा त्यांनी विचार केला. यासाठी माविमच्या माध्यमातून बचतगट स्थापन करत शेततळ्यातील पाण्यात मत्स्य उत्पादनाचा मार्ग निवडला. कोणताही विलंब न करता त्यांनी बचतगट स्थापन करत मत्स्य उत्पादनाला सुरुवात केली.

आपल्याजवळ उपलब्ध असलेली संसाधने, लोकसहभाग व शासकीय योजनांचा प्रामाणिक लाभ घेऊन पारंपरिक शेतीला नवी जोड दिल्यास नवनिर्माण होऊ शकते, याचे आदर्श उदाहरण म्हणून शांताबाईकडे पाहता येईल.

– विनोद रापतवार,
जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड

शेतीपूरक व्यवसायातून आर्थिक प्रगती

महिला शेतकरी आणि व्यावसायिक सिता तानाजी पवार यांचे १० सदस्यांचे मोठे कुटुंब आहे. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा केवळ पावणेचार एकर शेतीवर उदरनिर्वाह करणे अवघड जात होते. त्यामुळे शेतीसोबत शेतीपूरक व्यवसाय असावा, याकडे त्यांचा कल होता. त्या दृष्टीने त्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधून मिनी राईस मिल टाकण्यासाठी प्रस्ताव सादर केला. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले. त्यांना राईस मिल उभारणीसाठी शासनाचे २ लाख ४४ हजार रुपयांचे अनुदान प्राप्त झाले.

श्रीमती पवार या तलवाडा ता. विक्रमगड जि.पालघर या ठिकाणी

वास्तव्यास आहेत. जवळपासच्या गावांमध्ये राईसमिल उपलब्ध नसल्यामुळे त्यांना विक्रमगड या तालुक्याच्या ठिकाणी तांदूळ भरडण्यासाठी जावे लागत होते. ही बाब खर्चिक असल्याने न परवडणारे होते. विक्रमगड तालुका तसेच आसपासच्या तालुक्यांमध्ये भात हे मुख्य पीक असल्यामुळे तालुक्यातील सर्व शेतकरी भातपिकांची लागवड करतात. परंतु तांदूळ भरडण्यासाठी राईस मिल उपलब्ध नसल्यामुळे परिसरातील नागरिकांची मोठी अडचण होत असे. ही बाब लक्षात घेऊन श्रीमती पवार यांनी मिनी राईस मिल सुरू केली. या राईस मिलचा त्यांना आर्थिक फायदा झाला, तर आसपासच्या परिसरातील शेतकऱ्यांची तांदूळ भरडणीसाठीची अडचण दूर झाली. केवळ शेतीवर चालणारे कुटुंब आता शेतीपूरक व्यावसाय करत असल्याने आर्थिक स्थितीमध्ये मोठा फरक पडला आहे. स्वत:च्या गावातील व आसपासच्या गावातील नागरिकांना जवळच्या ठिकाणी तांदूळ भरडून मिळत असल्याने त्यांची अडचण दूर झाली आहे.

जिल्हा माहिती कार्यालय, पालघर

एकीचे बळ, मिळते फळ

'एकीचे बळ, मिळते फळ' या उक्तीप्रमाणे कोणताही व्यवसाय अथवा उद्योग सामूहिकरीत्या सुरू केला तर नक्कीच सकारात्मक बदल समाजात घडत असतो. औरंगाबाद शहरातील बाळापूर गावात समविचाराने प्रेरित होऊन १४ महिला

एकत्र आल्या. त्यांनी पापड, कुरडई, चटणी, लोणचे तयार करण्याच्या व्यवसायात आपल्याला यश मिळाले तर कुटुंबाचा व स्वत:चा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावेल, असा विचार केला. या विचारातूनच महिला बचतगटाची निर्मिती झाली. छोट्या-छोट्या घरगुती गृहोपयोगी वस्तू निर्माण करून महिला बचतगटाला बळकटी प्राप्त झाली.

महिलांना कायमचे स्वावलंबी बनवण्यासाठी व आर्थिक पाठबळ देण्याच्या हेतूने सतीमाता महिला बचतगटाची स्थापना औरंगाबादमधील बाळापूर गावात झाली. या यशोगाथेची सुरुवात शोभा रमेश राठोड यांच्यापासून झाली. त्या औरंगाबाद शहरातील एकतानगर भागात घरगुती लोणचे, पापड, कुरडई तयार करायच्या. यातून त्यांना आर्थिक पाठबळ मिळाले. याच पैशातून त्यांनी या भागातील त्यांच्या काही मैत्रिणी व शेजारील महिला सहकारी यांना एकत्र आणले. कृषी विभाग, सावित्रीबाई फुले महिला स्वयंसाहाय्यता संस्था व सायन्स फॉर सोयायटी उद्योगाच्या सहकार्याने कांदा निर्जलीकरण उद्योगाची सुरुवात केली. गटाच्या सदस्यांनी डिहायड्रेशन उद्योगातील कोणताही अनुभव नसताना या कामामध्ये सकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत मेहनत घेऊन एक चांगला उद्योगाचा मार्ग शोधला. यातूनच त्यांचा महिला बचतगटाऐवजी 'महिला उद्योजक गट' निर्माण झाला.

शेतकऱ्यांकडून कांदा, लसूण, टोमॅटो व अद्रक घेऊन त्याचे निर्जलीकरण करण्यात आले. सायन्स फॉर सोसायटी उद्योगाच्या माध्यमातून कांदा निर्जलीकरण करून पावडर व फ्लेक्सची विक्री केली जाते. या मालाचा मोरक्को, नेस्लेसारख्या आंतरराष्ट्रीय अन्नप्रक्रिया कंपन्यांना पुरवठा केला जातो. यामागे गटास २०० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे कांद्याचे निर्जलीकरण करण्याचा खर्च येऊ लागला. त्यातून पाच ते सहा हजार रुपये प्रतिदिन उत्पन्न मिळाले. कच्च्या शेतमालाचे दर कमी झाल्यानंतर हा माल बेभाव विकला जातो, म्हणून बाजारभाव नसताना त्यावर प्रक्रिया करून उत्पन्न मिळवण्यात येते. प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग (पीएमएफएमई) योजनेंतर्गत या गटातील पाच सदस्यांना प्रतिसदस्य ९१,७०० रुपये एकूण भाग भागभांडवलाच्या ३५ टक्के म्हणजे ३१,५०० रुपये अनुदान मंजूर झालेले आहे. या माध्यमातून बचतगटांच्या महिलांनी एकत्र उद्योग सुरू करून आर्थिक प्रगती साध्य केली आहे.

– मीरा ढास, माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद

अर्थाजनाबरोबरच वाढवला आत्मविश्वास

राज्य शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेत अनेक शेतकऱ्यांनी आपली आर्थिक उन्नती साधली आहे. यात महिला शेतकऱ्यांचाही प्रामुख्याने समावेश आहे. यापैकी एक म्हणजे बेटावद, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील महिला शेतकरी सुरेखा यशवंत महाजन होय. त्यांनी महाडिबीटी पोर्टलवर राज्य कृषी योजनेंतर्गत कृषी यांत्रिकीकरणात अवजारे बँक मिळवण्यासाठी अर्ज केला. ऑनलाईन पद्धतीने आवश्यक कागदपत्रे अपलोड केली. सोडतीनंतर त्यांची या योजनेसाठी निवड करण्यात आली. राज्य कृषी योजनेंतर्गत २५ लाख रुपयांच्या रकमेमध्ये २ ट्रॅक्टर व ८ विविध शेती उपयोगी अवजारे खरेदी करण्यात आली. योजनेचे निकष पूर्ण केल्याचे तपासल्यानंतर ऑनलाईन पद्धतीने १० लाख रुपये अनुदान लाभार्थीच्या खात्यावर वर्ग करण्यात आले. अवजारे बँक संकल्पनेमध्ये शेतकरी अथवा गटाने ट्रॅक्टर, विविध शेती उपयोगी अवजारे घेऊन स्वत:साठी तसेच परिसरातील शेतकऱ्यांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करून द्यावयाची असतात व त्यापोटी मिळणारी रक्कम स्वतंत्र नोंदी घेऊन लेखाजोखा ठेवायचा असतो.

सुरेखाताईंनी मोठ्या व लहान ट्रॅक्टरसोबत रोटाव्हेटर, कल्टिव्हेटर, हायड्रोलिक नांगर, मळणी यंत्र, सीड कम फर्टिलायझर, ब्लोअर इत्यादी अवजारे खरेदी केली. त्यासाठी त्यांना बँकेने १५ लाख रुपये कर्ज उपलब्ध करून दिले, तर कृषी विभागाकडून त्यांना १० लाख रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. ऑनलाईन पद्धतीने कृषी यांत्रिकीकरणात अवजारे बँक या बाबीसाठी निवड झालेली शिंदखेडा तालुक्यात त्यांची पहिलीच मोठी अवजार बँक आहे. शासनाकडून लाभ मिळाल्यानंतर सुरेखाताई यांनी परिसरातील शेतकऱ्यांना अवजारे बँकेची सेवा उपलब्ध करून दिली आहे. रब्बी हंगामातील पीक काढणीनंतर जमीन तयार करणे, नांगरणी करणे, रोटाव्हेटर मारण्यासाठी त्या सध्या मदत करत आहेत. प्रतिदिवशी साधारणत: ५ एकर क्षेत्राची नांगरणी १२०० रुपये प्रतिएकर दराने व ८ एकर क्षेत्रावर रोटाव्हेटर मारण्यासाठी रुपये १००० प्रतिएकर दराने अवजारे भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. म्हणजेच महिनाभरात सध्या प्रतिदिवशी १४ हजार रुपये रक्कम त्यांना प्राप्त होत आहे. भविष्यात कल्टिव्हेटर, मळणी यंत्र, फवारणीसाठी ब्लोअर्स, पेरणीसाठी सीड कम फर्टिलायझरचा वापर परिसरातील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहेत. जेणेकरून शेतीसाठी मजुरांची समस्या भेडसावणार नाही, असे सुरेखाताई आवर्जून सांगतात.

जिल्हा माहिती कार्यालय, धुळे

'माझी वसुंधरा अभियान २.०' हे अभियान राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, विभागीय व जिल्हास्तरावरील अधिकाऱ्यांचा सन्मान जागतिक पर्यावरणदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात करण्यात आला. अमृत शहरांमध्ये नवी मुंबईला प्रथम, पुणे द्वितीय, तर सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका आणि सातारा नगरपरिषदेला विभागून तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशकथा...

काळजी वसुंधरेची, पर्यावरण रक्षणाची!

नवी मुंबई महानगरपालिका

राज्याच्या आर्थिक राजधानी मुंबईप्रमाणे आता नवी मुंबई ही राज्यात सर्वच क्षेत्रात आघाडीवर येत आहे. नवी मुंबईचा वाढता विस्तार, नागरीकरण पाहता या आखीव रेखीव शहरामध्ये पर्यावरणाशी संतुलन राखण्याचे काम नवी मुंबई महानगरपालिका करत आहे. शहरांच्या निर्मितीबरोबरच त्यातील वृक्षसंख्या वाढावी, यासाठी महापालिका विशेष प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांची राज्यस्तरावर दखल घेत माझी वसुंधरा अभियानातील अमृत शहरांमध्ये नवी मुंबईने पहिला क्रमांक पटकावला आहे.

नवी मुंबई शहरामध्ये पर्यावरणपूरक वातावरण राहावे, सिमेंटच्या इमारतींच्या गर्दीतही मोकळी हवा राहावी, यासाठी महापालिकेने जाणीवपूर्वक काम करण्यास सुरुवात केली. नवी मुंबई महानगरपालिकेने पर्यावरणपूरक शहर निर्मितीसाठी वृक्षारोपणाप्रमाणेच वृक्षसंवर्धनाकडेही विशेष लक्ष दिले. महापालिका क्षेत्रात मागील २ वर्षात दोन लाखांहून अधिक वृक्षरोपांची लागवड करण्यात आली आहे. यामध्ये सेक्टर १४ कोपरखैरणे येथील निसर्गोद्यानामध्ये मियावाकी पद्धतीने केलेल्या शहरी जंगल निर्मितीप्रमाणेच या वर्षी सेक्टर २८ नेरूळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई येथेही मियावाकी पद्धतीने १ लाख २३ हजार देशी प्रजातीच्या वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. एकाच ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्यात आलेला हा देशातील सर्वात मोठा मियावाकी पद्धतीचा शहरी जंगल प्रकल्प असेल. विशेष म्हणजे ही वृक्षलागवड पूर्णतः देशी प्रजातींच्या वृक्षांची असून फळे व फुले येणाऱ्या या देशी वृक्षराजीमुळे पशू व पक्ष्यांना पूरक वातावरण तयार होऊन शहराच्या जैवविविधतेत लक्षणीय भर पडत आहे. तसेच शहरातील प्रमुख रस्त्यांच्या कडेला २४ हरित क्षेत्रे विकसित करण्यात आली असून मोकळ्या जागा तसेच व्हर्टिकल गार्डन ही संकल्पना ठिकठिकाणच्या मुख्य चौकांमध्ये राबवण्यात आली आहे. वृक्ष लागवडीसाठी रोपे उपलब्ध होण्यासाठी महानगरपालिकेने स्वतःच्या रोपवाटिका निर्माण केल्या आहेत.

कचऱ्यावर प्रक्रियेला प्राधान्य

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या १०० टक्के कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जात आहे. कचऱ्याचे ओला, सुका व घरगुती घातक अशा तीन प्रकारे वर्गीकरण केले जाते. त्यासोबतच मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या सोसायट्या, वसाहती, संस्था येथे ओल्या कचऱ्यावर निर्मितीच्या ठिकाणीच प्रक्रिया करणारे प्रकल्प राबवले जात आहेत. 'टाकाऊपासून टिकाऊ' ही संकल्पना राबवत विविध उपक्रम आयोजित करण्यात येत असून त्यामध्ये लोकसहभाग घेतला जात आहे. टाकाऊपासून टिकाऊ संकल्पनेतून १४८ शिल्पाकृती निर्माण करून शहर सुशोभीकरणात लक्षणीय भर घालण्यात आली आहे.

प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर केला जाऊ नये, याकरिता नागरिकांमध्ये विविध माध्यमांतून जनजागृती केली जाते. महापालिकेने प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमाही प्रभावीपणे राबवण्यावर भर दिला आहे.

'थ्री आर'च्या अंमलबजावणीवर भर

'थ्री आर' अर्थात कचऱ्याचा पुनर्वापर (Reuse), कचरा निर्मितीत घट (Reduce) व कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया (Recycle) या संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात आहे. 'ग्रीनसोल' उपक्रमांतर्गत १ लाखाहून अधिक जुन्या वापरात नसलेल्या बूट/चप्पल यांचे संकलन करून व त्यांचे

नूतनीकरण करून गरजूंना वितरण करण्यात आले आहे. प्लास्टिकचे रॅपर्स व लहान तुकडे प्लास्टिक बाटल्यांतून विद्यार्थ्यांमार्फत साठवून 'प्लॅस्टिमॅन' उपक्रमांतर्गत प्रतिमहा ८०० प्लास्टिक बाटल्यांचे संकलन करण्यात येत आहे. शहरातील पाच झोपडपट्ट्यांमध्ये कचरा संकलित करून त्यामधील ओल्या कचऱ्याचे त्या परिसरातच कम्पोस्ट पिट्स तयार करून विल्हेवाट लावली जात आहे. प्रायोगिक तत्त्वावर सुरू असलेल्या या उपक्रमाद्वारे कचरा वाहतुकीच्या खर्चात बचत होत आहे. तसेच महिलांना रोजगारही उपलब्ध झालेला आहे. बांधकाम व पाडकाम कचरा अर्थात डेब्रिजची सर्वच शहरांना भेडसावणारी समस्या मार्गी लावण्यासाठी तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी अत्याधुनिक शास्त्रोक्त पद्धतीने बांधकाम व पाडकाम कचरा विल्हेवाट प्रकल्प राबवण्यात येत आहे.

कारंजे, उद्याने, बस डेपो आणि औद्योगिक वापरासाठी प्रक्रियायुक्त सांडपाण्याचा वापर केला जात असून त्याद्वारे पिण्याच्या पाण्याची मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी प्रक्रियायुक्त सांडपाणी प्रकल्पाकडे विशेष लक्ष घातले आहे. अत्याधुनिक मलप्रक्रिया प्रकल्पातील प्रक्रियाकृत ४५ दशलक्ष लीटर पाण्यावर टर्शिअरी ट्रीटमेंट करून ते टर्शिअरी प्रक्रियाकृत पाणी एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांना पुरवण्यात येणार आहे. तशा प्रकारचा करारही महानगरपालिकेचा एमआयडीसीसोबत झालेला आहे.

वृक्षसंवर्धन व कचऱ्यावरील प्रक्रियेबरोबरच शहरातील तलावांच्या जलाशयाची नियमित स्वच्छता राखली जात आहे. नाले स्वच्छ राहावेत, या दृष्टीने नाल्यांच्या काठांवर उंच जाळ्या बसवून नागरिकांनी थेट नाल्यात कचरा टाकू नये, यासाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. नाल्यांमध्ये स्क्रिन्स बसवून त्यात कचरा असल्यास तो वाहून जाताना एके ठिकाणी अडकून नियमित साफ करण्याची प्रणाली राबवण्यात येत आहे. विहिरींचे पुनरुज्जीवन करणे, तसेच पर्जन्य जलसाठ्यावर भर दिला जात आहे.

जलप्रदूषण रोखण्याबरोबरच वायू प्रदूषण रोखण्याकडेही महानगरपालिकेने विशेष लक्ष दिले आहे. हवेतील दूषित घटकांचे प्रमाण कमी करण्याप्रमाणेच हवा गुणवत्ता निरीक्षण करून त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना महानगरपालिकेकडून राबवल्या जात आहेत. वायू प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिकल वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने फेम २ अंतर्गत २० ठिकाणी इलेक्ट्रिकल चार्जिंग स्टेशन्स व त्यामध्ये १२० चार्जिंग पॉईंट्सची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सायकल वापरावर भर

सायकलसारख्या प्रदूषणविरहित वाहनाचा नागरिकांकडून प्रभावीरित्या वापर केला जात असून शहरात १५ कि.मी. सायकल ट्रॅकची निर्मिती करण्यात आलेली आहे. शहरात युलू सायकल सुविधेचा वापर करून २०१८ नोव्हेंबरपासून ३५ लाख किमी राईड्स झालेल्या आहेत. ६०० युलू सायकल आणि १८० ई-बाईक्स प्रवासी सेवेत कार्यान्वित असून ३५ कोटी ग्रॅम्सपेक्षा अधिक कार्बन फूटप्रिंटची बचत झालेली आहे. सार्वजनिक सायकल सेवेचा इतक्या मोठ्या प्रमाणात वापर करणारे नवी मुंबई हे देशातील अग्रगण्य शहर आहे. वीज वापर कमी करण्यासाठी एलईडी आणि सौर दिवे बसवण्यात आले आहेत. तसेच सरकारी इमारतींच्या छतावर सौर ऊर्जा पॅनल बसवण्यात येत असून ऊर्जा ऑडिट करण्यात येत आहे.

जनसहभागावर भर

नवी मुंबई महानगरपालिकेच्या यशात सर्वात महत्त्वाचा भाग हा लोकसहभागाचा आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण महानगरपालिकेच्या या सर्व उपक्रमांमध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग राहावा, या दृष्टीने पथनाट्यासारख्या प्रभावी माध्यमाचा वापर केला आहे. त्यासोबतच स्वच्छता मोहिमा, प्लास्टिक प्रतिबंध मोहिमा, चित्रकला, जिंगल, शॉर्टफिल्म व इतर स्पर्धांचे आयोजन, माझी वसुंधरा सामूहिक शपथ ग्रहण, चित्रभिंती व शिल्पकृतींद्वारे शहर सौंदर्यीकरणावर भर असे विविध उपक्रम राबवले आहेत. या सर्वच उपक्रमांना नवी मुंबईकरांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे.

पुरस्कारावर मोहोर

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने मागील वर्षी २०२०-२१ मध्ये राबवलेल्या 'माझी वसुंधरा अभियाना'त नवी मुंबई हे राज्यातील

द्वितीय क्रमांकाचे मानांकित शहर ठरले होते. या वर्षी 'निश्चय केला, नंबर पहिला' हे ध्येय नजरेसमोर ठेवून महानगरपालिका अभियानास सामोरी गेली आणि आपले गतवर्षीचे मानांकन एकने उंचावत राज्यातील सर्वोत्तम पर्यावरणपूरक शहराचा मान नवी मुंबई महानगरपालिकेस या वर्षी मिळाला आहे.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आयोजित पारितोषिक वितरण सोहळ्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी माझी वसुंधरा अभियान २०२१-२२ मधील राज्यातील प्रथम क्रमांकाचा मानाचा पुरस्कार स्वीकारला.

महानगरपालिकेने राबवलेले विविध उपक्रम, योजना, उपाय यांच्याबरोबरच लोकांचा सक्रिय सहभाग याचेच फलित म्हणजे माझी वसुंधरा अभियानात अमृत शहरांमध्ये राज्यातील प्रथम क्रमांकाच्या शहराचा हा बहुमान नवी मुंबईला मिळाला आहे. या यशामध्ये लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था व मंडळे, अधिकारी यांच्यासह विशेषत्वाने स्वच्छता, उद्यान आणि विविध विभागांतील कर्मचारी, प्रसारमाध्यमे यांच्या एकत्रित सहयोगाचा हा परिणाम आहे. या यशाबद्दल आयुक्त अभिजित बांगर यांनी समस्त नवी मुंबईकर नागरिकांचे अभिनंदन करीत अनमोल सहकार्याबद्दल आभार मानले आहेत.

– नंदकुमार वाघमारे,
माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका

माझी वसुंधरा अभियान १.० मध्ये अमृत शहरांमध्ये नववे स्थान मिळवणाऱ्या सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने माझी वसुंधरा अभियान २.० ची सुरुवात झाल्यानंतर या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट कामगिरी करत अमृत शहरांमध्ये दुसरे स्थान मिळवले आहे.

पर्यावरण रक्षण, निसर्ग संवर्धन ही जनचळवळ व्हावी यासाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने माझी वसुंधरा अभियान २.० अंतर्गत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले. यामध्ये भूमी या घटकांतर्गत महापालिकेने २२ हजार २५३ वृक्षांची लागवड केली. वृक्षगणना ॲप विकसित केले असून या ॲपद्वारे मनपाने स्वत: १ हजार २१० हेरिटेज वृक्षांची गणना व जिओ टॅगिंग केले आहे. विकसित केलेल्या पद्वारे आतापर्यंत २२ लाख ७१ हजार ९०३ वृक्षांची गणना करण्यात आली आहे. ११ हरित क्षेत्र निर्माण करण्यात आली आहेत. जैवविविधता रजिस्टर तयार करण्यात आले असून ते वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहे. तसेच मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले आहे. जुन्या ११ व नव्या १३ हरित क्षेत्रांचे मनपा व त्रयस्त संस्थेमार्फत संवर्धन करण्यात येत आहे. वृक्ष योजनेचा डीपीआर तयार करण्यात आला असून त्यास महासभेची मान्यता मिळाली आहे. मनपाच्या ५ व खासगी ११ अशा एकूण १६ नर्सरी उपलब्ध आहेत व या नर्सरीमध्ये ७ लाख ६० हजार इतकी रोपे उपलब्ध आहेत. प्लास्टिक पुनर्वापरासंबंधी १०० हून अधिक उपक्रम घेण्यात आले. दर महिन्याला एकल वापर प्लास्टिक बंदी मोहीम घेण्यात आली. एनजीओ व मनपामार्फत १० ई-कचरा व्यवस्थापनाबाबत प्रबोधन व संकलन उपक्रम घेण्यात आले. मनपाला खत निर्मितीचे हरित प्रमाणपत्र मिळाले आहे. महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस यांच्या नेतृत्वाखाली महापौर दिग्विजय सूर्यवंशी, उपायुक्त राहूल रोकडे, सर्व नगरसेवक, सामाजिक संस्था व नागरिक आणि मनपाचे सर्व कर्मचारी यांच्या सहभागातून हे यश मिळाले आहे.

अनेक पर्यावरणपूरक निर्णय

वायू या घटकांतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रात हवेची गुणवत्ता दरमहा त्रयस्त संस्थेमार्फत तपासण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल नियमितपणे संकलित केला जातो. फटाकेबंदी बाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये प्रबोधन करून नागरिकांना हरित सण साजरे करण्यास आवाहन करण्यात येते. महापालिका क्षेत्रातील राडारोडा संकलनासाठी जागा निश्चित केल्या आहेत व संकलनासाठी वाहने दिली आहेत. मनपा क्षेत्रात एकूण ११.८ कि.मी. लांबीचा ७ ठिकाणी सायकल ट्रॅक तयार करण्यात आला आहे. मनपाने २४ ई-बाईक खरेदी केल्या आहेत. मनपा क्षेत्रामध्ये ४६५ टू-व्हीलर, १३ थ्री-व्हीलर व २४ फोर-व्हीलर इलेक्ट्रिक वाहने आढळून आली आहेत.

ऊर्जा या घटकांतर्गत महानगरपालिकेमध्ये अपारंपरिक ऊर्जास्रोत वापराबाबत १७६ प्रबोधन उपक्रम राबवण्यात आले आहेत. ७५ सोलर व ३ हजार ४६० एलईडी बसवण्यात आले आहेत. मनपाच्या १५ शाळांवर व इतर ५ शासकीय इमारतींवर सोलर पॅनेल बसवण्यात आले आहेत. मनपा

क्षेत्रात ३४ ग्रीन बिल्डिंग आहेत, तर १२७ शासकीय इमारतींचे एनर्जी ऑडिट करण्यात आले आहे.

जल या घटकांतर्गत महापालिका क्षेत्रामध्ये ८५ जलसंवर्धन उपक्रम घेण्यात आले आहेत. त्यामध्ये (नदी, तलाव) जलपुनर्भरण खड्डे निर्मिती, माझी कृष्णामाई विशेष स्वच्छता अभियान यासारखे उपक्रम राबवण्यात आले आहेत. १५६ शासकीय इमारतींचे वॉटर ऑडिट केले आहे. ७६ इमारतींवर रेनवॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम बसवण्यात आली आहे. मनपाने ५ व शाळांनी ५० असे एकूण ५९ पर्कोलेशन पिट तयार केले आहेत. काळी खण सुशोभीकरण, तलाव स्वच्छता, नालेसफाई यासारखे १२४ जलसंवर्धन व सुशोभीकरण उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. शाडू मातीपासून मूर्ती बनवणे उपक्रम घेण्यात आले. ऑनलाईन पर्यावरणपूरक गणपती सजावट स्पर्धा घेण्यात आली. गणपती विसर्जनासाठी ३४ कृत्रिम कुंड निर्मिती व २१ मूर्तिदान केंद्रे उभारण्यात आली. यामध्ये १४ हजार १७ मूर्ती दान करण्यात आल्या, तर १४६ टन निर्माल्य संकलित झाले.

आकाश या घटकांतर्गत माझी वसुंधरा अंतर्गत एकूण ९ हजार ३१५ 'ई-प्लेज' घेण्यात आल्या. माझी वसुंधरा अभियान जनजागृतीसाठी १ हजार ५०० पेक्षा जास्त सोशल मीडिया पोस्ट करण्यात आले आहेत. महापालिका क्षेत्रात एकूण २३६ चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, पर्यावरणपूरक घरगुती गणपती सजावट हरित टेरेस गार्डन, स्वच्छ टेक्नॉलॉजी चॅलेंज, वक्तृत्व, जलतरण, सुंदर हस्ताक्षर इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेमधून ५० पर्यावरण दूतांची निवड करण्यात आली. पर्यावरणदूतांमार्फत १९० उपक्रम हाती घेण्यात आले.

अभियानाचा सकारात्मक परिणाम

माझी वसुंधरा अभियानांतर्गत ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती, अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, ई-वाहनांचा वापर, कचरा वर्गीकरण, जलसंवर्धन अशा प्रकारचे विविध प्रबोधन उपक्रम शाळा, कॉलेज, रहिवासी संसथामध्ये घेण्यात आले. घरच्या घरी ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती करणाऱ्याच्या संख्येत वाढ होत आहे. शहरामध्ये उद्यानांची संख्या वाढली आहे. शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड केल्यामुळे शहरातील हवेची गुणवत्ता सुधारली आहे व शहराच्या हरित क्षेत्रात वाढ झाली आहे. तसेच या हरित क्षेत्रामुळे विविध स्थलांतरित पक्षी आढळून आले आहेत. जलपुनर्भरण खड्डे व रेन वॉटर हार्वेस्टिंग केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी जमिनीमध्ये जिरवले जाते. त्यामुळे भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होत आहे. १५ शाळांमध्ये सोलर पॅनल बसवल्यामुळे तसेच शहरात विविध ठिकाणी सोलर व एल.ई.डी. लाईट बसवल्यामुळे मोठ्या प्रमाणात विजेची बचत होत आहे. शाळांमध्ये टाकाऊपासून टिकाऊ वस्तु तयार करणे, कचरा वर्गीकरण, माझी वसुंधरा या विषयांवर आधारित चित्रकला व निबंध स्पर्धा यासारखे उपक्रम राबवल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी आवड निर्माण झाली आहे.

– वर्षा पाटोळे,
जिल्हा माहिती अधिकारी, सांगली

पुणे महानगरपालिका

पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या पंचतत्त्वाचे संवर्धन करून शाश्वत विकास साधण्यासाठी पुणे महानगरपालिकेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. 'माझी वसुंधरा अभियान २.०' स्पर्धेत पुणे महानगरपालिकेला अमृत गटामध्ये राज्यस्तरावर तृतीय क्रमांक मिळाला आहे. स्वच्छ पर्यावरण, कार्बन न्युट्रालिटी, हरित ऊर्जा यावर भर देण्यात आला असून इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी पुणे महानगरपालिकेचा ईव्ही कक्षही राज्यातील इतर महानगरपालिकांसाठी दिशादर्शक ठरणारा आहे.

जैवविविधता संवर्धन

महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या आवारात असणारे ३३ हेक्टरचे गणेशखिंड उद्यान हे पुणे शहरातील पहिले जैवविविधता वारसास्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. पुणे शहर व परिसरात आढळणाऱ्या विविध पक्षी यांच्यासाठी प्रमुख ठिकाण ठरलेल्या अधिवासांचे 'ई-बर्ड' या संकेतस्थळावर मॅपिंग करण्यात आले आहे. पुणे शहराच्या पूर्व भागातील कवडीपाठ या ठिकाणी सर्वाधिक २४९ तर एआरएआय टेकडीवर (वेताळ टेकडी) २४८ आणि पाषाण तलाव परिसरात २२७ जातींचे विविध पक्षी आढळून आले आहेत. प्राणी बचाव केंद्र स्थापन करून प्राणी संवर्धनासाठी सेवांचा विस्तार केला आहे. वृक्ष गणनेनुसार शहरात ४७ लाख १३ हजार ७९१ वृक्ष संख्या आहे. वृक्षांच्या एकूण ४२९ प्रजाती, तर दुर्मीळ वृक्षांची संख्या १२४ आहे. शहरातील २०४ उद्याने पर्यावरण समृद्ध करण्यासोबत नागरिकांना मोकळ्या हवेत फिरण्याचाही आनंद देतात.

घनकचरा व्यवस्थापनात आघाडी

शहरातील ५० एकर जागेवरील कचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने कॅपिंग करण्याचे काम पूर्ण झाले आहे. बायो-मायनिंग प्रकल्पांतर्गत २० एकर जागेतील ९ लाख टन कचऱ्यापैकी सुमारे ५ लाख ७५ हजार टन कचऱ्यावरील काम पूर्ण झाले आहे. यामुळे जवळपास ९१ टक्के जागा रिकामी झाली आहे. स्वच्छ या संस्थेद्वारे ८ लक्ष ५० हजार टन वर्गीकरण केलेला कचरा संकलित केला जात आहे. प्लास्टिक आणि थर्माकोलचा वापर, कचरा उघड्यावर जाळण्यास बंदी घालण्यात आली आहे. शहरात बायो-मिथेनायझेशन, वेस्ट टू एनर्जी, इन्सिनरेशन सारखे प्रकल्प यशस्वीरीत्या राबवण्यात येत आहेत. ई-वेस्ट, बायो-मेडिकल वेस्ट, गार्डन वेस्ट स्वतंत्रपणे संग्रहित करण्यात येत असल्याने त्याचे चांगले परिणाम समोर आले आहेत. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आणि ऊर्जा निर्माण करण्यासाठी २३ विकेंद्रित जैव-मिथेनेशन प्रकल्प आहे.

हरित ऊर्जेवर भर

शहरात होणारी १ कोटी ५३ लक्ष युनिट्सची सौरऊर्जा निर्मिती २०२०-२१ मध्ये दुपटीने सुमारे ३ कोटी युनिट्सवर पोहोचली आहे. याच वर्षात ४९ हजार सोलर वॉटर हिटर्सच्या वापरामुळे वर्षभरात अंदाजे १ कोटी ८२ लक्ष युनिट्सची बचत झाली आहे.

इलेक्ट्रिक बसेस वाढवण्यावर भर

पुणे शहरात जानेवारी ते डिसेंबर २०२० दरम्यान १३ हजार ९५० नवीन सी.एन.जी. वाहनांची नोंद झाली आहे. सध्या एकूण २ हजार ४३१ सार्वजनिक वाहतूक बसेस असून त्यांपैकी १ हजार ७५९ सी.एन.जी. बसेस आहेत. ३२० इलेक्ट्रिक बसेस सेवेत दाखल झाल्या आहेत. अतिरिक्त १५० इलेक्ट्रिक बसेसची खरेदी प्रगतिपथावर आहे. १६ हजारापेक्षा जास्त तीन चाकी ऑटो रिक्षा पेट्रोलमधून सीएनजीमध्ये रुपांतरित करण्यासाठी अनुदान देण्यात आले.

शहरात मेट्रो प्रकल्पांना गती देण्यात आली असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या बळकटीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमुळे कामासाठी खासगी वाहनांचा वापर कमी होऊ शकेल. पर्यायाने प्रदूषणाला आळा बसणे शक्य होईल. सायकलिंग ट्रॅकचे १०० किमी नेटवर्क तयार केले असून अतिरिक्त ८०० किमी नियोजित आहे. इलेक्ट्रिक वाहनांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि शहरात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यासाठी धोरणांना प्रोत्साहन देण्यासाठी गुंतवणूक केली आहे.

स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत 'क्लायमेट स्मार्ट सिटिज असेसमेंट फ्रेमवर्क २.०' मध्ये एकूण ४ स्टार रेटिंगसह पुणे शहराने देशातील इतर ८ शहरांसह सर्वाधिक रेटिंग मिळवून पहिल्या लीगमध्ये स्थान प्राप्त केले आहे. जागतिक स्तरावर 'ब्लूमबर्ग फिलान्थ्रोफीस'तर्फे विविध शहरांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये पुणे शहराने 'इलेक्ट्रिक मोबिलिटी' या विषयावर प्रस्ताव सादर केल्याने जगातील एकूण ९९ देशांतील ६३१ शहरांपैकी पहिल्या ५० शहरांच्या यादीत येण्याची उल्लेखनीय कामगिरी पुणे शहराने केली आहे.

कार्बन उत्सर्जन रोखण्यास प्राधान्य

पुणे शहर अधिक पर्यावरणपूरक करण्यासोबतच कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठीच्या नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. हे साध्य करण्यासाठी पुणे शहराने धोरणापासून ते अंमलबजावणीपर्यंत अनेक पावले उचलली आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी पुणे शहर विविध आघाड्यांवर प्रयत्न करत आहे. 'रेस टू झिरो चॅलेंज' वर स्वाक्षरी करण्यात आली असून कार्बन न्युट्रालिटीचे लक्ष्य गाठण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर नावीन्यपूर्ण वीजपुरवठ्याच्या मॉडेलसह पारंपरिक सोडियम व्हेपरच्या १ लाख ८० हजार पथदिव्यांचे एलईडी दिव्यांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. वायू प्रदूषणाच्या दृष्टिकोनातून स्मशानभूमीच्या विभागाकडेदेखील लक्ष दिले आहे.

वायू प्रदूषण टाळण्यासाठी प्रयत्न

पारंपरिक लाकडावर आधारित अंत्यसंस्कारावेळी वापर करण्यास परावृत्त करण्यासाठी १२ गॅस आधारित स्मशानभूमी आहे. ७ इलेक्ट्रिक स्मशानभूमी आहेत जिथे ही सुविधा मोफत उपलब्ध करून दिली जाते. 'नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम'अंतर्गत पुणे शहरासाठी ॲक्शन प्लॅन तयार करण्यात आला आहे.

जलसंवर्धनासाठी रेनवॉटर हार्वेस्टिंग

रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि सोलर रूफ टॉप यंत्रणा बसवल्याबद्दल एक लाखापेक्षा अधिक इमारतींना मालमत्ता कर (घरपट्टी) मध्ये सवलत देऊन प्रोत्साहन देण्यात आले आहे. पुणे शहराने एकूणच जैवविविधता, पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन, ई-मोबिलिटीला चालना, हरित ऊर्जेवर भर,

कार्बन न्युट्रालिटीकडे लक्ष आदी बाबी गांभीर्याने घेतल्या असून त्याचेच फलित म्हणजे 'माझी वसुधंरा अभियान २.०' मध्ये राज्यात मिळालेला बहुमान होय, असे म्हणता येईल.

– गणेश फुंदे,
जिल्हा माहिती कार्यालय, पुणे

सातारा नगरपरिषद

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत पंचतत्वांचे संवर्धन व जतन करून शाश्वत विकास साधण्यासाठी सुरू केलेल्या 'माझी वसुंधरा अभियान-२.०' स्पर्धेत सातारा नगरपरिषदेने अमृत गटामध्ये राज्यस्तरावर तृतीय क्रमांक (विभागून) प्राप्त केला आहे.

वृक्षलागवड मोहीम

सातारा नगरपरिषद, वन विभाग सातारा तसेच विविध सामाजिक संस्थांमार्फत सातारा शहरामध्ये वृक्षलागवड केली असून त्यांचे संगोपन व संवर्धन केले जात आहे. सातारा शहराचे हरित क्षेत्राचे जीआयएस मॅपिंग पूर्ण झाले आहे. सातारा शहरामध्ये हेरिटेज वृक्ष आढळून आले असून जिओ टॅग पूर्ण झाले आहेत. सातारा नगरपरिषदेमार्फत विविध ठिकाणी नव्याने विकसित हरित क्षेत्रांची निर्मिती देखभाल करण्यात येत आहे. जैव-विविधता नोंदवही (पीबीआर) तयार केली आहे. त्यामध्ये विविध वृक्ष प्रजाती आढळून आल्या आहेत.

घनकचरा व्यवस्थापन

ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. सुक्या कचऱ्याची प्रक्रिया केली जाते. ई-वेस्ट व्यवस्थापन, संकलन स्वतंत्र प्रणाली उभारण्यात आली आहे. महालक्ष्मी ई-वेस्टेज संस्थेसोबत प्रक्रिया करण्यासाठी करार करण्यात आलेला आहे. जुन्या साचलेल्या कचऱ्यावर १०० टक्के प्रक्रिया करण्यात आली आहे.

अभियान कालावधीमध्ये हवेची तपासणी करण्यात आली. सातारा शहरातील आस्था सामाजिक संस्था व इतर संस्थेसोबत निसर्ग संवर्धनाबाबत काम करण्यात येते. विद्युत वाहन धोरण २०२१ अंतर्गत विद्युत वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी सातारा शहरामध्ये विविध ठिकाणी इलेक्ट्रिकल चार्जिंग पॉईंट उभारण्यात आले आहेत. बांधकाम परवाना देताना इलेक्ट्रिकल चार्जिंग पॉइंट बंधनकारक करण्यात आला आहे.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव व दुर्गोत्सव

सातारा शहरामध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सव व दुर्गोत्सव साजरा करण्यात आला, त्यामध्ये २४ ठिकाणी पर्यावरण पूरकविसर्जन कुंड तयार करण्यात आले होते. बांधकाम परवानामध्ये रेनवॉटर हार्वेस्टिंगबाबत सक्ती करण्यात आली आहे. रेनवॉटर हार्वेस्टिंग केलेल्या नागरिकांना मालमत्ता करामध्ये ५% सवलत देण्यात येत आहे. 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान'अंतर्गत सेप्टिक टँकमधील मैल्यांचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. सातारा नगरपरिषदेमार्फत सुरू करण्यात आलेल्या सोनगाव कचरा डेपो येथे मैला व्यवस्थापन प्रक्रिया केंद्र उभारण्यात आलेले असून, हे मैला केंद्र कायमस्वरूपी सुरळीतरीत्या सुरू राहावे म्हणून सातारा शहरातील सर्व श्रमिक कचरा वेचक संघ यांना हा प्रकल्प चालवण्यासाठी देण्यात आलेला आहे. प्रक्रिया करण्यात आलेल्या पाण्याचा पुनर्वापर एफएसटीपीच्या माध्यमाने प्रक्रिया करून पाणी हरित क्षेत्रांमध्ये आणि दुभाजकावर वापरले जाते.

विद्युत वाहनांच्या वापरासाठी प्रोत्साहन

विद्युत वाहनाचा वापर व त्यासाठी प्रोत्साहन करण्यात येत आहे. अपारंपरिक ऊर्जास्रोतांचा वापर करण्यासाठी सातारा नगरपरिषदेमार्फत ११३ कार्यक्रम हाती घेण्यात आले होते. अपारंपरिक ऊर्जास्रोत वापर केल्यास मालमत्ता करामध्ये पाच टक्के सूट देण्यात येत आहे. माझी वसुंधरा २.० अभियानाला प्रोत्साहन देण्यासाठी सातारा नगर परिषदेमार्फत २५ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

– दत्तात्रय कोकरे,
जिल्हा माहिती अधिकारी, सातारा

हरियाणा येथे नुकत्याच पार पडलेल्या तिसऱ्या 'खेलो इंडिया युथ गेम्स'मध्ये राज्यातील खेळाडूंनी सुवर्ण कामगिरी करून राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. २०१८ मध्ये अगदी पहिल्या शालेय स्पर्धेपासून (खेलो इंडिया स्कूल गेम्स) महाराष्ट्राने खेलो इंडियात वर्चस्व गाजवले आहे. मागील दोन युथ गेम्स स्पर्धांत आपण क्रमांक एकवर होतो. यंदाही ४५ सुवर्ण पदकांसह दुसरे स्थान पटकावून खेळाडूंनी राज्याचा लौकिक वाढवला आहे. साजेशी कामगिरी करून सर्वच क्रीडा प्रकारात महाराष्ट्राने छाप सोडली.

खेलो इंडिया युथ गेम्स २०२१
राज्याची सुवर्ण कामगिरी

ओम प्रकाश बकोरिया

'खेलो इंडिया युथ गेम्स'मुळे देशातील खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळाले आहे. खेळाचा हा महाकुंभ दरवर्षी भरतो. खरे तर ही स्पर्धा मिनी ऑलिम्पिकच आहे. ऑलिम्पिकसह इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये खेळाडूंनी सुवर्णपदके पटकावून देशाचे नाव उज्ज्वल करावे, यासाठीची ही तयारी आहे. २०१८ पासून ही स्पर्धा सुरू झाली. कोरोनामुळे वेळापत्रक थोडे विस्कळीत झाले. जून २०२२ मध्ये हरियाणा येथे ही तिसरी खेलो इंडिया युथ गेम्स स्पर्धा पार पडली. यामध्ये राज्यातील खेळाडूंनी मराठी बाणा दाखवत सर्वच क्रीडा प्रकारात छाप सोडत १२५ पदकांची कमाई केली.

खेळाडुंचे वर्चस्व कायम

सांस्कृतिक, शैक्षणिक, औद्योगिक आणि क्रीडा क्षेत्राचा परीघ मोजूनच कोणत्याही राज्याची प्रगती ठरवली जाते. महाराष्ट्राने राज्याच्या स्थापनेपासूनच सर्वच क्षेत्रात भरारी घेतली आहे. कुस्ती, कबड्डी, खो-खो या पारंपरिक खेळाच्याहीपलीकडे जाऊन खेळाडू मैदान गाजवत आहेत. जलतरण, बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, सायकलिंग, ॲथलेटिक्ससारख्या खेळातही महाराष्ट्र उजवा ठरत आहे. नव्याने समाविष्ट झालेल्या मल्लखांबमध्येही राज्यातील खेळाडूंनी चमक दाखवली आहे. खो-खो, कबड्डीत तर महाराष्ट्राची मक्तेदारी आजही कायम आहे. 'थांग ता', 'गतका'सारख्या नव्या क्रीडा प्रकारातही पदके येऊ लागली आहेत. आर्चरीमध्येही आपले खेळाडू अचूक निशाणा साधत आहेत. जिम्नॅस्टिक, योगामध्येही सुवर्णाची खेळाडूंनी लयलूट केली आहे.

सराव शिबिर व रणनीती

या यशाच्या पाठीमागे आहे ती खेळाडूंची मेहनत आणि क्रीडा विभागाचे धोरण. प्रत्येक खेळासाठी क्रीडा मार्गदर्शक आणि प्रशिक्षकांनी केलेल्या डावपेचाचेही तेवढेच योगदान आहे. राज्याचा संघ निवडला जातो, त्या वेळी वेगवेगळ्या जिल्ह्यातील, विभागातील खेळाडूंचा त्यात समावेश असतो. त्यांच्यात सांघिक भावना निर्माण व्हावी, तसेच खेळाची रणनिती (गेम प्लॅन) ठरवण्यासाठी त्यांना स्पर्धेपूर्वी प्रशिक्षण महत्त्वाचे असते. क्रीडा विभागाने पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात (बालेवाडी) २० मे ते ७ जून २०२२ दरम्यान २५ क्रीडा प्रकारांसाठी निवासी सराव शिबिर उपलब्ध करून दिले होते. या शिबिराचा गेम प्लॅन व इतर स्ट्रॅटेजी ठरवण्यासाठी उपयोग झाला.

पुढील काळात लष्करासोबत सामंजस्य करार करून तेथील प्रशिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असून पदकांच्या रकमेत लाखो रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. सुवर्णपदकासाठी तीन लाख, रौप्यसाठी दोन लाख आणि कांस्य पदकासाठी एक लाख रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. त्याचसोबत स्पर्धेतील सहभागी खेळाडूंना प्रोत्साहन म्हणून २५,००० रुपये रोख पारितोषिक देण्याचेदेखील शासनाने मान्य केले आहे.

हरियाणातील पंचकुला येथे आयोजित तिसऱ्या खेलो इंडिया यूथ गेम्स २०२१ मधील विजयाचे शिलेदार.

दूरदृष्टीतही राज्य पहिले

महाराष्ट्र ते हरियाणा मोठे अंतर आहे. हा प्रवास करण्यात खेळाडूंची दमणूक होऊ नये म्हणून राज्य सरकारच्या क्रीडा विभागाने त्यांना थेट विमानाने स्पर्धेच्या ठिकाणी नेले. मागील स्पर्धेच्या वेळीही अशीच सुविधा उपलब्ध करून दिली गेली होती. त्याचा निश्चित खेळाडूंच्या कामगिरीवर सकारात्मक परिणाम झाला. सरकारने ३७१ खेळाडूंना (१९३ मुली, तर १७८ मुले) तसेच मार्गदर्शक, प्रशिक्षकांच्या चमूला ही सुविधा उपलब्ध करून दिली. अशा प्रकारची सुविधा देणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. या सुविधेबाबत स्पर्धेच्या ठिकाणी नेहमीच चर्चा असते. इतर राज्यातील खेळाडूंना त्याचे नेहमीच अप्रूप वाटत आले आहे.

क्रीडा विभागाचे सहसंचालक चंद्रकांत कांबळे, क्रीडा अधिकारी अरुण पाटील यांच्या टीमकडे खेळाडूंच्या नियोजनाची जबाबदारी होती. खेळाडूंची निवासव्यवस्था, प्रवास, इतर तांत्रिक बाबीही स्पर्धेदरम्यान विचारात घ्याव्या लागतात. याचेही नियोजन महत्त्वाचे असते. त्याबाबतही योग्य नियोजन करण्यात आले होते.

राज्यातील खेळाडूंचा दबदबा

तिसऱ्या खेलो इंडिया स्पर्धेत यजमान हरियाणाला महाराष्ट्राचे तगडे आव्हान होते. त्यांचे खेळाडू, क्रीडा विभागातील अधिकारी, बारकाईने महाराष्ट्रावर लक्ष ठेवून होते. स्पर्धेच्या अगदी पहिल्या दिवसापासून याच दोन राज्यात पहिल्या क्रमांकासाठी चढाओढ होती. शेवटच्या दिवसापर्यंत ही रस्सीखेच सुरू होती. बॉक्सिंगमधील ७ सुवर्णपदकांनी त्यांना तारले, नाही तर महाराष्ट्राने नंबर वनची हॅट्ट्रिक साधली असती. जिम्नॅस्टिकमध्ये महाराष्ट्राच्या संयुक्ता काळेने पटकावलेली पाच सुवर्णपदके, ॲथलेटिक्समध्ये सुदेष्णा शिवनकरने पटकावलेली तीन सुवर्णपदके, जलतरणामध्ये अपेक्षा फर्नांडिसने पटकावलेली पाच सुवर्णपदके हे स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरले. हर्षदा गरूडचीही वेटलिफ्टिंगमध्ये वजनदार कामगिरी ठरली. ४५ किलो वजन गटात तिने ८३ किलो वजन उचलून राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला.

२०१८ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या खेलो इंडिया स्कूल गेम्समध्ये राज्याने एकूण १११ पदकांची कमाई करून एकूण पदक संख्येत अव्वल स्थान गाठले होते, तर हरियाणाला १०२ पदके मिळाली होती. २०१९ मध्ये शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या खेलो इंडिया युथ गेम्समध्येदेखील राज्याने २०० पदकांची कमाई करून अव्वल स्थान कायम राखले होते, तर हरियाणाला १२३ पदकांसह दुसऱ्या स्थानवर समाधान मानावे लागले होते. गुवाहाटी येथे पार पडलेल्या दुसऱ्या खेलो इंडिया गेम्समध्येदेखील राज्याने तब्बल २५६ पदकांची कमाई करून अव्वल स्थान कायम ठेवले, तर हरियाणाला २०० पदके मिळाली. हरियाणातील पंचकुला येथे झालेल्या तिसऱ्या खेलो इंडिया युथ गेम्समध्येही राज्याने १२५ पदकांची कमाई करून राज्याचा दबदबा कायम ठेवला; मात्र यजमान हरियाणा या वेळी १३७ पदके घेऊन अव्वल स्थान मिळवण्यास यशस्वी झाला. त्याखालोखाल कर्नाटक, मणिपूर, केरळ राज्यांनीही चांगली कामगिरी करत पदकांची कमाई केली.

तिसऱ्या खेलो इंडिया युथ गेम्समधील राज्याची कामगिरी

अ.क्र	खेळ	सुवर्ण	रौप्य	कांस्य	एकूण
१	धनुर्विद्या	१	१	०	२
२	ॲथलेटिक्स	८	३	१	१२
३	बॅडमिंटन	१	०	०	१
४	बास्केटबॉल	०	०	०	०
५	बॉक्सिंग	१	३	५	९
६	सायकलिंग	२	६	१	९
७	गतका	०	०	२	२
८	जिम्नॅस्टिक्स	६	७	८	२१
९	ज्यूडो	१	०	१	२
१०	कबड्डी	०	१	१	२
११	खो-खो	२	०	०	२
१२	मल्लखांब	२	२	५	९
१३	शूटिंग	०	०	०	०
१४	जलतरण	६	६	४	१६
१५	टेबल टेनिस	२	०	१	३
१६	टेनिस	१	१	२	४
१७	थांग-ता	०	०	०	०
१८	वेटलिफ्टिंग	३	१	२	६
१९	कुस्ती	३	५	६	१४
२०	योगासन	६	४	१	११
एकूण		४५	४०	४०	१२५

आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य

ज्या वाचकांना 'द पायरेट्स ऑफ द कॅरिबियन' या चित्रपटातील लबाड सागरी चाच्याच्या रूपातील लढवय्या जॉनी डेप आवडला आहे, त्यांना कुख्यात डाकू सुलताना या 'देसी' सागरी चाच्याच्या धाडसाची तितकीच मोहक, हृदयस्पर्शी, रोमांचक अशी कथा, सुजित सराफ लिखित 'द कन्फेशन्स ऑफ सुलताना डाकू' या पुस्तकात वाचायला नक्कीच आवडेल.

'धाडसी डाकू'चा कबुलीजबाब

दीपक कपूर

'द कन्फेशन्स ऑफ सुलताना डाकू' या पुस्तकाची सुरुवात काहीशी नाट्यमय अशी आहे. दिनांक ७ जुलै १९२४... २०व्या शतकाच्या सुरुवातीला संयुक्त प्रांतातील शहरे आणि गावांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या, क्रूर आणि भीतिदायक म्हणून कुख्यात असलेल्या दरोडेखोरांच्या भंटू टोळीचा सरदार सुलताना डाकू, लेफ्टनंट कर्नल सॅम्युएल पिअर्स याच्या आगमनाची हल्द्वानी कारागृहात वाट पाहत आहे. कदाचित सुलताना डाकूची ती शेवटची रात्र असावी... तांबडं फुटायच्या आत त्याला फाशी दिली जाईल.

त्या कुख्यात डाकूच्या मनात त्या एका रात्रीत होणाऱ्या भावनिक आंदोलनांची, त्याच्या चरस सेवनाच्या आणि इतर आनंददायी आठवणींची, त्याच्या अचाट पराक्रमांची आणि अविश्वसनीय धैर्याची, नृत्यांगना फुलकंवरसाठी त्याच्या मनात असलेल्या नाजूक प्रेमाची तसेच भंटू समुदायाशी जोडल्या गेलेल्या घट्ट भावबंधाची कल्पनारम्य कथा यातून कथन करण्यात आली आहे.

भंटू या गुन्हेगारी टोळीचा सरदार



असलेल्या, ज्याचा मुख्य व्यवसाय संयुक्त प्रांतातील गावांमध्ये चोऱ्या करणे आणि दरोडे घालणे हा आहे, अशा सुलताना डाकूच्या जीवनाचे आणि घटनांचे हुबेहूब वर्णन पुस्तकात केले आहे. आश्चर्यकारक, साहसपूर्ण घटनांनी भरलेली ही एक शौर्यकथा आहे. एकीकडे गुन्हेगार म्हणून सुलतानाचा नशिबावर विश्वास आहे परंतु आपल्या मुलाचे आपल्यासारखेच भविष्यात आयुष्य त्याला नको आहे. या भीतिदायक डाकूचा मानवी चेहरा आणि त्याच्या मनाचा कमकुवतपणा या दोन्हींचे दर्शन पुस्तकातून घडते.

सुजित सराफ हा निष्णात कथनकार आहे. सुलताना डाकूच्या वैयक्तिक अनुभवांमधून, अतिवास्तववादी धारणांमधून, त्याच्यावरील फ्रॉइडियन प्रभावामधून त्याच्या गुंतागुंतीच्या जाणिवा, हळूहळू उलगडत जाणारा अंधश्रद्धेवरचा त्याचा फॉस्टियन विश्वास, धाडसाच्या कामगिरीसोबतच त्याला येणारे भयाचे झटके आणि स्वतःच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वाममार्गाचा निर्दयी वापर, स्वतःच्या गुन्हेगारी कृत्यांवर आणि शापित नशिबावर एखाद्या अबोध बालकासारखा विश्वास हे सारे हळूहळू उलगडत जाते.

कादंबरीतील एकूण वातावरणात चार्ल्स डिकन्सच्या कादंबऱ्यांप्रमाणे निराशाजनक आहे, बोगद्याच्या शेवटी प्रकाश नसल्याची, अंधकाराचे पूर्वसूचना करणारी उदासीनता आहे. १९२० च्या दशकात एकीकडे भारतामध्ये ब्रिटिश राजवट वैभवाच्या शिखरावर असतानाच्या राजकीय परिस्थितीचे आणि दुसरीकडे भारताच्या समाजजीवनातील घुसळणीतून प्रचंड बहुसंख्याक जनता आणि पाशवी चालीरितींचा पगडा असलेले मूलनिवासी यांच्यामधील दिसून येणारा संघर्ष, याचे प्रखर चित्रण एकाच वेळी करण्यात आले आहे. मात्र, सराफ यांनी याला कुठेही सवंग राजकीय रंग येऊ दिलेला नाही. कादंबरीला एक गडद छटा असूनही, सराफ यांची शैली ओघवती, खिळवून ठेवणारी, नाट्यमयता आणि ऐतिहासिक घटनांमुळे अतिशय मनोरंजक आहे. मॅकबेथमधील शेक्सपिअरच्या तीन चेटकिणींप्रमाणे, सुलताना डाकू वाचकांवर आपल्या मोहिनीचे जाळे विणतो.

कादंबरीचे स्वरूप आजीच्या कथेप्रमाणे रसाळ आहे. एका कुशल कथाकाराने सांगितलेला, रोमांचकारी घटनांनी भरलेला आणि खूप काही सांगणारा, एका धाडसी लुटारूचा खिळवून टाकणारा कबुलीजबाब नक्कीच वाचायला हवा.

(लेखक हे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक आहेत.)

राज्यातील संपूर्ण कोकणसह, अमरावती विभागातील काही तालुक्यांमध्ये पाऊस होत आहे. राज्यातील सर्व यंत्रणा आपत्तींमध्ये जीवितहानी होणार नाही यासाठी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. या परिस्थितीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लक्ष ठेवून आहेत. याबरोबरच राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय व त्यांची अंमलबजावणी, पुरस्काराचे वितरण, विविध विभागांचा आढावा, विकासकामासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी दिलेले निर्देश व सूचना अशा अनेक बाबींचा हा थोडक्यात आढावा...

पाऊल पडते पुढे

कामकाजाला प्रारंभ....

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ७ जुलै २०२२ रोजी मंत्रालयात सहाव्या मजल्यावर आपल्या दालनात प्रवेश करून कामकाजाला प्रारंभ केला. शपथविधीनंतर मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी तातडीने कामकाजाला सुरुवात केली होती. परंतु प्रथमच मुख्यमंत्री श्री. शिंदे राज्याचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या मंत्रालयातील आपल्या दालनात दाखल झाले. तसेच त्यांनी लगेचच विविध विषयांवरील बैठकांना उपस्थिती दर्शवून अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या पत्नी लता शिंदे, वडील संभाजी शिंदे, मुलगा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, सून वृषाली शिंदे, नातू रुद्रांश उपस्थित होते. या वेळी काही आमदारांनी पुष्पगुच्छ देऊन मुख्यमंत्र्यांना सदिच्छा दिल्या. या वेळी मंत्रालयातील अधिकारी आणि कर्मचारी यांनीदेखील मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या स्वागतासाठी गर्दी केली होती. तत्पूर्वी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मंत्रालयात प्रवेश

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रालयातील दालनातून कामकाजाला प्रारंभ केला.

केल्यावर छत्रपती शिवाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन केले.

मदत कार्यावर मुख्यमंत्र्यांचे लक्ष

कोकणासह राज्याच्या काही भागात सुरु असलेल्या जोरदार पावसाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आपत्ती व्यवस्थापन आणि मदत कार्यावर लक्ष ठेऊन आहेत. पूरपरिस्थितीवर उपाययोजना म्हणून राज्यातील विविध जिल्ह्यात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या (एसडीआरएफ) ११ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच बेस स्टेशनवर एनडीआरएफच्या ९ आणि एसडीआरएफच्या ४ अशा एकूण १३ तुकड्या सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

राज्यातील संपूर्ण कोकणसह, अमरावती विभागातील काही तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस होत आहे. त्यामुळे काही ठिकाणी पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच काही ठिकाणी नदीच्या पातळीत होणारी वाढ लक्षात घेऊन खबरदारीचा उपाय म्हणून स्थानिक पातळीवर उपाय योजना करण्यात येत आहेत. तसेच आवश्यक ठिकाणी राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या तुकड्या तैनात आहेत.

नदी जोड प्रकल्पाबाबत आढावा

वैनगंगा - नळगंगा नदी जोड प्रकल्पाबाबतचा आराखडा तयार करावा. तसेच पश्चिम वाहिनी नद्यांतून वाहून जाणारे पाणी सिंचनासाठी गोदावरी खोऱ्यात वळवण्यासाठी प्रयत्न करावे. त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वैनगंगा - नळगंगा नदी जोड प्रकल्प आणि पश्चिम वाहिनी नद्यांतून वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळवण्याबाबत सह्याद्री राज्य अतिथिगृहात बैठक झाली. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

वैनगंगा नदीच्या खोऱ्यातील अतिरिक्त पाणी नळगंगा खोऱ्यात नेण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या प्रकल्पामुळे अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वर्धा आणि नागपूर जिल्ह्यातील सुमारे पावणे चार लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊ शकते, अशी माहिती बैठकीत देण्यात आली. अमरावती आणि नागपूर विभागातील दुष्काळी परिस्थितीवर मात करता येणे शक्य होईल. त्यामुळे या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले. यासाठी निधीची तरतूद केली जाईल, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

स्मार्ट प्रकल्पाला गती

राज्याच्या सर्वांगीण प्रगतीत कृषी क्षेत्राचे, शेतकरी बांधवांचे मोठे योगदान आहे. शेतकरी बांधवांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. त्यामुळे या स्मार्ट प्रकल्पाला गती द्यावी, त्यासाठी कालबद्ध नियोजन करण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प आढावा बैठक पार पडली. बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदी उपस्थित होते. तसेच दृक्श्राव्यप्रणालीद्वारे जागतिक बँकेचे प्रतिनिधी तसेच आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ सहभागी होते.

पेक्स ॲथॉरिटीची बैठक

बेंगळूरू - मुंबई औद्योगिक कॉरिडॉरचे काम योग्य जागा न मिळाल्याने सुरू झालेले नाही. मात्र आता कोरेगाव सातारा येथील जागा या कॉरिडॉरसाठी देण्यात येणार असून व यासाठी जमीन संपादन प्रक्रिया तत्काळ सुरू करण्यात येईल. त्याचप्रमाणे बल्क ड्रग पार्कची सुरुवात दिघी पोर्टतून सुरू करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी औद्योगिक कॉरिडॉर प्रकल्पाच्या पेक्स ॲथॉरिटीच्या पहिल्या बैठकीत दिली. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केलेल्या सूचनेला पीएम गतिशक्ती योजनेंतर्गत चालना देण्यात येईल आणि दिघी पोर्टबाबत विशेष आढावा ऑक्टोबरपर्यंत घेतला जाईल, अशी ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी अध्यक्षीय भाषणात दिली.

या बैठकीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, निती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी त्याचप्रमाणे अन्य राज्यांचे मुख्यमंत्री, उद्योग मंत्री, केंद्रीय सचिव आदी दुरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

समृद्धी महामार्ग विकासाचा साक्षीदार

महाराष्ट्र हे देशाचे विकास इंजिन कायमच राहिले आहे. महाराष्ट्रात वेगाने विकास होण्याची क्षमता असून उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनामार्फत संपूर्ण प्रोत्साहन दिले जाईल. वेगवेगळ्या क्षेत्रातील उद्योजकांनी महाराष्ट्रात येण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाईल. महाराष्ट्राच्या प्रगतीचा आणि विकासाचा साक्षीदार ठरणाऱ्या समृद्धी महामार्गाचा एक टप्पा लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक मंत्रालयामार्फत आजादी का अमृत महोत्सवांतर्गत 'संकल्प से सिद्धी' (नवा भारत, नवे संकल्प) परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय सांस्कृतिक कार्य आणि परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री मीनाक्षी लेखी यांच्यासह सीआयआयचे पदाधिकारी यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

आज आपण देशाचा अमृतमहोत्सव साजरा करत असताना भारताच्या येणाऱ्या

पुढच्या २५ वर्षांत नेमकी काय प्रगती आणि विकास करायचा आहे, याचे नियोजन करणे आवश्यक आहे. समतोल विकास साधत असताना पायाभूत सुविधांसह राज्यातील प्रत्येक क्षेत्रावर लक्ष देण्यात येणार आहे. महाराष्ट्र हे जसे संतांची आणि देवांची भूमी म्हणून ओळखली जाते. तसेच महाराष्ट्राची उद्योग आणि पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर असे राज्य अशीसुद्धा ओळख असून ही ओळख कायम टिकवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने गेल्या पाच वर्षांत समृद्धी महामार्गाचे काम पूर्ण करण्याबरोबरच खालापूर ते सिंहगड येथे सर्वात मोठा बोगदा बांधण्याचे काम पूर्ण केले आहे. हा बोगदा बांधण्यात आल्याने आता मुंबईहून पुण्याला जाताना वेळेची बचत होण्यास मदत होणार आहे. आजच्या काळात राज्याची प्रगती ही पायाभूत सुविधांचे जाळे किती विकसित आहे यावरून ठरत असते असे म्हटले जाते. त्यामुळे महाराष्ट्रात येणाऱ्या काळात रस्त्यांचे आणि पायाभूत सुविधांचे जाळे विस्तारीकरणावर भर देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

पूर परिस्थितीचा आढावा

गडचिरोली जिल्हा दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्र्यांनी पहिल्याच भेटीत गडचिरोलीच्या दोन प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळवून दिला. यापूर्वी पालकमंत्री म्हणून काम करत असणारे एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेत आपल्या पहिल्याच दौऱ्यात दरवर्षी संपर्क तुटणाऱ्या गावांसाठी कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करणार तसेच गडचिरोली वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणार असे जाहीर केले. ते पूर परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी गडचिरोलीत आले होते. त्यांच्या समवेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित होते.

दक्षिण गडचिरोलीत भामरागड, अहेरी व सिरोंचा येथे कित्येक रस्ते पावसाच्या पाण्यामुळे बंद आहेत. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी तातडीचा गडचिरोली दौरा केला. या वेळी त्यांनी नियोजन भवन येथे जिल्हा आपत्ती नियंत्रण व्यवस्थापनाबाबत आढावा बैठक घेतली.

या वेळी जिल्हाधिकारी संजय मीना यांनी जिल्ह्यातील पर्जन्यमान, पूरस्थिती, स्थलांतरितांबाबत माहिती सादर केली. बैठकीला खासदार अशोक नेते, आमदार डॉ. देवराव होळी, आमदार कृष्णा गजबे, विभागीय आयुक्त माधवी खोडे-चवरे आदी उपस्थित होते.

विकासकामांचा आढावा

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथे प्रस्तावित मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमुळे जनतेची सोय होणार असून, तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊ शकेल. हॉस्पिटल लवकरात लवकर उभे राहावे, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने प्रयत्न करावेत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सिंधुदुर्ग आणि नांदेड जिल्ह्यातील विविध प्रश्नांसदर्भात सह्याद्री अतिथिगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी आमदार दीपक केसरकर, राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज यांसह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे शहराला अतिरिक्त पाणी

ठाणे शहराला पाण्याचा वाढीव पुरवठा व्हावा यासाठी भातसा आणि बारवी धरणातून प्रत्येकी ५० दशलक्ष लीटर आणि मुंबई महापालिकेच्या कोट्यातील २० दशलक्ष लीटर प्रक्रिया केलेले पाणी कोपरी आणि वागळे इस्टेट परिसर तसेच दिवा परिसरासाठी साडेसहा दशलक्ष लीटर अतिरिक्त पाणी देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात ठाणे जिल्ह्यातील पाणीप्रश्नांची आढावा बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव ठाणेचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अनबल्गन, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार रवींद्र फाटक यांसह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे महापालिका क्षेत्रात दररोज ४८५ दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र, वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत हा पाणीपुरवठा कमी पडतो. हे लक्षात घेऊन बारवी आणि भातसा धरणांतून प्रत्येकी ५० दशलक्ष लीटर वाढीव पाणी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू होते. बारवी धरणाची उंची वाढवल्यानंतर या धरणातून शहराला १०० दशलक्ष लीटर पाणी मिळावे, असा आग्रह महापालिका प्रशासनाने धरला होता. जलसंपदा विभागाने अतिरिक्त पाणी साठा उपलब्ध करून देण्यासाठी पुढील कार्यवाही तत्काळ करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी दिले.

काळू धरणाच्या कामांसाठी निधी

ठाणे जिल्ह्याची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन जिल्ह्याला पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या काळू धरणाच्या कामांना गती देण्यासाठी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने ३३६ कोटी निधी भुसंपादनासाठी उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. कल्याण मंडणगड-कुशिवली धरणाचे काम वेगाने पूर्ण करावे, अशी मागणी या वेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली.

सह्याद्री अतिथिगृहात ठाणे जिल्ह्यातील पाणी प्रश्नासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी त्यांनी हे निर्देश दिले. या बैठकीस राज्याचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ठाणेचे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. अनबल्गन, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार रवींद्र फाटक यांसह विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्यातील काळू धरणाच्या

उभारणीसाठी मुरबाड तालुक्यातील १२ ग्रामपंचायतीतील १८ गावे आणि २३ पाड्यांची जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. तसेच वन विभागाची ९९९ हेक्टर जमीनही या धरणामुळे पाण्याखाली जाणार आहे. या सर्व जमिनीच्या भूसंपादनासाठी एमएमआरडीएने पहिल्या टप्प्यात ३३६ कोटी रुपये उपलब्ध करून द्यावेत. ज्यायोगे भूसंपादन विहित वेळेत पूर्ण होऊन धरणाच्या कामाला गती येईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी सांगितले.

नुकसानीचे पंचनामे करावेत

पावसामुळे वारंवार येणाऱ्या पुराचा धोका लक्षात घेता पूर नियंत्रणाचा भाग म्हणून नदीपात्रातील वाळू व गाळ काढण्यासाठी शास्त्रशुद्ध कार्यक्रम जलसंपदा विभागाने आखण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मंत्रालयातील समिती कक्षात राज्यातील गडचिरोली, वर्धा, यवतमाळ व चंद्रपूर येथील पूरग्रस्त भागात झालेल्या नुकसानीबाबत आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. या वेळी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव भुषण गगराणी, प्रधान सचिव विकास खारगे, अपर मुख्य सचिव (बांधकाम) मनोज सौनिक, अपर मुख्य सचिव (महसूल) नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असिम गुप्ता, एनडीआरएफचे कमांडंट आशिष कुमार, एसडीआरएफचे अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, विभागीय आयुक्त अमरावती, नागपूर तसेच गडचिरोली, चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक या वेळी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

सणउत्सव शांततेत साजरा करा

गणेशोत्सव, दहीहंडी आणि मोहरम तसेच अन्य आगामी सणउत्सव शांततेत, उत्साहात आणि जल्लोषात पार पडावेत यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. तसेच पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. गणेशोत्सव मंडळांना सर्व परवाने ऑनलाईन व एक खिडकी योजनेंतर्गत देण्यासंदर्भात राज्यातील सर्व जिल्ह्यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी या वेळी दिल्या.

सार्वजनिक गणेशोत्सव, मोहरम, दहीहंडी तसेच आगामी सण व उत्सवांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात तसेच विविध व्यवस्थेबाबत आढावा बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सह्याद्री अतिथिगृहात घेण्यात आली. या वेळी मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.

या बैठकीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, प्रधान सचिव संजय सक्सेना, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. प्रदीप व्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबाल सिंह चहल, एम.एम.आर.डी.ए आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे तसेच मूर्तिकार संघटनेचे प्रतिनिधी आणि दूरदृश्यप्रणालीद्वारे सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सावरपाडा येथे नव्याने साकव बांधावा

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील सावरपाडा येथे वाहून गेलेल्या पुलाच्या ठिकाणी तातडीने नव्याने पूल बांधण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिक जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. सावरपाडा गावातील वाहून गेलेल्या पुलाच्या ठिकाणाची तहसीलदारांसह इतर अधिकारी यांनी पाहणी केली. या पाहणीबाबतचा अहवाल मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी मागवून घेतला होता. त्यानुसार लगेचच पावले उचलत नवीन पुलाच्या उभारणीचे निर्देश त्यांनी दिले. सावरपाडा गावातील गावकऱ्यांच्या पूल, रस्ते आदी समस्यांची गंभीरपणे दखल घेतली जाईल. पुढील काही दिवसांमध्ये गावात सकारात्मक बदल दिसतील, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी गावकऱ्यांना दिला आहे.

पुरस्कारांचे वितरण

आंतरराष्ट्रीय कांदळवन परिसंस्था संवर्धन दिनानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कांदळवन कक्ष व कांदळवन प्रतिष्ठानतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या या कार्यक्रमात राज्यातील कांदळवन आणि सागरी परिसंस्थेच्या संवर्धनात सक्रीय सहभाग असणाऱ्यांचा 'कांदळवन प्रतिष्ठान पुरस्कार २०२२' देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास वन विभागाचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) वाय.एल. पी.राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सुनिल लिमये, महाराष्ट्र वन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक एन. वासुदेवन, पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंग, कांदळवन कक्षाच्या उपवनसंरक्षक अनिता पाटील आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात कांदळवनाविषयीच्या पोस्टकार्ड संचाचे आणि विशेष लिफाफ्याचे अनावरण, निसर्ग चक्रिवादळाच्या रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यातील परिणामाबाबतचा अहवाल, 'महाराष्ट्राची सागरी संपदा' आणि 'महाराष्ट्राची कांदळवन संपदा' या दोन पुस्तकांचे तसेच महाराष्ट्रातील किनारी भागातील पक्षी, कांदळवन संवर्धनाची दहा वर्षे या पुस्तिकांचेही प्रकाशन करण्यात आले.

प्रश्न सोडवताना सकारात्मकता ठेवा

लोकांचे प्रश्न सोडवताना सकारात्मकता ठेवा, राज्यभरातून मंत्रालयात कामासाठी येणाऱ्या लोकांना सचिवांनी भेटले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रपुरस्कृत तसेच राज्याच्या योजना गतीने मार्गी लावण्यासाठी

पाठपुरावा करावा असे निर्देश दिले. मुख्यमंत्री मंत्रालयात सर्व विभागांच्या सचिवांच्या पहिल्या बैठकीत मार्गदर्शन करताना बोलत होते.

राज्याची देशात एक चांगली प्रतिमा आहे. खुद्द प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्य शासनाच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही दिली आहे. तसेच इतर केंद्रीय मंत्री देखील राज्याला सहकार्य करण्यासाठी उत्सुक आहेत. अशा वेळी नावीन्यपूर्ण योजनादेखील आपण मांडल्या पाहिजेत. नवनवीन उपक्रमांचे स्वागत आहे. केंद्राचा जास्तीत जास्त निधी कसा मिळेल हे पाहून तत्काळ असे प्रस्ताव सादर करावेत. शासन आणि प्रशासन ही राज्य कारभाराच्या रथाची दोन चाके आहेत. दोघांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. लोकाभिमुख योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचून त्यांची प्रभावी अंमबजावणी करावी. राज्यातील नवीन सरकारकडून जनतेच्या मोठ्या अपेक्षा आहेत. शेतकरी, कामगार, शेतमजूर, यांच्या अपेक्षा पूर्ण करायच्या आहेत. सरकारची प्रतिमा ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. यासाठी सर्वांनी राज्याच्या हिताची कामे प्रभावीपणे करावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

लवकरच १०० दिवसांचा कार्यक्रम तयार करण्यात येणार आहे. पूर्वी सुरू असलेली लोकहिताची कामे सुरू ठेवणार आहोत. प्रशासनावरील ताण कमी करण्यासाठी रिक्त पदांची भरती होणे पण गरजेचे आहे, त्या दृष्टीने विभागांनी नियोजन तयार ठेवावे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

या बैठकीस मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांच्यासह सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आदी उपस्थित होते.

प्लास्टिक बंदी नियमामध्ये सुधारणा

प्लास्टिक लेपीत आणि प्लास्टिकचा थर असलेल्या उत्पादनांवर बंदीचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यातील प्लास्टिकच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर समस्या लक्षात घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्लास्टिक बंदी नियमामध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

केंद्र शासनाने १ जुलै २०२२ पासून सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घातली असून राज्यात या बंदीची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र हे सिंगल युज प्लास्टिक बंदी करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

राज्यात प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एक शक्तिप्रदत्त समिती नेमण्यात आली होती. या समितीने ७ जुलै २०२२ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकॉल उत्पादने अधिसूचना २०१८ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार राज्य शासनाने १५ जुलै २०२२ रोजीच्या अधिसूचनेद्वारे प्लास्टिकचा लेप आणि थर असलेल्या उत्पादनांवरदेखील बंदी घातली आहे. या सुधारणेनंतर राज्यात प्लास्टिक लेपीत तसेच प्लॅस्टिक थर असणाऱ्या पेपर किंवा ॲल्युमिनियम इत्यादींपासून बनवलेले डीस्पोजेबल डीश, कप, प्लेट्स, ग्लासेस, काटा, वाडगा, कंटेनर इत्यादी एकल वापरावर, वापर उत्पादनावर आता बंदी असणार आहे. दैनंदिन कचऱ्यातील प्लास्टिकचा कचरा कमी करणे हा या बंदीमागचा मुख्य उद्देश आहे.

पोलिसांच्या घरांना सर्वोच्च प्राधान्य

पोलिसांच्या घरांचा प्रश्न हा राज्य शासनाच्या सर्वोच्च प्राधान्याचा विषय असून पोलिसांच्या घरांसाठी गृह, नगरविकास, गृहनिर्माण, सिडको या सर्व विभागानी समन्वयाने सर्वंकष आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. पोलीस गृहनिर्माण संदर्भात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव (गृह) आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, बृहन्मुंबई मनपा आयुक्त इकबाल सिंह चहल, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण उपाध्यक्ष अनिल डिग्गीकर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी, प्रधान सचिव, (गृहनिर्माण)मिलिंद म्हैसकर, प्रधान सचिव (नगर विकास)सोनिया सेठी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुख्य कार्यकारी अधिकारी सतीश लोखंडे यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

थकबाकी भरण्यासाठी प्रस्ताव करावे

राज्यात विजेचे देयक न भरल्याने पथदिवे आणि पाणीपुरवठा योजनांचा वीज पुरवठा बंद आहे. हा वीजपुरवठा तत्काळ पूर्ववत करण्यात यावा, यासाठी जुनी थकबाकी टप्प्याटप्प्याने शासनामार्फत भरण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी, या उद्देशाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या घोषणेनुसार राज्यात २०१८ मध्ये प्रारंभ करण्यात आलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला. या वेळी आमदार चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज कुमार सौनिक, अपर मुख्य सचिव नियोजन नितिन गद्रे, नगर विकास-२ विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव तथा महापारेषणचे अध्यक्ष दिनेश वाघमारे, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय खंदारे, मेडाचे महासंचालक रविंद्र जगताप तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी या वेळी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या थकित कृषिपंपाचा मार्च २०२२ पर्यंतचा अनुशेष दूर करण्यात यावा

आणि कृषिपंपाचा अनुशेष दूर करताना सौर ऊर्जेला प्राधान्य देत, मार्च २०२२ पर्यंतचे संपूर्ण उद्दिष्ट पुढच्या सहा महिन्यात पूर्ण करावेत, यासाठी केंद्र सरकारची 'कुसुम' योजना आणि शासनाची योजना अशा दोन्ही योजनांचा वापर करत अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले.

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत विकेंद्रित सौर निर्मितीतून ४५०० मेगावॅट ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट या योजनेत आहे. अशा प्रकल्पांसाठी तातडीने जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि गतीने ही योजना कार्यान्वित करावी, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

याशिवाय उपसा सिंचन योजनासुद्धा सौर ऊर्जेवर आणण्यासाठी तातडीने पावले उचलावीत. तसेच किमान ३० टक्के फिडर या वर्षी सौर ऊर्जेवर जातील, या दृष्टीने तत्काळ नियोजन करण्यात यावे आणि त्या दृष्टीने पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. खासगीसोबतच महावितरणनेसुद्धा स्वनिर्मितीचे जिल्हानिहाय उद्दिष्ट निश्चित करावे, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले.

विविध क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत चर्चा

महाराष्ट्रात परदेशी गुंतवणुकीसाठी अमाप संधी आहेत. ऑस्ट्रेलिया-महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये पर्यटन, व्यापार, कृषी, ऊर्जा संक्रमण, शिक्षण, तंत्रज्ञान सेवा आणि कृषी-अन्नप्रक्रिया तसेच पर्यावरण इ. क्षेत्रांतील गुंतवणुकीसाठी शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे डेप्युटी प्रिमियर आणि राज्य विकास, व्यापार आणि पर्यटन मंत्री रोजर कुक यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने मंत्रालयात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या वेळी भारतीय वंशाचे ज्येष्ठ संसद सदस्य येझ मुबारकई, डेप्युटी प्रिमियरचे चीफ ऑफ स्टाफ नील फर्गस, कौन्सुल - जनरल मुंबई, पीटर ट्रूसवेल, पर्यटन, विज्ञान आणि नवोपक्रम विभागाच्या महासंचालक रेबेका ब्राउन, ऑस्ट्रेलियन डेप्युटी कॉन्सुल-जनरल मायकेल ब्राउन, यांसह अतिरिक्त मुख्य सचिव बलदेव सिंह, राजशिष्टाचार विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, मुख्य कार्यकारी अधिकारी (एमआयडीसी) डॉ. पी. अनबलगन, उपमुख्यमंत्री यांचे सचिव श्रीकर परदेशी, प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी राजेश गवांडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य हे भारताचे पॉवर हाऊस आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राचा मोठा हिस्सा आहे. येथे विविध क्षेत्रासाठी चांगले वातावरण असून पायाभूत सोयी-सुविधाही मोठ्या प्रमाणावर आहेत. महाराष्ट्र हे आगामी काही वर्षात कृषिसंपन्न राज्य व्हावे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान या विषयात काम करण्यास अधिक संधी आहे. सौर कृषी वाहिनी योजनेच्या माध्यमातून राज्यात विकेंद्रित सौर वीज निर्मितीचे उद्दिष्ट आहे. किमान ३० टक्के फिडर या वर्षी सौर ऊर्जेवर जातील, या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या क्षेत्रातदेखील सहकार्य करावे तसेच कोळशाचे वायुकरण या क्षेत्रात देखील काम करण्यासाठी संधी असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

सामंजस्य करार

राज्यातील आयटीआयसह विविध तांत्रिक प्रशिक्षण संस्थांचे सक्षमीकरण करणे, दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी, कोरोनामुळे पती गमावल्याने विधवा झालेल्या महिला अशा वंचित घटकांना कौशल्य प्रशिक्षण देणे, आरोग्य क्षेत्रात स्टार्टअप्सना चालना देणे, दुर्गम भागात आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी स्टार्टअप्स विकसित करणे अशा विविध क्षेत्रात काम करण्याच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नावीन्यता विभाग आणि टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्ह ट्रस्ट यांच्यामध्ये तसेच कौशल्य विभागांतर्गत कार्यरत महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटी आणि इंडिया हेल्थ फंड यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारांमुळे राज्यातील कौशल्य विकासविषयक विविध उपक्रम शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यास मदत होईल. तसेच स्किल इंडियाचे ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने हे सामंजस्य करार महत्त्वपूर्ण ठरतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त मंत्रालयात हे सामंजस्य करार करण्यात आले. या वेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाच्या प्रधान सचिव मनीषा वर्मा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेन्द्र सिंह कुशवाह, टाटा स्टाईव्हच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा टाटा कम्युनिटी इनिशिएटिव्ह ट्रस्टच्या उपाध्यक्षा अनिता राजन, इंडिया हेल्थ फंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधव जोशी यांच्यासह या संस्थांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. या वेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विभागाचे अधिकारी आणि संस्थांचे पदाधिकारी यांनी सामंजस्य करारांचे आदानप्रदान केले.

टीम लोकराज्य

राज्य मंत्रिमंडळाच्या १४, १६ आणि २७ जुलै २०२२ रोजीच्या बैठकीत वित्त, नगरविकास, पणन, ग्रामविकास, सामान्य प्रशासन विभाग, सहकार, ऊर्जा, गृह, जलसंपदा, सामाजिक न्याय, कृषि, वन, वैद्यकीय शिक्षण, विधि व न्याय आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...

मंत्रिमंडळात ठरले

पेट्रोल-डिझेलच्या करात कपात

राज्यातील पेट्रोलच्या करात पाच रुपये प्रतिलीटर आणि डिझेलच्या करात तीन रुपये इतकी कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार राज्य सरकारने जाणीवपूर्वक राज्यातील पेट्रोलच्या करात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. या कर कपातीमुळे राज्यातील जनतेला महागाईपासून दिलासा मिळेल. या कर कपातीच्या घोषणेमुळे राज्यातील जनतेला ६ हजार कोटी रुपयांच्या करातून दिलासा मिळेल.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी - २.०

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी - २.० राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्याने २०१४ ते २०२१ या कालावधीत स्वच्छ महाराष्ट्र अभियान यशस्वीपणे राबवले आहे. याबाबत राष्ट्रीय

स्तरावर राज्याचा उत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य म्हणून सातत्याने गौरव करण्यात आला आहे. या अभियानासाठी १२ हजार ४०९ कोटी ३१ लाख रुपये खर्च येणार आहे. या अभियानाची अंमलबजावणी नगरविकास विभागामार्फत करण्यात येईल. अभियानाकरिता राज्याचा हिस्सा म्हणून ६ हजार ५३१ कोटी ४६ लाख रुपयांचा निधी देण्यास मान्यता देण्यात आली. एक लाखापेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरात भूमीगत गटारांचे जाळे उभारणे व नवस्थापित नगरपरिषद/नगरपंचायतींच्या घनकचरा संकलन व वाहतुकीकरिता राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे कचरामुक्त शहरे व शाश्वत स्वच्छता निर्माण होऊन शहरातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा निश्चितपणे उंचावणार आहे.

राज्यात अमृत २.० अभियान

राज्यामध्ये केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियानाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यामध्ये सुमारे ५० टक्के लोकसंख्या नागरी भागामध्ये राहत असून राज्यात एकूण ४१३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. राज्यात २०१५ पासून अमृत १.० योजना राबवण्यात येत आहे परंतु ती केवळ राज्यातील ४४ शहरांपुरती मर्यादित होती. राज्याच्या नागरी भागामध्ये मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव दूर करण्यासाठी ही योजना राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये राबवण्यात येईल.

सर्व शहरातील घरांना नळजोडणी देऊन पाणीपुरवठ्याच्या बाबतीत १०० टक्के स्वयंपूर्ण करणे, जलस्रोत पुनरुज्जीवन व शहरातील मोकळ्या जागेमध्ये उद्याने व हरित क्षेत्र विकसित करणे आणि ४४ अमृत १.० शहरांमध्ये १०० टक्के मलप्रक्रिया व मलनि:स्सारण जोडणी देणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत.

अमृत २.० अभियानांतर्गत राज्यात एकूण २७ हजार ७०० कोटी रुपयांच्या निधीचे प्रकल्प हाती घेण्यात येतील, त्याकरिता ९ हजार २८५ कोटी रुपयांचे केंद्रीय अर्थसाहाय्य प्राप्त होईल आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यांच्या वर्गीकरणानुसार उपलब्ध होणारा आर्थिक हिस्सा व राज्य शासनाचे अर्थसाहाय्य मिळून सुमारे १८ हजार ४१५ कोटी निधी उपलब्ध करून दिला जाईल. या अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त होणाऱ्या निधीतून पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ५२.८१ टक्के, मलनि:स्सारण प्रकल्पांसाठी ४१.३५ टक्के व जलस्रोतांच्या पुनरुज्जीवनासाठी तसेच हरित क्षेत्र प्रकल्प विकसित करण्यासाठी ५.८४ टक्के निधी उपलब्ध केला जाणार आहे. या अभियानांतर्गत दशलक्ष किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांना १० टक्के किमतीचे प्रकल्प सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर (पीपीपी) घेण्यात येणार आहेत. त्याकरिता कमाल ६० टक्के मर्यादेपर्यंत व्यवहार्यता तफावत निधी (व्हीजीएफ) उपलब्ध करून दिला जाईल.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य उच्चाधिकार सुकाणू समिती गठित केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील शहरी भागात शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था निर्माण होऊन

शहरातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा निश्चितपणे उंचावणार आहे. तसेच राज्यातील शहरे अधिक स्वच्छ व सुंदर होतील.

शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार

राज्यातील बाजार समित्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणूकांमध्ये थेट मतदान करता येईल असा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

ज्यांच्याकडे १० आर इतकी जमीन असेल अशा १८ वर्षांहून अधिक वय असलेल्या आणि पाच वर्षांमध्ये किमान तीन वेळा संबंधित बाजार समितीत आपल्या कृषी मालाची विक्री केली असेल, अशा शेतकऱ्याला थेट मतदान करता येईल.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील सर्व खातेदार शेतकऱ्यांना थेट मतदानाचा अधिकार दिल्यामुळे सात-बारा धारक खातेधारक शेतकरी हाच निकष ठेऊन प्रचलित अधिनियमात सुधारणा करून

खालीलप्रमाणे फायदे होणार आहेत. बाजार समितीचे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्था व ग्रामपंचायत मतदार संघ हे मर्यादित स्वरूपाचे मतदारसंघ संपुष्टात येतील. सध्या ग्रामपंचायत मतदार संघामधून बऱ्याच ठिकाणी शेती नसणारे ग्रामपंचायत सदस्य मतदान करतात. जे शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करत नाहीत म्हणून शेतकरी खातेदारामधून निवडणूक झाल्यास शेतकरी प्रतिनिधीची निवड प्रत्यक्ष शेतकऱ्यांमधून होईल.

नगराध्यक्ष थेट जनतेमधून

नगरपरिषदा व नगरपंचायतींचे अध्यक्ष हे थेट जनतेमधून निवडणे, अध्यक्ष व उपाध्यक्षांचा कालावधी पाच वर्ष करणे तसेच थेट निवडून आलेल्या अध्यक्षांविरुद्ध पहिल्या अडीच वर्षात अविश्वास ठराव आणता येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला. या संदर्भात अधिनियमात सुधारणा करून अध्यादेश काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये २०२० मध्ये झालेल्या सुधारणांनुसार, राज्यातील नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये अध्यक्ष नगरसेवकांमधून निवडून देण्यात येत होते. तसेच अध्यक्ष व उपाध्यक्षांचा कालावधी हा अडीच वर्षांचा होता व अध्यक्षांविरुद्ध पहिल्या एक वर्षात अविश्वास ठराव आणता येणार नाही अशी तरतूद होती.

नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणूका प्रस्तावित असून, या नगरपरिषदा व नगरपंचायतींचे कामकाज सुरळीतपणे सुरू राहण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमात संबंधित कलमात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सरपंचाची निवड थेट जनतेमधून

राज्यातील ग्रामपंचायतीमधील निवडणुकांमध्ये सरपंचाची निवड थेट जनतेमधून करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम - १९५८ च्या कलमांमध्ये सुधारणा करण्याच निर्णय घेण्यात आला. सध्या ग्रामपंचायत सदस्यांमधून सरपंचाची निवड करण्याची पद्धत आहे. मात्र लोकांमधून सरपंच निवडल्यास ग्रामपंचायतींचे काम अधिक परिणामकारक होईल, यासाठी हा निर्णय घेण्यात आला. याशिवाय विशेष ग्रामसभेसमोर शिरगणतीद्वारे साध्या बहुमताने सरपंचावरील अविश्वास प्रस्ताव घेता येईल. मात्र सरपंच किंवा उपसरपंचांच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दोन वर्षांच्या कालावधीत आणि पंचायतीची मुदत समाप्त होण्याआधी सहा महिन्यांच्या आत असा कोणताही अविश्वास प्रस्ताव आणता येणार नाही.

पूर्वीप्रमाणेच मानधन

देशात आणीबाणीच्या काळात बंदिवास सोसावा लागलेल्या व्यक्तिंना पूर्वीप्रमाणेच मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला. या संदर्भातील विनंती लोकप्रतिनिधी यांनी शासनास केली होती. या योजनेंतर्गत १ ऑगस्ट २०२२ पासून मानधन अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा १० हजार रुपये व त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस / पतीस ५ हजार रुपये मानधन, तर एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा ५ हजार रुपये, तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीस / पतीस २ हजार ५०० रुपये इतके पूर्वीप्रमाणेच मानधन देण्यात येईल.

लॉकडाऊनमुळे राज्याच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या विपरीत परिणामाच्या पार्श्वभूमीवर खर्चात काटकसर करण्यासाठी ही योजना ३१ जुलै २०२० रोजी बंद करण्यात आली होती.

योजना बंद झाल्याच्या कालावधीपासून योजना मंजूर झालेल्या व्यक्तींना थकबाकी देण्याससुद्धा मान्यता देण्यात आली. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयांकडे नव्याने अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२२ आहे. यासाठी आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी ३ जुलै २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या परिशिष्टातील शपथपत्रासह अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक राहील.

कालावधीत वाढ

जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाचा कार्यकाळ हा तीन महिन्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच पंचायत समिती सभापती व उपसभापती पदाचा कार्यकाळ हा अधिकृत राजपत्रातील

आदेशाद्वारे राज्य सरकार तीन महिन्यांपर्यंत वाढवू शकते. हा कालावधी वाढवताना एकूण कालावधी हा कलम १० मधील कालावधीशी सुसंगत असेल. या सुधारणेबाबतचा अध्यादेश काढण्यात येईल.

औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर, तर उस्मानाबादचे धाराशिव नामकरण

औरंगाबाद शहराचे नाव छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबाद शहराचे नाव धाराशिव करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. नामकरणाबाबतच्या प्रस्ताव मंजुरीचे २९ जून २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त मान्यतेसाठी नव्याने स्थापन झालेल्या मंत्रिमंडळासमोर आणण्यात आले होते. त्यावर हे दोन्ही प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी फेरसादर करावेत असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार हे प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत फेरसादर करण्यात आले. त्यावर या दोन्ही प्रस्तावांना मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

हे प्रस्ताव केंद्र शासनास पाठवण्यात येऊन त्यानंतर त्याप्रमाणे विभाग, जिल्हा, तालुका तसेच महानगरपालिका व नगरपालिका यांचे नामांतर करण्यात येईल. याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे महसूल व वन विभाग तसेच नगरविकास विभागाकडून अधिनियमांप्रमाणे करण्यात येईल.

नवी मुंबई विमानतळाचे लोकनेते दि.बा. पाटील नवी मुंबई विमानतळ नामकरण

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे 'लोकनेते दि.बा.पाटील नवी मुंबई विमानतळ' असे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. नामकरणाबाबतचा प्रस्तावाच्या मंजुरीचे २९ जून २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीचे कार्यवृत्त मान्यतेसाठी नव्याने स्थापन झालेल्या मंत्रिमंडळासमोर आणण्यात आले होते. त्यावर हा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी फेरसादर करावेत, असे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार हा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत फेरसादर करण्यात आला व त्याला मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

नवी मुंबईमधील प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार १२.५६ योजनेच्या

अंमलबजावणीसाठी स्व. दि.बा. पाटील यांचे योगदान आहे. तद्नंतर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी संपादित जमिनीसाठी मोबदला ठरवावयाच्या आनुषंगाने निश्चित करण्यात आलेले २२.५% योजनेचे धोरणसुद्धा १२.५% धोरणाच्या धर्तीवर तयार करण्यात आले आहे.

नवी मुंबई येथे सिडको महामंडळाच्या माध्यमातून ११६० हे. क्षेत्रावर सार्वजनिक खासगी भागीदारीतून ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यात येत आहे. या संपूर्ण ११६० हे. जमिनीचे संपादन पूर्ण झाले असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची भूविकास कामे प्रगतिपथावर आहेत. या विमानतळाच्या नामकरणाच्या आनुषंगाने नवी मुंबईमधील विविध संघटना व राजकीय पक्षांकडून मागणी करण्यात येत होती.

नवी मुंबई परिसरातील विकासामधील स्व. दि. बा. पाटील यांचे योगदान व स्थानिकांच्या विविध संघटनांची मागणी विचारात घेता, नवी मुंबईत होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ असे करण्यास मान्यता देण्यात आली.

बँक कर्जाला शासनाची हमी

एमएमआरडीएला मुंबई महानगर क्षेत्रात विविध प्रकल्प राबवण्यासाठी ६० हजार कोटींपर्यंतचे कर्ज उभारण्यास तसेच शासन

हमीस मान्यता देण्यात आली. या कर्जापैकी पहिल्या टप्प्यात उभारण्यात येणाऱ्या १२ हजार कोटी रकमेची शासन हमी देण्यास आणि शासन हमीवरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर क्षेत्रात १ लाख ७४ हजार ९४० कोटी किमतीचे महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. यामध्ये विविध मेट्रो रेल प्रकल्प, बोरीवली-ठाणे भुयारी मार्ग, ठाणे कोस्टल रोड व शिवडी वरळी कनेक्टर, इत्यादी महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश आहे. प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेल्या या प्रकल्पांना निधी उपलब्ध होऊन प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने हे निर्णय घेण्यात आले.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमातील कलम २१ नुसार शासनाची पूर्वमान्यता घेण्याची तरतूद विचारात घेता महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्राधिकरणास आवश्यकतेनुसार ६० हजार कोटीपर्यंतचे कर्ज उभारण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली.

शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ योजना

राज्यातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. सुमारे १४ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळेल आणि ६ हजार कोटी रुपये निधी लागेल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुमारे १३.८५ लाख शेतकऱ्यांच्या १४.५७ लाख कर्जखात्यांसाठी अंदाजे ५७२२ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.

या योजनेचा लाभ २०१९ मध्ये राज्यातील अतिवृष्टी आणि महापुरामुळे नुकसान झालेल्या आणि नैसर्गिक आपत्तीच्या कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांनासुद्धा घेता येईल. एखादा शेतकरी मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांनी कर्ज परतफेड केली असल्यास त्या वारसालासुद्धा हा लाभ मिळेल.

नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी २०१७ - १८, २०१८ - १९ आणि २०१९ - २० हा कालावधी विचारात घेऊन या तीन

आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन नियमित पूर्ण परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली.

२०१७ - १८ या वर्षात घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज ३० जून, २०१८ पर्यंत पूर्णतः परतफेड केले असल्यास, २०१८-१९ या वित्तीय वर्षात घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज ३० जून २०१९ पर्यंत पूर्णतः परतफेड केले असल्यास, २०१९-२० या वित्तीय वर्षात घेतलेले अल्पमुदत पीक कर्ज ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत पूर्णतः परतफेड केले असल्यास अथवा २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तिन्ही वित्तीय वर्षात बँकेच्या मंजूर धोरणाच्या अनुषंगाने पीक कालावधीनूसार कर्ज परतफेडीचा देय दिनांक यापैकी जी नंतरची असेल त्या दिनांकापूर्वी कर्जाची पुर्णतः परतफेड (मुद्दल + व्याज) केली असल्यास अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०१८-१९ अथवा २०१९-२० या वर्षात घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाच्या मुद्दल रकमेवर जास्तीत जास्त ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर रक्कम लाभ म्हणून देण्यास मान्यता देण्यात आली.

मात्र, २०१८ - १९ अथवा २०१९ - २० या वर्षात घेतलेल्या व त्याची पूर्णतः परतफेड केलेल्या अल्पमुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजार रुपयांपेक्षा कमी असल्यास, अशा शेतकऱ्यांना त्यांनी २०१८ - १९ अथवा २०१९ - २० या वर्षात प्रत्यक्ष घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेइतका प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

प्रोत्साहनपर लाभ देतांना वैयक्तिक शेतकरी विचारात घेऊन त्यांनी एक/अनेक बँकांकडून घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जाच्या परतफेडीची एकत्रित रक्कम विचारात घेऊन ५० हजार रुपये या कमाल मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ रक्कम निश्चित करण्यात येईल. प्रोत्साहनपर लाभ योजनेची अंमलबजावणी ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार आहे.

वीज वितरण प्रणाली मजबूत

राज्यातील विद्युत वितरण प्रणालीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा करून वितरण कंपन्या आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा निर्णय घेण्यात आला. या योजनेसाठी महावितरण कंपनीच्या ३९ हजार ६०२ कोटी रुपये व बेस्टच्या ३ हजार ४६१ कोटी रुपये रकमेच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली.

या योजनेनुसार २०२४-२५ पर्यंत एकूण तांत्रिक आणि वाणिज्यिक हानी १२ ते १५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट आहे. याशिवाय वितरण प्रणाली बळकट करण्यासाठी नवीन उपकेंद्र, नवीन रोहित्र, नवीन वाहिन्या यांची कामे करण्यात येतील.

राज्यातील ग्राहकांसाठी प्रिपेड / स्मार्ट मीटर बसवण्यात येतील. याचा सुमारे १ कोटी ६६ लाख ग्राहकांना फायदा होईल. वितरण रोहित्रांनादेखील मीटर बसवण्यात येईल. केवळ मीटर्स बसवण्यासाठी १०

हजार कोटी रुपयांचा निधी अपेक्षित आहे. या वीज कंपन्यांची कार्यक्षमता सुधारुन ग्राहकांना अखंड, दर्जेदार आणि परवडणारा वीज पुरवठा देण्यासाठी सुधारित वितरण क्षेत्र योजना-सुधारणा-अधिष्ठित आणि निष्पती-आधारित योजना राबवण्यात येईल. महावितरण आणि बेस्ट उपक्रमामार्फत ही योजना राबवणार आहे.

राजकीय, सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्यास मान्यता

राज्यात राजकीय व सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये मार्च २०२२ पर्यंत दोषारोपपत्र दाखल झाले आहेत, असे खटले मागे घेण्याची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे कोरोना काळात विद्यार्थी व सुशिक्षित बेरोजगारांवर खटले दाखल झाल्यामुळे त्यांना नोकरीच्या ठिकाणी किंवा पासपोर्ट व चारित्र्य पडताळणीच्या वेळेस अडचणी येतात, ते दूर करण्यासाठी समितीकडून कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली.

पोलीस आयुक्त व अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्णय घेईल. आंदोलनामुळे उद्‌भवलेल्या गुन्ह्यांत जीवितहानी झालेली नसावी, अशा घटनेत खासगी व सार्वजनिक मालमत्तेचे ५ लाख रुपयांपेक्षा जास्त नुकसान झालेले नसावे. या अटी कायम ठेवण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे गणेशोत्सव, दहीहंडी यामधील किरकोळ स्वरूपाचे गुन्हेदेखील मागे घेण्यासंदर्भात समितीने तातडीने निर्णय घ्यावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना

औरंगाबाद जिल्ह्यातील ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना प्रकल्पास ८९०.६४ कोटी रुपयांच्या चौथ्या सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी देण्यात आली. ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजना ही ऊर्ध्व गोदावरी उपखोऱ्यात असून जायकवाडी प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात प्रस्तावित आहे. या प्रकल्पाद्वारे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील सुमारे ६५ गावांमधील २० हजार २६५ हेक्टर शेती क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळणार आहे.

ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजना या प्रकल्पास तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता २००९ मध्ये देण्यात आली होती. सदर निर्णयानुसार या प्रकल्पास जलसंपदा विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या २०१८-१९ च्या दरसूचीवर आधारित चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

भातसा प्रकल्पांच्या कामांना मान्यता

भातसा तसेच वाघूर प्रकल्पांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. शहापूर तालुक्यातील भातसा प्रकल्पाच्या १४९१ कोटी ९५ लाख रुपयांच्या कामांसाठी सुधारित मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे जळगाव जिल्ह्यातील वाघूर प्रकल्पाच्या २२८८ कोटी ३१ लाख रुपये किमतीच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता

राज्यात तीन नवीन समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता देण्यात आली. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयानुसार धुळे जिल्ह्यातील साक्री येथील संत तुकाराम सामाजिक संस्था, उस्मानाबाद जिल्ह्यातील अश्वमेध बहुउद्देशीय शैक्षणिक व सामाजिक संस्था, जालना येथील दिशा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था या तीन संस्थांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली.

संशोधन व प्रशिक्षण केंद्र

राज्यासाठी हळद संशोधन व प्रक्रिया धोरण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच हिंगोली जिल्ह्यात बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात हळद संशोधन व प्रक्रिया धोरण निश्चित करण्यासाठी गठित समितीने केलेल्या शिफारशींना तत्त्वतः मान्यता देण्यात आली.

हिंगोली जिल्ह्यामध्ये बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र कंपनी कायद्यानुसार ना-नफा तत्त्वावर एक स्वायत्त संस्था म्हणून स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

उपसा जलसिंचन योजनेमधील शेतकऱ्यांना वीज दरात सवलत

राज्यातील कृषिपंप ग्राहकांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला. अति उच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनेतील शेतकऱ्यांना जून २०२१ पासून १ रुपया १६ पैसे प्रतियुनिट व स्थिर आकारामध्ये २५

रुपये प्रतिकेव्हीए इतकी सवलत कायम ठेवण्यात येईल. या अनुषंगाने ३५१ कोटी ५७ लाख रुपये महावितरण कंपनीस अनुदान म्हणून देण्यात येईल.

लघुदाब उपसा जलसिंचन ग्राहकांना १ रुपया प्रतियुनिट हा सवलतीचा दर आणि स्थिर आकारामध्ये १५ रुपये प्रतिमहिना सवलत जून २०२१ पासून नव्याने देण्यात येईल. यापोटी महावितरण कंपनीस ७ कोटी ४० लाख रुपये शासनामार्फत देण्यात येईल.

लोणार सरोवराच्या विकास आराखड्यास मंजुरी

लोणार सरोवराचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करण्यासाठी ३६९ कोटी ७८ लाख रुपयांच्या विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली. या संदर्भात उच्च न्यायालयाने आदेश दिले होते. या कामांची विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली अंमलबजावणी केली जाईल. यामध्ये लोणार सरोवर परिसरात मंदिराचे जतन, निसर्ग पर्यटन, वन्यजीव संरक्षण, सरोवराभोवती पदपथ, रस्त्यांचे भूसंपादन, अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन अशी विविध कामे केली जातील. नियोजन विभागाने मंजूर आराखड्यातील कामनिहाय आवश्यक निधी लोणार सरोवर विकास समितीकरिता पीएलए खाते तयार करून त्यामध्ये वर्ग करण्यात येईल. तथापि, ज्या विभागांना राज्याच्या अर्थसंकल्पाव्यतिरिक्त इतर स्रोतातून निधी प्राप्त होतो, ज्याची तरतूद नियोजन विभागामार्फत करणे शक्य नाही, तसेच तांत्रिक कारणामुळे निधी लोणार सरोवर विकास समितीकडे वर्ग करण्याची बाब शक्य नसल्यास, अशा प्रकरणी संबंधित विभागाने आराखड्यातील कामे प्रचलित पद्धतीनुसार समितीच्या देखरेखीखाली करण्यात येतील.

भूमिहीन लाभार्थींना जागा

ग्रामीण गृहनिर्माण योजनांतील पात्र परंतु भूमिहीन लाभार्थींना जागा देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या योजनेतील लाभार्थ्यांना जागा खरेदी करताना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) च्या धर्तीवर १ हजार रुपये इतकी मुद्रांक शुल्क रक्कम निश्चित करण्यात येईल. लाभार्थींनी खरेदी केलेल्या जागेकरिताच मोजणी शुल्कामध्ये ५० टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येईल. ५०० चौ.फूट कृषी जमीन खरेदी करताना तुकडे बंदी कायद्यातील अट लागू होणार नाही, अशी अधिनियमात सुधारणा करण्यात येईल. लाभार्थींना २ मजल्यांऐवजी ४ मजली इमारत बांधण्यास मान्यता देण्यात येईल. गायरान जागा लाभार्थींना भाडेपट्ट्याने देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल.

ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या लाभार्थींनी शासकीय जमिनीवर केलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्याचे प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणांकडे सादर करून ९० दिवसांच्या आत मान्यता देण्याचे निर्देश देण्यात आले.

वैद्यकीय महाविद्यालयांसाठी अतिरिक्त जागा

केंद्र शासनातर्फे महाराष्ट्रातील १५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रत्येकी ५० याप्रमाणे एकूण ७५० जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. ही प्रवेश क्षमता वाढल्यामुळे प्रती महाविद्यालय २४ कोटी अशा एकूण ३६० कोटी रुपये राज्याचा हिस्सा देण्यास मान्यता देण्यात आली.

सहसचिव हे पद नव्याने निर्माण

विधि व न्याय विभागात सहसचिव (विधी) हे गट - अ संवर्गातील पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. या विभागातील कामकाजाचा वाढता ताण विचारात घेऊन हा निर्णय घेण्यात आला.

टीम लोकराज्य

देशभरात स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. भारताचा स्वातंत्र्यसंग्राम ७५, नावीन्यपूर्ण कल्पना ७५, नवे संकल्प ७५, स्वातंत्र्योत्तर फलनिष्पत्ती ७५ आणि अंमलबजावणी ७५ अशा पाच आशय संकल्पना राबवल्या जात आहेत. त्याचबरोबर 'घरोघरी तिरंगा' या अभियानांतर्गत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान देशात २० कोटींहून अधिक घरांवर तिरंगा फडकताना दिसणार आहे. स्वातंत्र्याच्या या अमृतमहोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी करण्यात राज्य आघाडीवर आहे. घरोघरी तिरंगा, स्वराज्य महोत्सव कार्यक्रमांतून नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेम व स्वातंत्र्यवीरांविषयी जाणीवजागृती केली जात आहे.

घरोघरी तिरंगा

वर्षा फडके-आंधळे

भारताच्या स्वातंत्र्याला १५ ऑगस्ट, २०२३ रोजी ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने, केंद्र शासनामार्फत स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव हा महत्त्वाकांक्षी उपक्रम देशभरात साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत सुरू राहणाऱ्या या उपक्रमांतर्गत अनेक विशेष कार्यक्रम, उपक्रम आयकॉनिक प्रकल्प आणि योजना यांचे नियोजन करण्यात आले आहे. आज भारत वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक प्रगती करत आहे. गेल्या ७५ वर्षांत भारताने केलेला प्रवास जगाने पाहिला आहे. पुढील २५ वर्षांमध्ये आपला देश वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आघाडीवर असणार आहे. 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' साजरा करताना राबवण्यात येणाऱ्या 'घरोघरी तिरंगा' हे अभियान देशातील प्रत्येक घराघरात देशभक्तीची चेतना निर्माण करणारे अभियान ठरणार आहे. २० x १३ से.मी., १६ x २४ से.मी. किंवा ६ x ९ से.मी. या आकारातील तिरंगा या अभियानातून घराघरात फडकणार आहे.

अमृतमहोत्सवी संकल्पना

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यासाठी केंद्र शासनामार्फत ५ आशय संकल्पना निश्चित करण्यात आल्या आहेत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

भारताचा स्वातंत्र्य संग्राम ७५, नावीन्यपूर्ण कल्पना ७५, नवे संकल्प ७५, स्वातंत्र्योत्तर फलनिष्पत्ती ७५ आणि अंमलबजावणी ७५ अशा पाच आशय संकल्पना आहेत. याशिवाय रस्ते संग्रहालय, अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली, घरोघरी तिरंगा, स्वराज्य महोत्सव, विद्यार्थी विरासत उपक्रम इत्यादी संकल्पना संपूर्ण देशभर या वर्षभरात राबवल्या जाणार आहेत.

महाराष्ट्रात घरोघरी तिरंगा आणि स्वराज्य महोत्सवासाठी सांस्कृतिक कार्य विभाग आणि ग्रामविकास विभाग काम करीत आहे. राज्यातील नागरिकांना घरोघरी तिरंगा उपक्रमात सामील करून घेण्यासाठी शासकीय निधीतून ध्वज खरेदी करण्यात येणार आहेत. परंतु या उपक्रमात प्रत्येक नागरिकांनी स्वत: राष्ट्रध्वज खरेदी करावा यासाठी त्यांना प्रेरित करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयात राष्ट्रध्वज फडकवला जाणार आहे. महाराष्ट्रात शहरी आणि ग्रामीण भागात मिळून जवळपास २ कोटी ४५ लाख कुटुंबे आहेत, त्यापैकी कमीत कमी २ कोटी घरांवर तिरंगा फडकवण्याचे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे.

राष्ट्रीयता आणि एकात्मतेसाठी...

देशभरात १३ ते १५ ऑगस्ट, २०२२ दरम्यान 'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' या उपक्रमात राबवण्यात येणाऱ्या घरोघरी तिरंगा या अभियानाद्वारे देशभरात प्रत्येकामध्ये राष्ट्रीयता आणि एकात्मता वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांची आठवण ठेवून आपल्या स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान यानिमित्ताने जपला जाणार आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलेल्या प्रत्येकाची आठवण ठेवणे हे आपल्या प्रत्येकाचे काम असून आजच्या पिढीला त्यांचे माहात्म्य, त्यांचे कार्य आणि विचार समजणे यासाठी

राबवण्यात येणाऱ्या घरोघरी तिरंगा हे अभियान महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या प्रमाणावर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग घेण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये असलेले राष्ट्रप्रेम जागृत करण्याचे काम या अभियानांतर्गत करण्यात येणार आहे.

२० कोटी घरांवर तिरंगा

घरोघरी तिरंगा या अभियानांतर्गत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ दरम्यान देशातील सुमारे २० कोटी घरांवर तिरंगा फडकवण्यात येणार असून संपूर्ण देश भारतमातेच्या सेवेत समर्पित असल्याचा एक संदेश आपण जगाला देणार आहोत. या अभियानाचा प्रचार आणि प्रसार करणे, अभियानासाठी प्रत्येक घरी तिरंगा पोहोचेल आणि १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान घरावर हा तिरंगा फडकेल अशा तीन टप्प्यांमध्ये या अभियानाची पूर्तता होणार आहे. हे अभियान यशस्वी करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक घरासाठी झेंडा उपलब्ध होईल यासाठी तयारी करण्यात आली आहे.

११ ते १४ ऑगस्ट २०२२ दरम्यान स्वातंत्र्याची लढाई कशी होती याची माहिती प्रभातफेरीच्या माध्यमातून लोकांसमोर नेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. गावांमध्ये, तालुक्यांमध्ये १ तास प्रभातफेरी काढण्यात येणार आहे. केंद्र शासनामार्फत सुद्धा वेगवेगळ्या माध्यमांतून राज्यांसाठी राष्ट्रध्वज उपलब्ध करण्यात येणार असून पोस्ट कार्यालयातसुद्धा तिरंगा मिळणार आहे. केंद्र सरकारने सुरू केलेल्या http://harghartiranga.com या संकेतस्थळावर आपले फोटो आणि सेल्फी पाठवण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संकल्प से सिद्धी

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे. आपल्या शहिदांनी दिलेल्या बलिदानाची आठवण ठेवत त्यांनी केलेले काम आजच्या पिढीला, तरुण वर्गाला समजावे, माहिती व्हावे आणि आपल्यामध्ये देशभक्तीची प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठीच 'घरोघरी तिरंगा' हा उपक्रम देशभरात मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात येणार आहे. देशाने गेल्या ७५ वर्षात केलेली प्रगती याबरोबरच पुढील २५ वर्षांत भारत जगात वेगळा कसा ठरेल याचा संकल्प करण्याचासुद्धा प्रयत्न यामध्ये होणार आहे. 'संकल्प से सिद्धी' या कार्यक्रमाद्वारे भारताची पुढची २५ वर्षांतील वेगवेगळ्या क्षेत्रातील प्रगती यावर लक्ष देण्यात येणार आहेत. कृषी, उत्पादन, सेवा, सहकार, शिक्षण, पायाभूत सुविधा यामध्ये येणाऱ्या काळात देशाची प्रगती जगभरासाठी प्रेरणादायी ठरेल, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.

मुख्य सचिवांनी घेतला आढावा

स्वराज्य महोत्सव आणि घरोघरी तिरंगा उपक्रम अतिशय काटेकोरपणे राबवण्यात यावेत. या उपक्रमात लोकसहभाग घ्यावा, अशा सूचना मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

घरोघरी तिरंगा आणि स्वराज्य महोत्सव उपक्रमाचा आढावा मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव यांनी घेतला. या आढावा बैठकीस गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव सौरभ विजय, सार्वजनिक बांधकाम विभाग सचिव सदाशिव साळुंखे आदी उपस्थित होते. घरोघरी तिरंगा आणि स्वराज्य महोत्सवातील विविध कार्यक्रमांचे नियोजन चांगले करावे, घरोघरी तिरंगा अभियानात ध्वज उपलब्ध करण्यासाठी नियोजन करावे, सामान्य नागरिकांना ध्वज खरेदी करण्यासाठी ठरावीक ठिकाणे निश्चित करण्यात यावीत. या ठिकाणांबाबत नागरिकांना माहिती द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

विविध माध्यमांतून प्रसिद्धी

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करणे हा आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आणि गौरवाचा क्षण आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देताना अनेकांनी आपल्या प्राणांची आहुती देली आहे. भारताने स्वातंत्र्य मिळवताना अनेक संकटांचा सामना केला, गेल्या ७५ वर्षांत मात्र आज जगभरात भारताने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. येणाऱ्या काळात ही ओळख टिकवून ठेवत अनेक क्षेत्रातील भारताचे सर्वोच्च स्थान टिकवून ठेवणे यालाच प्राधान्य असणार आहे. २२ जुलैपासून या अभियानाची सुरुवात होत असून प्रत्येक राज्यानेसुद्धा त्यांच्या त्यांच्या संकेतस्थळावर, फेसबुक, ट्विटर आणि इन्स्टाग्राम अशा सोशल मीडियावर याबाबत प्रचार आणि प्रसिद्धी करावी अशा सूचना केंद्र सरकारने केल्या आहेत. घरोघरी तिरंगा याबाबतची माहिती देत असताना वर्तमानपत्रे, इलेक्ट्रॉनिक मीडिया या माध्यमांचासुद्धा यासाठी वापर करण्यात येत आहे.

कार्यक्रमांमध्ये राज्य आघाडीवर

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवांतर्गत ग्रामस्तरावर वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेल्या यादीमध्ये महाराष्ट्राचा ग्रामविकास विभाग आघाडीवर आहे. आतापर्यंत जवळपास १ हजारांहून अधिक कार्यक्रम अपलोड करण्यात आले असून जानेवारी २०२२ पासून सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फतही १८ जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या स्वरूपातील ३५ हून अधिक कार्यक्रमांचे आयोजन आतापर्यंत करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी संचालनालयाने

महाअमृत www.mahaamrut.org या नावाने संकेतस्थळ सुरू केले आहे. घरोघरी तिरंगा उपक्रमासाठी ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आणि नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना समन्वयक अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात आले आहे. या उपक्रमाची प्रचार प्रसिध्दी आणि जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमांचा वापर करण्यात येत आहे. जिंगल, सेलिब्रेटीद्वारे आवाहन, विशेष गाणे, डिजिटल प्रचार प्रसिद्धी, सोशल मीडियावरील हॅशटॅग, जाहिराती इत्यादीचा वापर केला जाणार आहे. याशिवाय स्थानिक रेडिओवाहिन्यांवरून आणि एमएफ चॅनेलवरून तसेच दूरदर्शन आणि खासगी वाहिन्यांवरून प्रसिद्धी, शासकीय संकेतस्थळे, लोकसहभाग याद्वारे प्रसिद्धीवर भर देण्यात आला आहे. या उपक्रमात अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढावा यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व लोकप्रतिनिधींना या अभियानात सहभागी होण्याचे आणि लोकसहभाग वाढवण्याबाबतचे पत्र लिहिले आहे. याशिवाय महाराष्ट्रातील दोन कोटी घरांवर तिरंगा फडकवण्याबरोबरच सरकारी, निमसरकारी, शाळा, महाविद्यालये यांच्या इमारतीवरही तिरंगा फडकवला जाणार आहे.

स्वराज्य महोत्सव

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यासाठी राज्यात ९ ते १७ ऑगस्ट २०२२ दरम्यान स्वराज्य महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. स्वराज्य महोत्सव राज्य, जिल्हा, तालुका आणि ग्राम/वॉर्ड पातळीवर साजरा करण्यात येणार आहे. या अंतर्गत वेगवेगळे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

जिल्हास्तरावर प्रामुख्याने हुतात्मा स्मारक सुशोभीकरण करणे, स्थानिक स्वराज्य संस्था विशेष सभा, जिल्ह्याच्या ठिकाणी तिरंगा बलून सोडणे, ७५ फूट उंचीचा ध्वज करणे, एनएसएस, एनसीसी, सायक्लो, वॉकेथॉन आयोजित करणे, विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित करणे, वारसा स्थळ पदयात्रा करणे, पुरातत्त्व स्थळांची स्वच्छता करणे, किल्ल्यांची स्वच्छता, प्रदर्शने आयोजित करण्यात येणार आहेत. त्याशिवाय विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम आयोजित करणे तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याबरोबर आजादी का अनसंग हिरो बुकलेट तयार करणे, कार्यालयांची स्वच्छता करणे, अमृत महोत्सवाचा लोगो शासकीय इमारतीवर लावणे आणि पुरातत्त्व वारसास्थळ दत्तक योजना राबवणे यांसारखे कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत.

ग्रामस्तर आणि वॉर्डस्तरावर विशेष सभांचे आयोजन करणे, शाळा / महाविद्यालये / अंगणवाड्या, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था, महिला बचतगट, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक इत्यादी यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. ग्रामस्तरावर आणि वॉर्ड स्तरावर

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

९ ते १७ ऑगस्ट २०२२ दरम्यान कोणत्या दिवशी कोणते कार्यक्रम आयोजित करावयाचे याच्या तपशीलवार सूचना देण्यात आल्या आहेत. तालुकास्तरावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विशेष सभा घेणे, वृक्षारोपण आणि वृक्षलागवड करणे, वारसास्थळ आणि पुरातत्त्व दत्तक योजना राबवणे यांसह विविध कार्यक्रम राबवण्याचे नियोजन आहे. ग्रामपातळीवर विशेष ग्रामसभा घेणे, वॉर्डसभा घेणे, हर घर झेंडा यावर सडा-रांगोळी घालणे, घराला तोरण बांधणे, प्रभातफेरीचे आयोजन करणे, गावाचा इतिहास आणि राष्ट्राचा इतिहास समाजावून सांगणे, मोबाईल दुष्परिणाम यावर मार्गदर्शन करणे, अर्थसाक्षरताविषयक शिबिर आयोजित करणे यांसह सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करताना प्रबोधनपर आणि देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

स्वराज्य सप्ताह सांगता समारोहनिमित्त स्वराज्यफेरी, देशभक्तिपर चित्रपट दाखवणे असे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. याशिवाय स्वराज्य सप्ताह अंतर्गत १० ऑगस्ट रोजी राज्यात शालेय स्तरावर एकाचवेळी समूह राष्ट्रगीत गायन उपक्रम आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. स्वराज्य महोत्सव अंतर्गत ग्राम, तालुका व जिल्हापातळीवर संपन्न झालेले कार्यक्रम केंद्र शासनाच्या https://amritmahotsav.nic.in/ व राज्य शासनाच्या https://mahaamrut.org या संकेतस्थळांवर अपलोड करण्यात येणार आहेत. घरोघरी तिरंगा आणि स्वराज्य महोत्सव हे उपक्रम मोठ्या प्रमाणात साजरे करण्यासाठी प्रचार, प्रसिद्धी आणि जाणीव जागृतीचे कार्यक्रम देशभरासह महाराष्ट्रातही हाती घेण्यात आले आहे.

विभागीय संपर्क अधिकारी

पंढरीची वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐश्वर्य आहे, वैभव आहे...वारी हा शब्दच मुळी मनावर गारूड करणारा. तो उच्चारला तरी डोळ्यांसमोर चित्र उभे राहते ते ध्येयवेड्या पावलांचा, एकाच दिशेने टाळ, मृदंग, वीणा, चिपळ्या आणि पताकांसोबत'विठ्ठल..! विठ्ठल..!'चा ठेका धरलेल्या वारकऱ्यांचे. वारी काय आहे हे जाणून घ्यायचं असलं तर प्रत्यक्ष वारीत सहभागी होण्याशिवाय पर्यायच नाही! वारी अनेक अंगांनी आपल्याला समृद्ध करते. चला आपणही अनुभवू या जगात भारी, पंढरीची वारी...

जाता पंढरीसी सुख वाटे जीवा

उद्धव फड

मराठी माणसांची प्रमुख ओळख काय असेल तर ती एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरी म्हणजे 'पंढरीची वारी'. वारी आणि त्याकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन गेल्या दहा वर्षात कमालीचा बदलला आहे असं म्हटलं तर काही वावगं वाटणार नाही. वारी म्हणजे फक्त टाळ पताका घेऊन चालणारे वारकरी नाहीत, त्यामागे आहे एक प्रबळ एकतेचा समानतेचा विचार जो संतांनी दाखवलेल्या मार्गातून वर्षानुवर्षे अधिकाधिक दृढ होत चालला आहे.

मार्ग दाऊनी गेले आधी ।
दयानिधी संत पुढे।।
तेणेचि पंथे चालो जाता ।
न पडे गुंता कोठे काही।।

भागवत धर्माच्या तत्त्वज्ञानाचे जागरण घडवणारा वारकरी संप्रदाय म्हणजे मराठी संस्कृतीचा मेरुदंडच जणू! तर आषाढीची पायीवारी म्हणजे वारकरी संप्रदायाच्या आचारधर्माचा मेरुमणी. पंढरीची वारी ही महाराष्ट्राची आत्मखूण आहे. संतांना बरोबर घेऊन त्याच संतांचे अभंग गातविठ्ठलाच्या भेटीस जाण्याचा वारीचा हा सोहळा आणि त्याची शतकानुशतकांची परंपरा जगात एकमेवाद्वितीयच. मराठी संस्कृती आणि प्रकृती यांचा मनोज्ञ संगम होतो या वारीत. महाराष्ट्रातील निसर्गाचे वेळापत्रक आणि वारीचे वेळापत्रक यांचा मेळ जुळवला आपल्या संतांनी. प्रपंचात राहून परमार्थ करण्याचा आचारधर्म शिकवते वारी. त्यामुळे एखाद्या वर्षी पावसाचे आगमन पुढे-मागे झाले तर प्रस्थानाला हजेरी लावू न शकलेला वारकरी पुढच्या मुक्कामावर वारी सोहळ्यात सामील होतो. त्यामुळे काहीच बिघडत नाही. कारण वारकरी आणि श्री विठ्ठल यांचे नाते आहे निखळ प्रेमाचे.

'वारकरी' म्हणजे 'वारी' करणारा.'वारी' याचा अर्थ 'येरझारा'.असा जो, येरझारा करतो तो वारकरी. ही येरझारा आपल्या गावाहून उपास्य देवतेच्या गावी असते. ती नियमाने

होते. उपास्य देवता खंडोबा, भवानी आई अशा भिन्न असू शकतात; पण 'वारकरी' हा शब्द मात्र पंढरपुरातील श्रीविठ्ठलाची उपासना करणाऱ्या भक्तासाठीच योजला जातो.

'हीच व्हावी माझी आस ।
जन्मोजन्मी तुझा दास।।
पंढरीचा वारकरी ।
वारी चुको न दे हरी।।

असे मागणेच तुकोबारायांनी पंढरीनाथांकडे मागितलेले आहे.

वारीची परंपरा आणि शिस्त

वारीची परंपरा ही माऊलीच्याही पूर्वीपासून चालत आली आहे. माऊलींचे पणजोबा त्र्यंबकपंत कुलकर्णी हे सुद्धा आपेगाव ते पंढरपूर वारी करत. माऊली, श्री नामदेव महाराज, सावतामाळी, चोखोबा, तुकाराम महाराज आदी सर्व संतांची मांदियाळी त्यांच्या काळात पंढरीच्या पांडुरंगाची वारी करत असे.

आजच्या पालखी सोहळ्याची परंपरा ही जगद्गुरू संत तुकाराम महाराजांनंतर त्यांचे चिरंजीव तपोनिधी श्री नारायण महाराज देहुकर यांनी इ.स. १६८५ मध्ये सुरू केली. तुकोबारायांच्या पादुका श्रीदेहू क्षेत्रावरून पालखीत घालून श्रीक्षेत्र आळंदीत येऊन श्री माऊलींच्या पादुकांसमवेत पंढरीस घेऊन जाण्याची परंपरा अशी सुरू झाली. तपोनिधी श्री नारायण महाराज देहुकर यांनीच वारी सोहळ्यात आणि संप्रदायात 'ज्ञानोबा-तुकाराम' या भजनाची प्रथा सुरू केली. हा ऐश्वर्यपूर्ण पालखी सोहळा इ.स. १६८५ पासून इ.स. १८३० पर्यंत एकत्रितपणे सुरू राहिला. त्यानंतर पुढे देहुकर मोरे यांच्या सांगण्यावरून थोर भगवद्भक्त व पूर्वाश्रमीचे श्रीमंत शिंदे सरकार यांचे पदरी सरदार असणारे; परंतु

नंतर विरक्त होऊन आळंदीस वास्तव्यास असणारे श्रीगुरू हैबतबाबा यांनी इ.स. १८३१ पासून श्री माऊलींच्या पादुकांची स्वतंत्र आषाढ वारी सुरू केली. आज जो पालखी सोहळा आपणास दिसतो त्याचे हे विशेष स्वरूप श्रीगुरू हैबतबाबा यांनीच सिद्ध केले.

सातारा जिल्ह्यातील आरफळ हे श्रीगुरू हैबतबाबांचे मूळ गाव. पुढे ग्वाल्हेरच्या शिंदे सरकारांच्या दरबारात श्रीगुरू हैबतबाबांनी सरदार म्हणून मोठा लौकिक प्राप्त केला. त्यानंतर ते थेट आळंदीस आले व अखेरपर्यंत ते श्री माऊलींच्या सेवेत मग्न राहिले.

पालखी सोहळ्यास राजाश्रय असावा म्हणून श्रीगुरू हैबतबाबा यांनी श्रीमंत शिंदे सरकार यांचे दरबारी सरदार असलेले श्रीमंत अंकलीकर शितोळे सरकार यांच्याकडून घोडे, हत्ती, तंबू वगैरे लवाजमा, नैवेद्याची व्यवस्था, जरीपटका आदी सरंजाम घेतला. त्यातील हत्ती वगळता बाकीचा सारा सरंजाम आजतागायत चालू आहे. श्रीगुरू हैबतबाबा यांचा मूळ पिंड सरदार घराण्याचा असल्याने, त्यांनी वारी सुरू करताना संपूर्ण सोहळ्याला लष्कराच्या तुकडीसारखे शिस्तबद्ध स्वरूप दिले. त्यांना सहकार्य श्री. वासकर, श्री. सुभानजी शेडगे, खंडोजीबाबा वाडीकर, आजरेकर प्रभृतींचे होते. म्हणून आजही या सर्व दिंड्या त्याच प्रथेनुसार सुरू आहेत. आजही वारी सोहळ्यातील शिस्त, नियम, चालण्याचा क्रम, भजनाची पद्धत इतर प्रथा, निर्णय घेण्याची पद्धत श्रीगुरू हैबतबाबा यांनी इ.स. १८३१ पासून ज्या प्रकारे सुरू केली तशीच पाळली जाते. पुढे, १८५२मध्ये पंच समितीची स्थापना झाली.

पालखी सोहळ्याचे स्वरूप

पालखी सोहळ्यात सर्वात पुढे भोई समाज दिंडी असते. त्यानंतर श्री माऊलींचा अश्व (त्यावर श्री माऊली स्वत: आरूढ असतात, ही वारकऱ्यांची भावना आहे म्हणून या अश्वाच्या कपाळाला ते आदराने स्पर्श करून नमस्कार करतात). त्या पाठोपाठ श्रीमंत शितोळे सरकार यांचाजरी पटका हाती धारणा केलेला घोडेस्वार असतो. जरीपटक्याच्या अश्वापाठोपाठ २६ दिंड्या, त्यांच्यामागे माऊलींचा रथ, त्या मागे इतर दिंड्या अशी ही रचना असते.

चांदीची पालखी

ज्ञानोबारायांच्या चांदीच्या पादुका ठेवण्यासाठी चांदीची पालखी असते. मार्गस्थ होताना तिला श्रींच्या विशेष रथात ठेवले जाते. जरीची सुंदर अबदागिरी, जरीची रंगीत छत्री, चांदीची चवरी श्रींच्या सेवेत असते. असे हे कैवल्य साम्राज्यचक्रवर्ती श्री माऊलींचे वैभव आहे. लोकांचा हा अनभिषिक्त राजा आहे. लोकप्रजा आपणहून त्याची सेवा करतात.

वैष्णवांच्या दिंड्या

पालखीच्या मागे व पुढे सुमारे ४०० दिंड्या असतात. या दिंड्यांचा क्रमही श्री हैबतबाबांनी ठरवून दिल्याप्रमाणेच आजही पाळला जातो. दिंडी म्हणजे वारकऱ्यांचा एक विविक्षित समुदाय. त्यात विणेकरी, त्यापुढे टाळकरी व पखवाजवादक आणि सर्वात पुढे पताकाधारी असतात. श्री पंढरीनाथाला प्राणप्रिय असणारी पवित्र तुळशी आणि दिंडीतील वारकऱ्यांची तहान भागविण्यासाठी पाण्याचा हंडा माथ्यावर घेतलेल्या महिला विणेकऱ्यांच्या मागून चालतात.

श्री माऊलींच्या पालखी सोहळ्यामध्ये रथापुढे अधिकृत २७ व रथामागे २०१ नोंदणीकृत दिंड्या आहेत. त्याखेरीज साधारण १०० दिंड्या या विनानोंदणीकृत आहेत. दिंड्यांचा अनुक्रम सेवेप्रमाणे ठरलेला असतो. नवीन दिंड्यांना सोहळ्यात प्रवेश करण्यापूर्वी पंचसमितीची परवानगी घ्यावी लागते. त्या दिंड्यांना रथामागे शेवटचा क्रमांक मिळतो. एका दिंडीत साधारण १०० ते १००० पर्यंत वारकरी असतात. प्रस्थानाच्या वेळी साधारण दोन ते अडीच लाखांचा जनसमुदाय आळंदीत असतो. हाच समुदाय वाखरीपर्यंत सुमारे सात ते आठ लाखांवर जातो.

श्री माऊलींचा अश्व

पालखी सोहळ्यात सर्वांत पुढे चालणारा श्री माऊलींचा अश्व हा श्री श्रीमंत शितोळे सरकार यांचे अंकली-बेळगाववरून श्रीक्षेत्र आळंदीस परंपरेनुसार पायीच आणला जातो. विशेष हे की या अश्वावर कोणीही मनुष्य स्वार झालेला नसतो. हा अश्व ज्येष्ठ शु.।। ११ ला अंकलीवरून प्रस्थान करतो आणि ज्येष्ठ वद्य ७ ला (पूर्ण ११ दिवस) आळंदीत प्रवेश करतो. आळंदीला इंद्रायणी नदीच्या पुलापाशी अश्व आले की, श्रीमंतांचे प्रतिनिधी तसा निरोप मंदिरात सोहळ्याचे मालक व चोपदार यांना देतात. त्यानंतर श्री हैबतबाबांची दिंडी अश्वाला सामोरी जाते. अश्वांची पूजा केली जाते. त्यानंतर वाजतगाजत अश्वांना मंदिरात आणले जाते. अश्वांच्या स्वागतासाठी मंदिरात पायघड्या घातलेल्या असतात.

वारीतील काही ठळक वैशिष्ट्ये

- संपूर्ण सोहळ्यात श्रींची सामूहिक चार स्नाने होतात. पंढरीस जाते वेळी व परतीचे वेळी होणारे नीरा स्नान आणि श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढ एकादशी व आषाढ पौर्णिमेस होणारे श्री चंद्रभागेचे स्नान.
- संपूर्ण वारीत सकाळच्या वेळीस फक्त दोनच ठिकाणी आरती होतात प्रथम- थोरल्या पादुका (चर्होली) आणि दुसरी पुणे येथे शिंदे छत्रीपाशी.
- श्रीमंत शिंदे सरकार यांनी श्री माऊलींच्या मंदिर व्यवस्थेसाठी आळंदी आणि नाणज हीगावे इनाम दिली होती, श्री गुरु हैबतबाबादेखील शिंदे सरकार यांचे पदरी सरदार होते. माऊलींच्या मंदिरातील महाद्वार, नगारखाना, वीणा मंडप हे श्री शिंदे सरकार यांनीच बांधले. श्रीमंत शिंदे सरकारांच्या याच सेवेचे स्मरण म्हणून त्यांचे समाधिस्थळ असलेल्या शिंदे छत्रीजवळ सकाळची आरती होते.
- वाखरी येथून पंढरीस वारी जाताना श्री माऊलींच्या पादुका रथातून उतरून घेऊन

श्रीमंत शितोळे सरकार यांच्या गळ्यात दिल्या जातात.

वारीतील शिस्तबद्धता

वारीच्या वाटचालीतील मुक्काम, विसावा, रिंगण, मालिकेप्रमाणे भजन, कीर्तन, भारुडे या साऱ्यांचा उत्तम क्रम लावून वारीला खरोखरीच लष्करी शिस्तीचे रूप दिले गेले आहे.

श्री क्षेत्र आळंदीपासून निघून श्री क्षेत्र पंढरीस पोहोचेपर्यंत पालखी सोहळ्यात लाखोंचा समुदाय सहभागी होतो. एवढ्या प्रचंड संख्येने येणाऱ्या आणि चालणाऱ्यांचे नियंत्रण, शिस्तबद्ध चलनवलन, राहणे-खाणे-निजणे या सगळ्यांची सोय, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य, मलमूत्र विसर्जन व कचरा व्यवस्थापन, वाहतुकीचे नियंत्रण आणि पालखीच्या मुक्कामाचे संयोजन यांसारख्या प्रत्येक बारीक-सारीक गोष्टीमध्ये व्यवस्थापनशास्त्राची अक्षरशः अगणित सूत्रे दडलेली आहेत. व्यवस्थापनशास्त्राच्या अध्यापक-अभ्यासक विद्यार्थ्यांनी आवर्जून शिकावे असे वारीच्या व्यवस्थापनाचे हे 'मॉडेल' आहे.

वारीतील ऊर्जा स्थाने...

- **रिंगण** : वारीला पायी जाताना येणारा थकवा जाण्यासाठी रिंगण घातली जातात. पालखीला केंद्रस्थानी ठेवून गोलाकार प्रदक्षिणा घातली जाते. रिंगणाचे बरेच प्रकार आहेत मेंढ्यांचे, विणेकऱ्यांचे, अश्वाचे, उभे खडे रिंगण व गोल रिंगण असे रिंगणाचे प्रकार आहेत.

वारकऱ्यांचा शीण घालवणारा सोहळा म्हणजे रिंगण. टाळमृदुंगाचा गजर, भगव्या पताकांची दाटी, अश्वाकडे रोखलेल्या नजरा, अश्वांची भरधाव दौड, ग्यानबा तुकाराम, ग्यानबा तुकाराम असं उत्साहवर्धक आणि स्फूर्तिदायी वातावर अश्वांच्या दौडीनंतर माती कपाळी लावण्यासाठी अक्षरशः झुंबड उडते. हे सगळे काही नेत्रदीपक डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. रिंगणानंतर होणारा उड्यांचा खेळ, पावली, फुगडी हे सारे पाहताना प्रत्येकजण दंग होतो.

- **भारूड** : लोकशिक्षणासाठी संतांनी भारुडांची रचना केली. भजनी भारूड आणि सोंगी भारूड असे भारुडाचे दोन प्रकार आहेत. हे दोन्ही प्रकार वारीत सादर होतात. पंढरीच्या वारीत आळंदी देहूपासून थेट पंढरपूरपर्यंत दुपारी विसाव्याच्या व मुक्काम ठिकाणी भारुडांना उधाण येते. थकलेला, भागलेला, वारकरी उत्साहने ठेका धरून नाचायला लागतो.

- **दिंडी** : प्रत्येक दिंडीमध्ये एक वीणेकरी, एक पखवाज वादक असतो. दिंडीपुढे पताकाधारी वारकरी असतो. शिवाय डोक्यावर तुळशी वृंदावन किंवा पाण्याचा हंडा घेतलेल्या महिला व टाळकरी असतात. दिंडीमागून महिला वारकरी जातात. वीणेकरी हा दिंडीचा प्रमुख असतो. तो सांगेल त्याप्रमाणे भजने, हरीपाठ इत्यादीचे गायन करत टाळमृदुंगाच्या तालात नाचत वारकरी पुढे जातात.

- **कीर्तन** : वारीतील कीर्तने ही वारकऱ्यांना मेजवानीच असते. म्हणून तर वारकरी संप्रदायातील कीर्तन परंपरेचे प्रवर्तक संत नामदेव महाराज म्हणतात की 'नाचू किर्तनाचे रंगी.., ज्ञानदिप लावू जगी' या पद्धतीत इतर किर्तनासारखा पूर्वरंग, उत्तररंग, आख्यान असे काही नसते. या कीर्तनात सांप्रदायिक भजनाला प्राधान्य असते. कीर्तनात मृदुंग, टाळ, पखवाज व वीणा एवढी वाद्ये असतात. आणि देव, संत, नाममहात्म्य्, गुरुकृपा असेच विषय असतात.

- **धावा** : धावा म्हणजे धावणे. असे मानले जाते की पंढरपूरला पायी जात असताना संत तुकाराम महाराज यांना वेळापूर येथील छोट्याशा टेकडीवरून विठ्ठलाच्या देवळाच्या कळसाचे दर्शन झाले आणि विठ्ठलाच्या दर्शन ओढीने ते तिथून पंढरपूर पर्यंत धावत गेले. याचे स्मरण म्हणून वारकरी वेळापूरपासून पंढरपूरपर्यंत शेवटचा टप्पा धावत जातात.

- **प्रदक्षिणा** : वारीला आलेला भक्त पंढरपुरातील विविध मंदिरे आणि पवित्र स्थाने याचे दर्शन घेतो तीच प्रदक्षिणा. ही दोन प्रकारची असते. छोट्या प्रदक्षिणेस 'देव प्रदक्षिणा' म्हणतात. मोठ्या प्रदक्षिणेला 'नगर प्रदक्षिणा'असे म्हणतात.

- **'काटवटकणा'** : नव्या पिढीला जास्त माहिती नसलेला असा हा खेळ आहे. या खेळात बसून पायाचे अंगठे धरले जातात व ते न सोडता पाठीच्या, कमरेच्या, पायाच्या आधाराने गोल फिरले जाते. असा काटवटकणा घालणाऱ्या महिलांना कंबरदुखी व गर्भाशयाचेविकार होत नाहीत. आणि हो हा खेळ पुरुषांसाठीदेखील तितकाच फायदेशीर आहे.

- **'फुगडी'** : महाराष्ट्रातील लोकप्रिय खेळ. यात दोन व्यक्ती एकमेकांच्या हातात हात देतात आणि गोलाकार फिरतात. पुढच्याचा हात घट्ट पकडून आपल्या शरीराचा भारमागे टाकत गोल फिरावे लागते. या खेळाचा खरा आनंद घ्यायचा असेल तर पुढच्या व्यक्तीवर पूर्ण विश्वास ठेऊन फिरता यायला हवे.

वारीविषयी सांगायचे झाले तर जे कोणत्याही विद्यापीठात शिकायला मिळणार नाही ते या वारीच्या लोकविद्यापीठात शिकायला, जगायला मिळते. व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणारे, जगण्याचा मूलमंत्र देणारे हे विद्यापीठ आहे. तसंही वारी वारीत येऊन जगल्याशिवाय कळूच शकत नाही. त्यामुळे आयुष्यात एकदा तरी वारी नक्की करा.

भिडे आसमंती ध्वजा वैष्णवांची।
उभी पंढरी आज नादावली..
जरी बाप साऱ्या जगाचा परी तू।
आम्हा लेकरांची विठू माऊली।

असे वारीतील प्रत्येक वारकऱ्यांना मनापासून वाटते. हा आनंद सोहळा अवर्णनीय असतो.

(लेखक हे संत साहित्याचे अभ्यासक तथा लातूर जिल्हा परिषदेत संवादतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत.)

‘बा विठ्ठला... सर्व अडचणी दूर कर’

आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी लता शिंदे यांनी मानाचे वारकरी मुरली नवले व त्यांच्या सुविद्य पत्नी जिजाबाई नवले (मु.पो. रुई, ता.गेवराई, जि.बीड) या दाम्पत्यासोबत विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा केली.

आषाढी एकादशीच्या वारीला शेकडो वर्षांची परंपरा आहे. अनेक वर्षांपासून शिस्तबद्ध पद्धतीने दिंड्या निघतात. त्यामुळे सकारात्मक वातावरण तयार होते. अशा वारीत सहभागी होणाऱ्या सर्व वारकऱ्यांना सोयी-सुविधा देण्यात राज्य शासन कोठे ही कमी पडणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. समाजातील सर्व घटकातील लोकांच्या जीवनात सुख व समृद्धी येण्यासाठी राज्यासमोरील कोरोनासह सर्व अडचणी दूर करण्याचे साकडे त्यांनी विठ्ठलचरणी घातले. महापूजेनंतर विठ्ठल मंदिर समितीच्या वतीने आयोजित मानाच्या वारकऱ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी मुख्यमंत्र्यांचे कुटुंबीय, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्यासह समितीचे अन्य सदस्य व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

लोकराज्य

अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ

वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत. वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत. निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

पत्ता : उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

If undelivered, please return to:

प्रेषक / From

अनिल आलूरकर
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंट प्लस प्रा.लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपळास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१ ३११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक: दीपक कपूर